



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार २७ ऑक्टोबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०





# अहिल्यानगर जिल्ह्यात जोराचा पाऊस

## अनेक गावांना झोडपले

**अहिल्यानगर नागपूर/प्रतिनिधी :** : जिल्ह्यातील अनेक भागात रविवारी सायंकाळी जोरदार पाऊस झाला. श्रीरामपूर, अकोले, अहिल्यानगर, संगमनेर, कोपरगाव तालुक्यातील अनेक गावांना पावसाने चांगलेच झोडपले.



राजूर, भंडारदरा परिसरातही पावसाचा जोर रात्री उशिरापर्यंत कायम होता.

राजूर परिसरात मागील चार दिवसांपासून सलग जोरदार पाऊस पडत आहे. शनिवारी मध्यरात्रीनंतर श्रीरामपूर शहर व तालुक्याच्या ग्रामीण भागाला मुसळधार पावसाने झोडपले.

सुमारे ४० ते ६० मिलिमीटर पावसाची अनेक ठिकाणी नोंद झाली. वडाळामहादेव येथे सर्वाधिक ५० मिलिमीटर पाऊस झाला. या भागात सोयाबीन वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# मतदार याद्यांत घोळ, मतचोरीचे आरोप, निवडणूक आयोगाचा संपूर्ण देशभरात मतदार याद्यांचं पुनरीक्षण करण्याचा निर्णय

## उद्या संध्याकाळी घोषणा करणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** गेल्या काही दिवसांपासून मतदार याद्यांमधील घोळ आणि मतदानात झालेल्या कथित मतचोरीच्या आरोपांमुळे देशभरातील राजकारण ढवळून निघालं आहे. त्या पार्श्वभूमीवर भारतीय निवडणूक आयोगाने मोठा निर्णय घेण्याची तयारी केली आहे. निवडणूक आयोगाने संपूर्ण देशभरात मतदार याद्यांचं पुनरीक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भातील घोषणा सोमवारी संध्याकाळी पत्रकार परिषदेमधून करण्यात येणार आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांच्या नेतृत्वात या संदर्भातील संपूर्ण माहिती दिली जाईल. याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार मतदार याद्यांच्या पुनरीक्षणाच्या पहिल्या टप्प्यामध्ये १० ते १५ राज्यांचा समावेश केला जाईल. त्यामध्ये २०२६ मध्ये विधानसभेच्या निवडणुका होऊ घातलेल्या आहेत, अशा राज्यांचा




समावेश असू शकतो. मतदार यादी पुनरीक्षण ही मतदार याद्यांना अद्ययावत आणि शुद्ध करण्यासाठीची महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. त्यामध्ये नव्या मतदारांची नोंदणी, मृत मतदारांची नावं हटवणं आणि बनावट मतदारांची नावं हटवणं, तसेच मतदार यादीतील नावांचं स्थलांतरण अशी कामं केली जातील. भारतीय निवडणूक आयोग आगामी काळात मतदान होऊ घातलेल्या राज्यांमध्ये ही प्रक्रिया राबवण्याची शक्यता आहे. त्यामध्ये तामिळनाडू, पश्चिम बंगाल, केरळ, आसाम आणि पुदुच्चेरी या राज्यांमध्ये २०२६ मध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. अशा परिस्थिती या राज्यांमधील मदतार याद्यांचं पुनरीक्षण महत्त्वपूर्ण ठरणार आहे. तसेच गेल्या काही दिवसांत मतदार याद्यातील घोळावरून वाद पेटलेल्या महाराष्ट्राबाबत काय निर्णय होतो याकडे सर्वांचं लक्ष लागलेलं आहे.

# दिवाळी-छठपूजा उत्सवासाठी नागपूरहून पुणे, मुंबईकरिता स्पेशल ट्रेन, मध्य रेल्वेचा निर्णय, एकाच दिवशी २३ स्पेशल ट्रेन

**नागपूर/प्रतिनिधी :** - यंदाच्या दिवाळीच्या पर्वाचा समारोप होत असला तरी छठपूजेचा उत्सव असल्याने विविध प्रांतातील रहिवाशांची ये-जा मोठ्या प्रमाणात सुरूच आहे. त्यामुळे रेल्वे स्थानके आणि रेल्वे गाड्यांवरील गर्दी कमी होण्याऐवजी वाढतच आहे. ती ध्यानात घेत मध्य रेल्वेने महाराष्ट्रातील विविध स्थानकावरून सोमवारी २८ ऑक्टोबरला एकाच दिवशी २३ स्पेशल ट्रेन चालविण्याचा निर्णय घेतला आहे.

दिवाळीचा सण आटोपून आपापल्या गावाला, रोजगाराच्या ठिकाणी परतणाऱ्यांची विविध गाड्या आणि रेल्वे स्थानकांवर गर्दी होत आहे. त्यात छठपूजेला निघालेल्या भाविकांचीही त्यात भर पडत आहे. परिणामी जवळपास प्रत्येक रेल्वे गाडीत, रेल्वे स्थानकावर पाय ठेवायला जागा दिसत नाही. प्रवाशांच्या वाढत्या गर्दीमुळे अनेकांचा प्रवास गैरसोयीचा होत आहे. खास करून ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिला आणि मुलांना या गर्दीत प्रवास करताना मोठा त्रास होत आहे. ते लक्षात घेऊन मध्य रेल्वेने महाराष्ट्रात सोमवारी विविध मार्गावर २३ स्पेशल ट्रेन चालविण्याचे जाहीर केले आहे. त्यात नागपूरहून पुणे आणि मुंबईला जाणाऱ्या तसेच तिकडून येणाऱ्या चार स्पेशल ट्रेनचाही समावेश आहे.

या मालिकेतील ट्रेन नंबर ०१४१०



नागपूर-पुणे विशेष ट्रेन सोमवारी २८ ऑक्टोबरला नागपूर स्थानकावरून दुपारी ४ वाजून १० मिनिटांनी सुटणार आहे. ही गाडी वर्धा, धामणगाव, बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहिल्यानगर आणि दौंड कॉर्ड लाइन या स्थानकावर थांबणार आहे. गाडीला एक वातानुकूलित द्वितीय श्रेणी, अकरा शयनयान, सात सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन सामान्य द्वितीय श्रेणी कोचसह गार्ड ब्रेक व्हॅन राहणार आहे.

अशाच प्रकारे ट्रेन नंबर ०१०१२ नागपूर-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्पेशल ट्रेन सोमवारी रात्री १०:१० वाजता नागपूर स्थानकावरून सुटणार आहे. ही गाडी वर्धा, धामणगाव, बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, मनमाड, नाशिक रोड, इगतपुरी, कल्याण, ठाणे आणि ☞(पान २ वर)

# 'मुख्यमंत्रिपदाला जो नडला तो फोडला, अब तेरा क्या होगा मुरली ?

## सुषमा अंधारेंचा खोचक टोला

पुण्यातील जैन बोर्डिंगच्या जमीन व्यवहारावरून शिवसेना शिंदे गटाचे नेते रवींद्र धंगेकर यांनी केलेल्या आरोपांमुळे भाजपाचे खासदार आणि केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ हे वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. या प्रकरणावरून विरोधी पक्षांकडून भाजपा आणि मुरलीधर मोहोळ यांची कोंडी केली जात आहे. तर आता शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनीही सोशल मीडियावर एक पोस्ट करत भाजपाला टोला लगावला आहे. 'मुख्यमंत्रिपदाला जो नडला तो फोडला', असं शीर्षक देऊन शेअर केलेल्या या पोस्टमधून सुषमा अंधारे यांनी भाजपाला आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही डिवचले आहे.



या पोस्टमध्ये सुषमा अंधारे लिहितात की, ''मुख्यमंत्रिपदाला जो नडला तो फोडला.सगळ्यात आधी विनोद तावडे, मग एकनाथ खडसे, मग पंकजा मुंडे, पाठोपाठ सुधीर मुनगुंटीवार, चंद्रकांत पाटलांनी तर कानाला खडा लावलाय. एकनाथ शिंदेंचा इस्तु इझलाय. गडकरी साहेबांनी सौजन्यपूर्ण माघार घेतलीय. अब...अब तेरा क्या होगा मुरली ?'', असा प्रश्न विचारत सुषमा अंधारे यांनी भाजपाच्या अंतर्गत राजकारणावर बोट ठेवलं आहे.

दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेना शिंदे गटाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी मोहोळ यांच्यावर केलेल्या आरोपांच्या प्रकरणात रवींद्र धंगेकर यांचा बचाव केला आहे. रवींद्र धंगेकर हे लढणारे कार्यकर्ते आहेत. त्यांना ज्या काही गोष्टींची माहिती मिळाली त्या आधारावर ते बोलले. मात्र हा विषय आता संपवा आणि महायुती जपा, असा सल्ला एकनाथ शिंदे यांनी दिला आहे. त्यामुळे आता हा वाद संपण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# 'अदानी समूहात LIC ची ३.९ अब्ज डॉलरची गुंतवणूक'

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** अमेरिकन वृत्तपत्र असलेल्या वॉशिंग्टन पोस्टने शनिवारी (२५ ऑक्टोबर) अदानी समूहाबाबत एक इन्व्हेस्टिगेटिव्ह रिपोर्ट प्रसिद्ध केला आहे.



या वृत्तपत्राने या रिपोर्टमध्ये दावा केला आहे की, भारतीय आयुर्विमा महामंडळ अर्थात एलआयसीने सरकारी अधिकाऱ्यांच्या प्रस्तावाने अदानी समूहाच्या कंपन्यांमध्ये जवळपास ३.९ अब्ज डॉलरची गुंतवणूक केली आहे.

या रिपोर्टमध्ये अंतर्गत कागदपत्रांच्या हवाल्याने असाही दावा करण्यात आला आहे की, यासाठी सरकारच्या दबावात एक योजना तयार करण्यात आली आणि सरकारच्या दबावानेच ती संमत करण्यात आली.

विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसने या प्रकरणावर कठोर प्रतिक्रिया दिली आहे. हा सार्वजनिक पैशांचा गैरवापर असल्याचं ☞(पान २ वर)

# इंजिनात बिघाड झाल्याने एस.टी. बस आगीत भस्मसात; इंदापूर बस आगारातील दुर्घटना

**इंदापूर/वृत्तसंस्था-** - इंदापूर एस.टी. बसस्थानकाच्या आवारात थांबलेल्या धाराशिव–पुणे एस.टी. बसच्या इंजिनात बिघाड होऊन ती जागीच भस्मसात झाली. शनिवारी (दि. २६) रात्री दीड वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. एस.टी. बसचे चालक व वाहक यांनी प्रसंगावधान राखून एस.टी.तील सर्व ५० प्रवाशांना सुखरूप बाहेर काढल्याने मोठी जीवितहानी टळली. मात्र प्रवाशांच्या ७ लाख ३९ हजार २०० रुपयांच्या वस्तू आणि एस.टी. बसचे १२ लाख रुपये, अशी एकूण १९ लाख ३९ हजार २०० रुपयांची वित्तहानी झाली आहे. एस.टी.चे वाहक कृष्णा गुलझार कांबळे (रा. घाटंग्री, ता. व जि. धाराशिव) यांनी इंदापूर पोलिसांकडे या घटनेची माहिती दिली.



दरम्यान, पोलीसांनी सांगितले की, माहिती देणारे कांबळे आणि त्यांचे सहकारी एस.टी. चालक नेताजी रामलिंग शितोळे हे त्यांच्या ताब्यातील धाराशिव एस.टी. आगाराची धाराशिवहून पुण्याकडे जाणारी एस.टी. बस (क्र. एमएच २० बीएल ४२३३) घेऊन दीड वाजण्याच्या सुमारास इंदापूर एस.टी. बसस्थानकाच्या आवारात आले. तेथील फलाट क्रमांक १२ वर बस थांबवून ते दोघे नोंदणी करण्यासाठी जात असताना, एस.टी.च्या इंजिनखाली ठिणग्या पडून आग लागल्याचे प्रवाशांनी पाहिले व आरडाओरडा केला. त्या आवाजाने ते दोघेही धावत बसजवळ आले. त्यांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला; परंतु मोठ्या प्रमाणात आगडोंब उसळल्याने ती आटोक्यात आणता आली नाही. त्या परिस्थितीत प्रसंगावधान राखून त्यांनी एस.टी. बसमधील सर्व ५० प्रवाशांना सुखरूप बाहेर काढले. त्यानंतर इंदापूर पोलिस ठाण्यात या☞(पान २ वर)




# रेल्वे रुळावर रील बनवताना ट्रेन अंगावरुन गेली; दोन तरुणांचा मृत्यू

**पथराड (जि. जळगाव)** - सोशल मीडियासाठी रील बनवण्याच्या नादात दोन तरुणांचा जीव गेला आहे. ही हृदयद्रावक घटना पथराड (ता. धरणगाव) परिसरात, पाळधी रेल्वे गेटजवळ रविवारी (दि. २६ ऑक्टोबर) सकाळी सुमारास १० वाजता घडली.



मृत तरुणांची नावे हर्षल नन्नवरे आणि प्रशांत खैरनार अशी आहेत. दोघेही १७ ते १८ वयोगटातील असून, ते रेल्वे रुळावर बसून रील शूट करत होते. त्यावेळी दोघांच्या कानात हेडफोन लावलेले असल्याने ट्रेनचा आवाज त्यांना ऐकू आला नाही. भुसावळकडे जाणारी अहमदाबाद-हावडा एक्स्प्रेस तेथून जात असताना, दोघेही तिच्या खाली सापडले आणि जागीच ठार झाले.

पोलिसांचा पंचनामा सुरू

घटनेनंतर धरणगाव पोलिस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले असून, ☞(पान २ वर)

# आजी-माजी आमदार, माजी मंत्र्यांसह १६ जणांची पक्षातून हकालपट्टी

## नितीश कुमारांचा तडाखा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी पक्षाच्या निर्णयाविरोधात भूमिका घेणाऱ्या १६ नेत्यांना बाहेरचा रस्ता दाखवला आहे. जनता दल (युनाटेड) पक्षाचे चार वेळा आमदार राहिलेल्या गोपाल मंडल आणि इतर माजी मंत्र्यांनाही नितीश कुमारांनी झटका दिला आहे. विधानसभा निवडणुकीत पक्षाची शिस्त मोडल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.



नितीश कुमार यांनी रविवारी ज्या नेत्यांची जदयूमधून हकालपट्टी केली आहे, त्यामध्ये गोपालपूरचे आमदार नरेंद्र कुमार उर्फ गोपाल मंडल, माजी मंत्री हिमराज सिंह, माजी आमदार संजीव सिंह, माजी आमदार महेश्वर प्रसाद यादव आणि प्रभात किरण यांचाही समावेश आहे.

**जदयूमधून हकालपट्टी करण्यात आलेले १६ नेते** -शैलेश कुमार, ☞(पान २ वर)

# 'सत्तेत आलो तर आम्ही वक्फ कायदा कचऱ्याच्या डब्यात फेकून देऊ...

## तेजस्वी यादव यांचे जाहीर सभेत आश्वासन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** बिहार विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. प्रचारसभा सुरू आहेत. आज एका सभेवेळी राजद नेते तेजस्वी यादव यांनी रविवारी एक मोठे राजकीय विधान केले. 'जर अखिल भारतीय आघाडीने बिहारमध्ये सरकार स्थापन केले तर केंद्र सरकारने मंजूर केलेला वक्फ कायदा कचऱ्याच्या डब्यात फेकून दिला जाईल. कटिहार आणि किशनगंज या मुस्लिमबहुल भागात जाहीर सभांना संबोधित करताना तेजस्वी यादव यांनी हे विधान केले.

'माझे वडील लालू प्रसाद यादव यांनी कधीही जातीय शक्तींशी तडजोड केली नाही. परंतु नितीश कुमार नेहमीच अशा शक्तींसोबत राहिले आहेत. त्यांच्यामुळेच आरएसएस आणि त्यांच्या संघटना द्वेष पसरवत आहेत. भाजपला भारत जलाओ पार्टी म्हटले पाहिजे, अशी टीकाही त्यांनी केली.

एप्रिलमध्ये केंद्र सरकारने वक्फ कायदा, २०२४ मंजूर केला आहे. दरम्यान, आता तेजस्वी यादव यांचे हे विधान आले आहे. एनडीए सरकारने हा मुस्लिम समुदाय, मागासवर्गीय आणि महिलांना सक्षम करणारा पारदर्शक कायदा असल्याचे



वर्णन केले. हा कायदा मुस्लिमांच्या धार्मिक आणि मालमत्ता अधिकारांचे उल्लंघन करतो,असा विरोधी पक्षांचा युक्तिवाद आहे.

राजदचे एमएलसी मोहम्मद कारी सोहेब यांनीही तेजस्वी यादव मुख्यमंत्री झाले तर वक्फ विधेयकासह सर्व विधेयके फाडून फेकून दिली जातील असे विधान केले होते. यानंतर, भाजपने प्रश्न उपस्थित केले होते.मुख्यमंत्री केंद्रीय कायदा कसा रद्द करू शकतात?, असा सवाल भाजपाने केला. 'ही निवडणूक संविधान, लोकशाही आणि बंधुत्वाच्या रक्षणासाठीची☞(पान २ वर)



# चांदूर रेल्वे एपीएमसी शेडमध्ये व्यापाऱ्यांचा माल

## -शेतकऱ्यांचा माल पावसात भिजला

**चांदूर रेल्वे :** चांदूर रेल्वे कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतकऱ्यांच्या हिताचे बोल तर आहेत, पण वृत्ती मात्र व्यापाऱ्यांच्या बाजूने दिसते. बाजार समितीमध्ये टिनशेड व्यापाऱ्यांच्या मालाने गच्च भरले असून शेतकऱ्यांची मेहनतीची पिके खुल्या जागेत लिलावासाठी ठेवली जात आहेत.



शुक्रवारच्या सायंकाळी आलेल्या अचानक वाऱ्यासह पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. बाजार समितीमध्ये काही व्यापाऱ्यांचे पोते टिनशेडखाली सुरक्षित राहिले, मात्र शेतकऱ्यांच्या हजारो क्विंटल सोयाबीन पिकांबरोबरच काही व्यापाऱ्यांचे पोते पावसात भिजून खराब झाले. बाजार समितीमध्ये व्यापाऱ्यांना विशेष सुविधा पुरवल्या जात असल्याचे दिसून येते. सर्व टिनशेड व्यापाऱ्यांनी महिनोन्महिने विकत घेतलेले सोयाबीन, तूर पिकांचे बोरे साठवण्यासाठी व्यापलेले आहेत. शेतकऱ्यांची सोयाबीन व तूरसारखी पिके खुल्या जागेत लिलाव व तोलणीसाठी ठेवली जात आहेत.

यावरून स्पष्ट होते की, बाजार समिती प्रशासन शेतकऱ्यांपेक्षा व्यापाऱ्यांना जास्त प्राधान्य देत आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, स्थानिक बाजार समितीमध्ये सुरू असलेले हे दुहेरी धोरण अन्यायकारक आहे. त्यामुळे अनेक शेतकरी आपला शेतमाल विकण्यासाठी इतर बाजार समितीचा पर्याय निवडत आहेत. चांदूर रेल्वे कृषी उत्पन्न बाजार समितीत व्यापाऱ्यांना मिळणाऱ्या सुविधांमुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढत चालली आहे. शेतकऱ्यांनी मागणी केली आहे की, सर्व टिनशेड केवळ शेतकऱ्यांच्या उपयोगासाठी उपलब्ध करून द्यावेत आणि त्यांच्या शेतमालांचे पावसापासून संरक्षण करण्याची योग्य व्यवस्था करावी.

**व्यापाऱ्यांना नोटीस देणार-**

कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव चेतन इंगळे यांनी सांगितले की, व्यापाऱ्यांनी खरेदी केलेला शेतीमाल २४ ते ३६ तासांच्या आत खाजगी किंवा बाजार समितीच्या गोदामात हलवून टिनशेड रिकामे करणे आवश्यक आहे. मात्र काही व्यापाऱ्यांनी सोयाबीनच्या बोऱ्या दीर्घकाळ टिनशेडमध्ये ठेवलेल्या आहेत. त्यांना नोटीस बजावली जाईल आणि लवकरच सर्व शेड शेतकऱ्यांच्या वापरासाठी उपलब्ध करून दिले जातील.

# यात्रेत हरवलेले दोन चिमुकले सुखरूप पोलिसांची तत्पर कारवाई कौतुकास्पद

**दिग्रस :** महान तपस्वी श्री घंटीबाबा महोत्सवानिमित्त दिग्रस शहरात भव्य यात्रेचे आयोजन करण्यात आले. भाऊबीजेच्या शुभप्रसंगी गुरुवार, २३ ऑक्टोबर रोजी माहेरी आलेल्या दोन महिलांची लहान मुले, एक मुलगा व एक मुलगी या यात्रेदरम्यान वेगवेगळ्या घटनांत हरविल्याची बाब समोर आली.

पहिल्या घटनेत एका महिलेचा मुलगा संध्याकाळी ७.३० वाजता हरवला, तर दुस-या घटनेत दुस-या महिलेची मुलगी रात्री ९ च्या सुमारास हरवल्याचे उघडकीस आले. प्रचंड गर्दीमुळे नागरिकांत त्यामुळे एकच खळबळ उडाली होती. या दोन्ही घटनांची माहिती मिळताच दिग्रस पोलिस ठाणेदार



वैजनाथ मुंडे यांनी तत्काळ कारवाई करत ध्वनीक्षेपकांद्वारे सार्वजनिक आवाहन केले आणि शोधमोहीम राबवण्याचे आदेश दिले.

त्यांच्या मार्गदर्शनात पोलिस आदित्य जाधव, महादेव फलटणकर आणि संध्या दुरधवे यांनी तातडीने कार्यवाही करत दोन्ही चिमुकल्यांचा शोध घेऊन त्यांना त्यांच्या पालकांच्या स्वाधीन केले. दिग्रस पोलिसांची ही तत्परता, संवेदनशीलता आणि जबाबदार नागरिक भावना शहरवासींकडून मोठ्या प्रमाणावर कौतुकास्पद ठरली आहे. दिग्रस पोलिसांचे हे मानवी मूल्य जपणारे कार्य यात्रेतील उपस्थितांसाठी दिलासादायक ठरले आहे.

**त्वरित माहिती द्या**

आपले सहकार्य हेच आमचे बळ आहे. सुरक्षित आणि शांततेत यात्रा पार पाडण्यासाठी प्रत्येकाने जबाबदार नागरिक म्हणून योगदान द्यावे. गर्दीच्या ठिकाणी आपल्या लहान मुलांवर लक्ष ठेवा. कुठल्याही प्रकारची अडचण आल्यास त्वरित पोलिसांना माहिती द्या.

**वैजनाथ मुंडे**,ठाणेदार, दिग्रस

# कोंडेश्वर मार्गावर बिबट्याने केली बकरीची शिकार

**अंजनगाव बारी -** कोंडेश्वरकडे जाणाऱ्या रानमाय माता मंदिर परिसरात बिबट्याने बकरीच्या पिलाची शिकार केली. त्यामुळे परिसरातील ग्रामस्थांसह शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.



प्रेमीला विजय साकोरे यांची बकरी रानमायजवळील परिसरामध्ये गुराखी भास्कर वानखडे चराईसाठी घेऊन गेले होते. त्यावेळी बिबट्याने अचानकपणे येऊन बकरी फस्त केली. या घटनेची माहिती मिळताच आजूबाजुच्या ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यावेळी बकरी मृतावस्थेत पडलेली होती. त्यामुळे वनविभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे. शेतकऱ्यांचे यामध्ये आर्थिक नुकसान झाले असून, तशी तक्रार वनविभाग व पशुसंवर्धन विभागाकडे करण्यात आली आहे.

# पावसामुळे बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांचे सोयाबीन भिजले

## शेड केव्हा होणार?, शेतकरी संकटात

**अमरावती/प्रतिनिधीः-** पावसामुळे आधीच शेतातील सोयाबीनचे पीक जवळपास हातचे गेले आहे. अशा परिस्थितीत पावसापासून कसेबसे वाचलेले सोयाबीन शेतकऱ्यांनी शनिवारी अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विकायला आणले होते. मात्र दुपारच्या सुमारास पुन्हा पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे सोयाबीन भिजले. शेतकऱ्यांना केवळ तीन ते साडेतीन हजार रूपये प्रति क्विंटल एवढाच भाव मिळाला. हीच स्थिती जिल्हाभरात असल्याने शेतकरी पूर्णतः हतबल झाला असल्याचे दिसून आले.

दिवाळीनंतर बाजार समितीमध्ये सोयाबिनची आवक वाढली असून, अमरावती बाजार समितीत शनिवारी १४ हजार ४८४ पोते सोयाबिनची आवक झाली. सोयाबीन चांगल्या दर्जाचे असूनही योग्य भाव न मिळाल्याने काही शेतकऱ्यांनी ते बाजार समितीतच ठेवण्याचा निर्णय

घेतला; मात्र पावसामुळे शेतकऱ्यांची दाणादाण उडाली. बहुसंख्य शेतकऱ्यांचे सोयाबीन हे आकाराने लहान दाण्याचे असून, अतिशय कमी उत्पादन झाले आहे. एका एकरात साधारणतः आठ ते नऊ क्विंटल सोयाबीन उत्पादन अपेक्षित असताना, कित्येक शेतकऱ्यांना कसेबसे दोन ते तीन क्विंटलच उत्पादन झाले आहे. त्यामुळे हाती आलेले सोयाबिन विकून चार पैसे खिशात येईल, या आशेने शेतकऱ्यांनी सोयाबिन बाजार समितीत आणले. सरासरी एकरी ३५ हजार रूपये खर्च येत असून, माल वाहतुकीचा व हमालीचा खर्च वेगळा आहे, अशा परिस्थितीत शेतकऱ्यांचे सोयाबीन ठेवायला बाजार समितीत मात्र शेड उपलब्ध नसल्यामुळे सोयाबीनचा माल उघड्यावरच ठेवावा लागला. अशा परिस्थितीत व्यापारी मात्र नैसर्गिक संकटांचा व अडचणींचा गैरफायदा घेत

शेतकऱ्यांची लुबाडणूक करित असल्याचा आरोपही शेतकऱ्यांनी यावेळी केला. शनिवारी आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांसह व्यापाऱ्यांचाही माल भिजला; परंतु व्यापाऱ्यांनी खरेदी केलेला माल ठेवण्यासाठी शेड उपलब्ध आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणलेला माल पावसात

भिजला तरी उघड्यावरच ठेवावा लागतो. बाजार समितीच्या संचालकांपैकी कुणीही आवारामध्ये फिरकले नसल्याचा आरोप शेतकऱ्याने केला. काही शेतकऱ्यांना तर सोयाबीन झाकण्यासाठी ताडपत्रीही घरून आणावी लागल्याचे सांगितले.

# कृषी साहित्य विक्रेत्यांचा मंगळवारी बंद

**अमरावती :** कृषी विक्रेत्यांसाठी राज्य सरकारने लागू केलेल्या साथी ॲप व नव्याने येणाऱ्या पेस्टिसाइड ॲपविरोधात मंगळवार, २८ ऑक्टोबर रोजी बंद पुकारण्यात आला आहे. या राज्यस्तरीय बंदला अमरावती जिल्हा कृषी साहित्य विक्रेता सेवा संघाने पाठिंबा दिला आहे. त्यामुळे मंगळवारी जिल्ह्यातील सर्व कृषी साहित्य विक्रीची सर्व दुकाने बंद राहणार आहेत.

या बंददरम्यान रक्तदान शिबिर घेण्यात येणार आहे. राज्य सरकारने कृषी विक्रेत्यांसाठी साथी ॲप अनिवार्य केले असून त्यावर कृषी साहित्यांची खरेदी-विक्रीची ऑनलाइन नोंदणी करावी लागणार आहे. ॲप लागू करण्यास यापूर्वीही कृषी साहित्य विक्रेत्यांनी विरोध करीत बंद पुकारला होता. मात्र, कृषी आयुक्तांनी संघटनेच्या शिष्टमंडळासोबत चर्चा करण्याची व बदल करण्याची तयारी दर्शविल्याने त्यावेळी बंद स्थगित करण्यात आला होता. दरम्यान, आता साथी ॲपसोबतच पेस्टिसाइड ॲपही लागू करण्यात येत आहे. यामुळे कृषी विक्रेत्यांवरील कामाचा ताण वाढण्यासोबतच व्यवहार प्रभावित होण्याची शक्यता आहे. राज्य सरकारच्या या धोरणाविरोधात येत्या मंगळवार, २८ ऑक्टोबर रोजी राज्यव्यापी बंद पुकारण्यात आला असून त्यादिवशी कृषी सेवा केंद्र बंद राहणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कृषी निविष्ठा मिळणार नाहीत. बंददरम्यान रक्तदान शिबिर घेण्यात येणार आहे.

## १ व १० वरील उर्वरित

### दिवाळी-छठपूजा उत्सवासाठी नागपूरहून पुणे,

दादर स्थानकावर थांबणार आहे. गाडीला दोन वातानुकूलित द्वितीय श्रेणी, एक वातानुकूलित तृतीय श्रेणी, बारा शयनयान, चार सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन सामान्य द्वितीय श्रेणी कोचसह गार्ड ब्रेक व्हॅन राहणार आहे.

नागपूरला येणाऱ्या गाड्या

ट्रेन नंबर ०१४०१ पुणे-नागपूर स्पेशल पुणे स्थानकावरून सोमवारी रात्री ८:३० वाजता नागपूरकडे निघेल. मार्गातील दौंड कॉर्ड लाइन, अहिल्यानगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा स्थानकावर ही गाडी थांबेल. या गाडीला एक वातानुकूलित द्वितीय श्रेणी, एक वातानुकूलित तृतीय श्रेणी, तेरा शयनयान, चार सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन सामान्य द्वितीय श्रेणी कोचसह गार्ड ब्रेक व्हॅन राहणार आहे.

### 'अदानी समूहात LIC ची ३.९

त्यांनी म्हटलंय. या प्रकरणाचा तपास संयुक्त संसदीय समिती (जेपीसी) आणि लोकलेखा समितीकडून (पीएसी) करण्याची मागणीही कॉंग्रेसने केली आहे.

### इंजिनात बिघाड झाल्याने एस.टी.

घटनेची माहिती दिली.

या आगीत माहिती देणारे कांबळे यांचे वाहन चालवण्याचा परवाना, आधारकार्ड, पॅनकार्ड, नियमित वापरातील शासकीय गणवेश, तसेच प्रवासी निखील दत्तात्रय मेटे याचा वनप्लसचा टॅब, चार्जर, कपडे, पाकीट, आधारकार्ड, लायसन्स, पॅनकार्ड, युनियन बॅंक व बॅंक ऑफ महाराष्ट्रचे एटीएम कार्ड अशा एकूण ३५ हजार रुपयांच्या वस्तू जळाल्या. तर प्रवासी पार्थ सचिन काळे याचे कपडे, बॅग, पॉवर बॅंक, चप्पल, चार्जर, वॉलेट व त्यातील १,००० रुपये; ओंकार बंडू मदने याचे कपडे, पाकीट, लायसन्स, पॅनकार्ड व ५,७०० रुपयांची रोकड; धनंजय विठ्ठल कांबळे यांच्याकडील गळ्यातील ४ तोळ्यांचा सोन्याचा गंठण, १ तोळ्याची सोन्याची अंगठी, कानातील दीड तोळ्याचे सोन्याचे दोन जोड, चांदीचे पैंजण, १२ साड्या, गाडीचे आर.सी. बुक, लायसन्स, पॅनकार्ड, आधारकार्ड, असा एकूण ३ लाख ३० हजार रुपयांच्या वस्तूंचा ऐवज जळाला. अक्षय पांडुरंग तनपुरे यांच्याकडील ४.८ तोळ्यांचा सोन्याचा गंठण व पाच साड्या असा २ लाख ५० हजार रुपयांचा ऐवज; ऋषिकेश हरी खंडागळे यांचा लिनोआ व थिंक पॅड एचपी कंपनीचा लॅपटॉप, चार्जर, सर्व कपडे, वॉलेट, पैसे, मोबाईल चार्जर, एचडीएफसी व एसबीआय बॅंकेची एटीएम कार्डे, कंपनीचे आयकार्ड व आधारकार्ड असा १ लाख रुपयांच्या वस्तूंचा तोटा झाला आहे. नेहा गोविंदराव पाटील यांचे कपडे, मोबाईल चार्जर, वॉलेट व त्यातील कागदपत्रे बॅंक ऑफ बडोदा व युनियन बॅंकेची पासबुक्स, एटीएम कार्ड, आधारकार्ड, पॅनकार्ड व रोख १२,८०० रुपये असा एकूण १३ हजार रुपयांचा तोटा झाला आहे. तसेच जगन्नाथ साहेबराव जाधव यांची बॅग व त्यातील साहित्य, प्रिंटर, चार्जर, डबा, आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदानकार्ड व पत्नीची सर्व कागदपत्रे, तसेच ३,५०० रुपयांची रोकड असा ४,५०० रुपयांचा ऐवज आगीत जळाला असल्याची माहिती पोलिस ठाण्यात देण्यात आली आहे.

### रेल्वे रुळावर रील बनवताना ट्रेन

पंचनामा करण्यात आला आहे. दोघांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी भुसावळ येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत.

रीलच्या नादात वाढणारे जीवघेणे प्रकार स्मार्टफोन आणि सोशल मीडियाच्या युगात रील बनवण्याच्या नादात अनेक तरुण जीव धोक्यात घालत आहेत. रेल्वे रुळ, धोकादायक ठिकाणे किंवा चालत्या वाहनांवर स्टंट करताना अपघातांचे प्रमाण अलीकडे वाढले आहे. या घटनेने स्थानिक परिसरात तसेच संपूर्ण जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### आजी-माजी आमदार, माजी

माजी मंत्री नरेंद्र कुमार नीरज उर्फ गोपाल मंडल, आमदार हिमराज सिंह, माजी मंत्री संजीव श्याम सिंह, माजी विधान परिषद आमदार महेश्वर प्रसाद यादव, माजी आमदार संजय प्रसाद, माजी आमदार श्याम बहादूर सिंह , माजी आमदार रणविजय सिंह, माजी आमदार सुदर्शन कुमार, माजी आमदार प्रभात किरण अमर कुमार सिंह डॉ. आसमा परवीन लब कुमार आशा सुमन दिव्यांशु भारद्वाज विवेक शुक्ला

### 'सत्तेत आलो तर आम्ही वक्फ

लढाई आहे. लोक गेल्या २० वर्षांपासून नितीश कुमारांना कंटाळले आहेत. सरकारच्या प्रत्येक विभागात भ्रष्टाचार बोकाळला आहे आणि कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. नितीश कुमार आणि नरेंद्र मोदी यांच्या दीर्घ कारकिर्दीनंतरही बिहार हे देशातील सर्वात गरीब आणि मागासलेले राज्य आहे, असा आरोप केला.

### तिरंग्या झेंड्यांच्या गजरात

घोषणा देऊन सत्तेत आलेल्या सरकारने शेतकऱ्यांना आजतागायत दिलासा दिला नाही.ना कर्जमाफी, ना हमीभाव — उलट केंद्र सरकारच्या चुकीच्या आयात-निर्यात धोरणामुळे शेतकरी आर्थिक संकटात कोसळला आहे. कापसाची आयात वाढल्याने देशांतर्गत भाव कोसळले, तर सोयाबीनचा किमान आधारभूत भाव ५३३५ असूनसुद्धा शेतकऱ्यांना फक्त ५०० ते ?३००० दरम्यान विक्री करावी लागते.'हा कोणता आत्मनिर्भर भारत?' असा प्रश्न शेतकऱ्यांच्या प्रत्येक तोंडावर आहे.

'ही लढाई अंतिम!' बच्चू कडूंचा इशारा-

'आता हा महाएल्गार शेतकऱ्याच्या न्यायाचा आहे, ही लढाई शेवटची आहे. आम्ही मागे फिरणार नाही,' बेलोराहून निघणारी ही रॅली केवळ शेतकऱ्यांची नाही, तर महाराष्ट्रातील प्रत्येक कष्टकरी, परिश्रमी माणसाचा आवाज बनणार आहे.

-बच्चू कडू, प्रहार जनशक्ती पक्ष

### राष्ट्रवादी संघटक महासचिव

कामाला लागा,असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे संघटक महासचिव आमदार संजय खोडके यांनी केले. आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पूर्व तयारीच्या अनुषंगाने पश्चिम विदर्भाच्या दौऱ्यावर असलेले राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे संघटक महासचिव आमदार - संजय खोडके यांच्या अध्यक्षतेखाली आज रविवार दिनांक २६ ऑक्टोबर २०२५ रोजी अमरावती जिल्हा ग्रामीण राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मार्गदर्शन करतांना आ.संजय खोडके यांनी सांगितले कि, अमरावती जिल्ह्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीची विचारधारा मानणारा व राष्ट्रीय अध्यक्ष तसेच राज्याचे उप-मुख्यमंत्री नामदार - अजितदादा पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास दर्शविणारा मोठा जनाधार आहे. मात्र याचे रूपांतर मतांमध्ये होतांना दिसत नाही. याबाबत चाचपणी केली असता आपल्याकडे प्रबळ, सक्षम व बलाढ्य असे उमेदवार नसल्याने आपण निवडणुकांमध्ये कधीही ७ ते १० जागांच्या वर कधी पोहोचलो नाही. आता कार्यकर्त्यांनी एकजूट होऊन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीला बळ द्यायचे आहे. यासाठी आगामी निवडणुकांमध्ये इच्छुक असलेले व निवडून यायचे प्रबळ दावेदार असणारे उमेदवार देखील आपल्याला शोधायचे आहे. यासाठी सर्व तालुका प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आपले सर्कल अथवा गण मध्ये बारकाईने आढावा घेतल्यास उमेदवार निश्चित करणे सोपे जाईल. काही जागांवर आपण मजबूत असू तर काही तुल्यबळ लढत होईल, मात्र या निवडणुकीत आपल्याला राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीची कामगिरी सुधारावयाची असल्याचे सांगून आमदार - संजय खोडके यांनी ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह निर्माण केला.

तत्पूर्वी या बैठकीमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे संघटक महासचिव आमदार- संजय खोडके यांनी अमरावती जिल्हा परिषदेच्या ५९ सर्कल, ११ नगर पालिका व ११८ पंचायत समितीच्या गण बाबत सविस्तर आढावा घेतला. बैठकीमध्ये राष्ट्रवादीच्या महिला पदाधिकारी सुरेखाताई ठाकरे यांनी सुद्धा कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतांना स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीत राष्ट्रवादी निर्णायक असून आपल्या शिवाय सत्ता स्थापन होणार नाही. म्हणून पक्षाने स्थानिक उमेदवाराला बळ देण्याची विनंती केली. तर प्रास्ताविक करतांना राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे यांनी अमरावती ग्रामीण भागात कार्यकर्त्यांमध्ये असलेला संभ्रम दूर करून स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर विजयी होण्यासाठी पक्षाची तयारी असून पोषक वातावरण असल्याचे सांगितले.

या बैठकीला राष्ट्रवादी कॉंग्रेस जिल्हा ग्रामीणचे पदाधिकारी, तालुकाध्यक्ष तसेच माजी नगराध्यक्ष व जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य तसेच कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

### १४ एकर शेतीत फक्त

राहतात, प्रत्यक्षात शेतकऱ्यांना दिलासा मिळत नाही. या घटनेने पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या दैन्याची आणि कृषी क्षेत्रावरील संकटाची जाणीव करून दिली आहे. तज्ज्ञांच्या मते, नुकसान भरपाई वेळेवर मिळाली नाही, तर आत्महत्यांची मालिका ग्रामीण भागात अधिक वेग घेऊ शकते. दरम्यान, प्रशासनाने घटनेचा पंचनामा करून मदतीच्या प्रक्रियेला गती देण्याचे आश्वासन दिले आहे.

### शिवसंकल्प पदाधिकारी प्रशिक्षण

पाहिजे.' ते पुढे म्हणाले, 'मित्रांमध्ये समजूतदारपणा हवा, अन्यथा 'तुले ना मले, घाल कुत्र्याले' अशी वेळ येऊ शकते.' राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बोलताना त्यांनी सांगितले की, 'शेतकऱ्यांच्या घरातील कार्याची जबाबदारी आता शिवसेनेने घेतली आहे. शिवसेना त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी आहे.'

'घरात बसून फोक्या मारणारा मुख्यमंत्री जनतेला आवडत नाही,' असा अप्रत्यक्ष टोला त्यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लगावला. तसेच, 'बाळासाहेबांच्या शिवसेनेचा वारसा आम्हीच जपतो आहोत,' असेही त्यांनी ठामपणे नमूद केले.

लाडकी बहीण योजना बंद होणार नसल्याचे आश्वासन देतानाच, मतदार याद्यांतील बोगस मतदार शोधण्याचे आणि पक्षाने विकसित केलेल्या 'लक्ष्यवेध'अ?पच्या माध्यमातून निवडणुकीचे हायटेक नियोजन करण्याचे आवाहनही त्यांनी केले. जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी सांगितले की, 'शिवसैनिकांनी आगामी निवडणुकीत विजयाचा भगवा फडकविण्याचा शिवसंकल्प करावा. या निवडणुका म्हणजे युद्ध असून, त्या जिंकण्यासाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक आहेत.'

केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी विश्वास व्यक्त केला की, 'शिवसेना हा सर्वसमावेशक पक्ष असून, जनतेचा कायम विश्वास मिळवतो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिवसेनेला एकहाती सत्ता मिळेल.' मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले, 'यवतमाळ हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. ज्याचे संघटन मजबूत आहे त्याला कोणीही हरवू शकत नाही.'

संघटन कौशल्य आणि डिजिटल नियोजनाचे प्रशिक्षण-

या शिबिरात जिल्ह्यातील दोन हजारांहून अधिक पदाधिकाऱ्यांना संघटनात्मक कौशल्य, संवादकौशल्य, समाज माध्यमांचा प्रभावी वापर आणि सामाजिक जबाबदारी या विषयांवर प्रशिक्षण देण्यात आले. शिवसेनेचे विश्वनाथ केळकर यांनी 'लक्ष्यवेध' अ?पचे सादरीकरण करून त्याद्वारे बोगस मतदार ओळखण्याच्या पद्धतीची माहिती दिली. सचिव भाऊसाहेब चौधरी यांनी संघटन बांधणीबद्दल मार्गदर्शन केले, तर प्रवक्त्या डॉ. ज्योती वाघमारे यांनी 'राजकारणात महिलांचा सहभाग' या विषयावर मार्गदर्शन करून महिला आघाडी ही पक्षाची रणरागिणी असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किशोर राठोड यांनी केले.

### अतिवृष्टीतून बचावलेला कापूस

फुटेला कापूस सुद्धा ओला झाला. कापसाची प्रत बिघडली अतिवृष्टीने शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले असूनही उरलासुरला घासही अवकाळी पावसाने हिरावल्याचे चित्र सध्या दिसत आहे. शनिवारी झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी कापणी करून लावलेल्या सोयाबीनच्या गंज्या अवकाळीने ओल्या झाल्या. त्यामुळे शेतकरी रडकुंडीच आला आहे. एकीकडे खरिपाचा हंगाम अतिवृष्टीने हातून गेला. शेतकऱ्यांच्या आशा आता रब्बीच्या हंगामावर टिकून आहे. परंतु सध्या होत असलेल्या अवकाळी पावसामुळे रब्बीच्या हंगामासाठी करावी लागणारी पूर्व मशागत लांबणीवर पडणार आहे. त्यामुळे रब्बीचा हंगामही धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. ऑगस्ट सप्टेंबर च्या रेकॉर्ड ब्रेक पावसाने तालुक्यात ओला दुष्काळ निर्माण झाला असतानाही शासनाकडून मात्र तुटपुंजी मदत देऊन शेतकऱ्यांची बोळवण करून जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार शासनाकडून होत आहे. आर्थिक कचाट्यात सापडलेला शेतकरी शासनाच्या धोरणामुळे पूर्णतः खचून गेला. अस्मानी व सुलतानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्याची पाठ नैसर्गिक संकट सोडायला तयार नाही आणि शासनही शेतकऱ्याच्या पाठीशी खंबीर उभे नसल्याचे दिसून येते.

### तलवारीच्या हल्ल्यात

नागरिकांनी वेळीच हस्तक्षेप करून स्थिती नियंत्रणात आणली. फिर्यादीची तक्रार मिळताच पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीस ताब्यात घेतले. तपास पोउपनि. दिपेश ठाकरे करीत आहेत.

### केकदाखेडा, कवडाझिरी भागात

प्रकरण परिक्षेत्र कार्यालयाकडे पाठविलेले आहे. यापूर्वी मेळघाट प्रादेशिक वनविभाग परतवाडाच्या सुसर्दा येथील जंगलात पशुपालक बाबाराव दलाले यांचा एक बैल पण वाघाने ठार केलेला होता. शेतकऱ्यांनी दोन जनावरे गमावल्याने लाखोचा फटका बसलेला असून शेतीची कामे खोळंबलेली आहेत.

कवडाझिरी परिसरातील टिटम्बा, खिडकी, कासमार, रबांग, धोदरा, सावऱ्या, मोगर्दा, केकदाखेडा गावात वाघाची प्रचंड दहशत पसरलेली आहे. हरिसाल, चौराकुंड, रोरा, ढाकणा, बोथरा, धुळघाट, वान, रंगुबेली, मालुरवन, चिखली, केसरपूर, कोलकास भागात यावर्षी सतत पट्टेदार वाघाचा फेरफटका नोंद झालेला आहे. अकोट वन्यजीव विभागाच्या केकदाखेडाच्या जंगलात वाघाचा संचार नेहमी असतो. वन्य प्राण्यांपासून मेळघाटवासीयांना सुरक्षित करण्यासाठी उपाययोजना करण्याची गरज आहे.

### केळझरजवळ थरारक अपघात

स्वाती मेघराज रजत हे चारही जण जखमी झाले. स्थानिक ग्रामस्थांनी तत्काळ धाव घेऊन जखमींना रुग्णालयात दाखल केले. सुदैवाने गंभीर जीवितहानी टळली.या घटनेनंतर सेलू पोलिसांनी कार मालक दीपक साळुंखे आणि त्यांचा अल्पवयीन मुलगा यांच्या विरोधात बेपर्वाईने वाहनचालकाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. केळझर परिसरात या घटनेमुळे एकच खळबळ उडाली.

### वर्धा बसस्थानकावर महिलांची

संयम ठेवण्याचे आवाहन केले आहे. दिवाळीनंतरच्या या गर्दीच्या पार्श्वभूमीवर वर्धा बसस्थानकावर पोलिस बंदोबस्त वाढवण्यात यावा अशी मागणी होत आहे. महिलांच्या हाणामारीच्या घटनेमुळे स्थानिकांकडून प्रशासनावर नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. सुरक्षित प्रवास, जागेची शिस्त आणि व्यवस्था राखणे याच्या मागणीसाठी प्रवाशांमध्ये असंतोष असून गर्दीच्या काळात बस स्थानकावरील सुरक्षा गार्ड आणि पोलिस प्रयत्नांची प्रशंसा केली जात आहे,

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# डॉक्टर तरुणीच्या आत्महत्येप्रकरणात मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

**सातारा-** साताऱ्यातील फलटण येथे उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या एका महिला डॉक्टरने आत्महत्या केल्याच्या घटनेनंतर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. या महिला डॉक्टरने स्वत:चं जीवन संपवण्यापूर्वी तळहातावर सुसाइड नोट लिहिली होती, ज्यामध्ये काही जणांची नावे घेत गंभीर आरोप करण्यात आले होते. या घटनेवर राज्यभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटत असून विरोधकांकडून सत्ताधारी पक्षांवर आणि राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली जात आहे.

यादरम्यान काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी आज मयत महिला डॉक्टरच्या कुटुंबीयांची भेट घेतली. बीड जिल्ह्यातील त्यांच्या घरी जाऊन त्यांनी ही भेट घेतली आहे. यावेळी प्रणिती शिंदे यांनी कुटुंबीयांशी संवाद साधत विचारपूस केली आणि त्यांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी या प्रकरणात न्याय मिळवून देण्यासाठी मी आपल्या सोबत आहे, असा शब्द



देखील त्यांनी दिला.

खासदार प्रणिती शिंदे यांनी यावेळी राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केल्याचे पाहायला मिळाले. इतकेच नाही तर त्यांनी यावेळी गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याचीही मागणी केली.

प्रणिती शिंदे म्हणाल्या की, 'राज्याचे गृहमंत्री अथवा मुख्यमंत्री वारंवार तक्रार करूनसुद्धा महिलांना संरक्षण देण्यापेक्षा महिला खासदारांवर खालच्या पातळीवर जाऊन टीका करण्यातच वेळ वाया घालवतात. पण जेव्हा महिलांना संरक्षण देण्याची वेळ येते तेव्हा मात्र मुख्यमंत्री आणि गृहमंत्री हे हात वर करतात, ज्यामुळे त्यांनी महाराष्ट्राची संस्कृतीची पातळी एकदम खालच्या स्तरावर आणली आहे. मला असं वाटतं की मुख्यमंत्री-गृहमंत्र्यांनी राजीनामा देणं गरजेचं आहे.' दरम्यान या प्रकरणात नुकतेच मोठी अपडेट समोर आली आहे. या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी पीएसआय पोलिसांना शरण आल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणात पोलिसांनी शनिवारी संशयित आरोपी प्रशांत बनकरला अटक केली होती, त्यानंतर शनिवारी रात्री उशिरा मुख्य संशयित आरोपी निलंबित पीएसआय गोपाळ बदने हा पोलिसांना शरण आला, त्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केलं असून या प्रकरणातील ही दुसरी अटक आहे. या संदर्भातील वृत्त एएनआय या वृत्तसंस्थेने दिलं आहे.

## संक्षिप्त

### ६६ व्या वर्षी १० व्या बाळाची आई!

**जर्मनी-** ६६ वर्षीय अलेक्झांड्रा हिल्डब्रँट यांनी यावर्षी अलीकडेच त्यांच्या दहाव्या बाळाला जन्म दिला. त्यासंदर्भात त्या सांगतात, या वयात अपत्यप्राप्ती झाल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचवलेल्या असल्या, तरी व्यक्तिगत स्तरावर त्यांना काहीही फरत पडलेला नाही. त्यांचा धाकटा मुलगा फिलिप याचा जन्म १९ मार्च रोजी बर्लिनमधील शारिएट हॉस्पिटलमध्ये सिझेरियन शस्त्रक्रियेद्वारे झाला. जन्माच्या वेळी त्याचं वजन सात पाउंड १३ औंस इतकं होतं. जन्मानंतर त्याला श्वसनासाठी ऑक्सिजन थेरपीवर ठेवण्यात आलं होतं, मात्र अलेक्झांड्रांनी स्पष्ट केलं की, 'फिलिपच्या वेळी गर्भधारणा पूर्णपणे नैसर्गिक पद्धतीने आणि कोणत्याही अडचणीशिवाय झाली होती.'



### 'मी दहशतवाद्यांचा सामना करू शकतो, पण..'

**नवी दिल्ली** -पंजाबचे माजी पोलीस महासंचालक मोहम्मद मुस्तफा आणि त्यांची पत्नी, माजी मंत्री रझिया सुलताना गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहेत. एकेकाळी पंजाबमध्ये अंमली पदार्थां विरोधातील लढाईचे नेतृत्व केल्यामुळे त्यांचे कौतुक झाले होते. मात्र अंमली पदार्थांच्या विरोधातील खरी लढाई ते स्वतःच्या घरातच लढत होते. काही दिवसांपूर्वी मुलाचा मृत्यू झाल्यानंतर मोहम्मद मुस्तफा वादाच्या भोवऱ्यात अडकले. नुकतेच त्यांनी इंडियन एक्सप्रेसशी बोलत असताना आपल्या मनातील दुःखाला वाट मोकळी करून दिली.



### शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहणार



**कराड :** शिक्षकांना जुनी पेन्शन (निवृत्ती वेतन) योजना व टप्पा वाढ अनुदान देण्यासह मुख्याध्यापक व एकूणच शिक्षण क्षेत्रासमोरील प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही राज्याचे पर्यटनमंत्री तथा साताराचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळाच्या कराड येथे आयोजित दोन दिवसीय ६४ व्या अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून मुकेश पाटील (नंदुरबार) हे तर, स्वागताध्यक्ष म्हणून राज्याचे माजी सहकारमंत्री बाळासाहेब पाटील हे उपस्थित होते. आमदार महेश शिंदे, आमदार जयंत आसगावकर, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे आदींची प्रमुख उपस्थिती होती. अधिवेशनास राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दूरभाष्य प्रणालीद्वारे अधिवेशनाला संबोधित करताना, शिक्षक, मुख्याध्यापकांप्रती सद्भावना व्यक्त केली. त्यांच्या न्याय भूमिकेस समर्थन असल्याचे उभय नेत्यांनी सांगितले.

### मुंबई-गोवा महामार्गावर 'ओंकार' हत्तीचा दुसऱ्यांदा प्रवेश

**सावंतवाडी:** मुंबई-गोवा महामार्गावरील इन्सुली गावात सध्या 'ओंकार' नावाच्या हत्तीचा वावर वाढला असून, त्याला पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी उसळत आहे. या हत्तीने काल (शनिवारी) सायंकाळी आणि आज (रविवारी) सकाळी महामार्ग ओलांडला, या दरम्यान दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प झाली होती. ओंकार हत्ती मूळात दोडामार्ग तालुक्यातून सावंतवाडी तालुक्यात नेतर्डे परिसरात दाखल झाला होता. तेथून त्याने गोवा राज्यात प्रवेश केला आणि पुन्हा फिरून कास, मडुरा, रोणापाल या भागांमध्ये त्याचा वावर वाढला. अखेर, काल शनिवारी संध्याकाळी तो थेट मुंबई-गोवा महामार्गावरील इन्सुली गावात दाखल झाला.शनिवारी सायंकाळी इन्सुलीच्या भरवस्तीत कुडवतेंब, सावंतटेंब येथून हा हत्ती निघून गेला होता. मात्र, आज रविवारी सकाळी सुमारे ७ वाजता ओंकार पुन्हा महामार्गावर आला. तेरेखोल नदी पात्रात जाण्याचा त्याचा प्रयत्न होता.महामार्गावर झालेल्या प्रचंड गर्दीमुळे आणि वाहतुकीमुळे वनविभागाची मोठी दमछाक झाली. अखेर, सकाळी ९ च्या सुमारास हा हत्ती तेरेखोल नदी पात्रात उतरून लगतच्या बागायतीमध्ये गेला.



### राज ठाकरेंच्या आयुष्यावर महेश मांजरेकर करणार होते

**मुंबई -** मनसे अध्यक्ष राज ठाकरेंचे मराठी इंडस्ट्रीमधील कलाकारांबरोबर चांगले ऋणानुबंध आहेत. मराठी इंडस्ट्रीमधील अनेक कलाकार मंडळींनी ते राज ठाकरेंचे चाहते असल्याचं अनेकदा म्हटलं आहे. त्याचबरोबर अनेक कलाकारांचे राज ठाकरेंबरोबर मैत्रीपूर्ण संबंध आहेत. लोकप्रिय मराठी दिग्दर्शक व अभिनेते महेश मांजरेकर हे तर राज ठाकरेंचे चांगले मित्र आहेत. राज ठाकरे आणि महेश मांजरेकरांच्या मैत्रीबद्दल सर्वांनाच ठाऊक आहे.मराठी अभिनेते व दिग्दर्शक महेश मांजरेकर हे सध्या त्यांच्या 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' या सिनेमामुळे चर्चेत आहेत.

## सातारा महिला डॉक्टरच्या प्रकरणावर राहुल गांधींचा खळबळजनक आरोप

**नवी दिल्ली :** सातारा जिल्ह्यामधील फलटण उपजिल्हा रूग्णालयाच्या महिला डॉक्टरने आपले जीवन संपवले. मूळ बीडची असलेली पीडित डॉक्टर गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळली होती. पीडित डॉक्टरने आपल्या हातावर सुसाईड नोट लिहिली. त्यामध्ये दोन जणांची नावे लिहिलेली, यामध्ये पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने आणि प्रशांत बनकर यांची नावे होतीत. या प्रकरणामध्ये आता दोघांना अटक घेतली असून या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

अशातच या प्रकरणावर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आपली प्रतिक्रिया देताना जोरदार टीका केली आहे.

सातारा जिल्ह्यातील महिला डॉक्टरने छळ आणि अत्याचाराला कंटाळून



आत्महत्या केली. ही घटना समाजाला हादरवणारी आहे. जनतेचे रक्षण करण्याची जबाबदारी असलेल्यांनीच त्यांच्यावर बलात्कार आणि शोषण केले.

भाजपशी संबंधित काही प्रभावशाली लोकांनी त्यांना भ्रष्टाचारासाठी दबाव आणण्याचा प्रयत्न केला. ही संस्थात्मक हत्या असून, भाजप सरकारचा अमानवी चेहरा यातून उघड झाला आहे. आम्ही पीडितेच्या कुटुंबासोबत आहोत आणि न्याय मागणार असं म्हणत राहुल गांधी यांनी टीका केली आहे.

ज्यांच्यावर जनतेचे रक्षण करण्याची जबाबदारी होती, त्यांनीच त्यांच्यावर अत्याचार केला. वृत्तांनुसार, भाजपशी संबंधित काही मोठ्या लोकांनी त्यांना भ्रष्टाचारात ओढण्याचा प्रयत्न केला. ही सत्तेचा गैरवापर करून गुन्हेगारांना संरक्षण देण्याची अत्यंत वाईट घटना आहे. याला आत्महत्या म्हणता येणार नाही, ही एक संस्थात्मक हत्या आहे. जेव्हा सत्ता गुन्हेगारांना वाचवते, तेव्हा न्याय कसा मिळणार? या न्यायाच्या लढाईत आम्ही डॉ. संपदा यांच्या कुटुंबासोबत ठामपणे उभे आहोत. आता भारताच्या प्रत्येक मुलीला भीती वाटता कामा नये. आम्हाला न्याय हवा असल्याचं राहुल गांधींनी म्हटलं आहे.

दरम्यान, या प्रकरणातामधील पीडित डॉक्टरने हातावर नावे लिहिलेले दोघेही आता पोलिसांच्या ताब्यात आहेत. अटकेत असलेल्या बनकर याच्या बहिणीने तर डॉक्टरने आपल्या भावाला प्रपोज केल्याचं म्हटलं होतं. त्यासोबतच दोघांचे कॉल डिटेल्स चेक केल्यावर त्यांच्यात फोनवर बोलणे आणि मेसेज झाल्याचं समोर आलं होतं. त्यामुळे पोलीस तपासात या प्रकरणाचा सर्व उलगडा होण्याची शक्यता आहे.

## महायुतीतील इच्छुकांपुढे उमेदवारीची अडचण



**पुणे :** मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती म्हणून एकत्र लढणार का, याबाबत उलट सूलट विधाने येत असल्याने स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रसार माध्यमांशी बोलताना महायुतीची हाक द्यायची आणि कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात 'एकला चलो'चा नारा द्यायचा, या दुटप्पी भूमिकेमुळे कार्यकर्त्यांनाही 'कोणता झेंडा घेऊ हाती,' असा प्रश्न पडला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यापूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या महायुती एकत्रित लढणार असल्याचे स्पष्ट केले होते. मात्र, त्याचवेळी कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात या नेत्यांकडून स्वतंत्र लढणार असल्याचा कानमंत्र आपल्या पदाधिकाऱ्यांना, माजी नगरसेवकांना दिला आहे. अजित पवार यांनी माजी नगरसेवकांच्या अनौपचारिक बैठकीत पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस स्वतंत्र लढेल, अशी भूमिका घेतली होती. गत महापालिकांतील निवडून आलेल्या नगरसेवकांची गणिते बघितली तर पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये महायुती म्हणून लढणे भाजपसाठी धोक्याची घंटा असल्याचे चित्र दिसते.

## बोगस मतदार शोधून काढा; मनसेचा जळगावमधील कार्यकर्त्यांना आदेश !

**जळगाव :** मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी मतदार यादीतील घोळावरून थेट निवडणूक आयोगाला आव्हान दिले असून, महायुतीवरही आरोप केले आहेत. या पार्श्वभूमीवर, जळगाव जिल्ह्यातील मनसेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना देखील आता आगामी निवडणुकांपूर्वी बोगस मतदार शोधून काढण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका, नगर परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची संघटनात्मक बैठक महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांच्या आदेशानुसार पक्ष नेते माजी आ. ॲड. जयप्रकाश बाविस्कर यांच्या अध्यक्षते खाली पार पडली. त्या ठिकाणी स्थानिक स्वराज्य



संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची संघटनात्मक तयारी आणि निवडणूक रणनिती बाबत सविस्तर चर्चा झाली. सर्व १५ तालुक्यांतील पदाधिकारी, शेतकरी सेना, महिला सेना, विद्यार्थी सेना आणि विविध अंगीकृत संघटनांचे प्रतिनिधी यांची मते जाणून घेतली गेली. आगामी निवडणुकांमध्ये मनसेची संघटनशक्ती दाखविण्याची खरी वेळ आली आहे. मनसेची ओळख म्हणजे शिस्त, प्रामाणिकपणा आणि निडरपणे सत्यासाठी उभे राहणे. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकांमध्ये मनसे हा पर्याय नाही तर गरज ठरेल, असे माजी आ. बाविस्कर म्हणाले.

प्रत्येक तालुक्यातील पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी आपल्या भागातील मतदार याद्यांचे व्यवस्थित अवलोकन करून घ्यावे. दुबार नावे तसेच याद्यांमधील अनियमितता शोधून काढावी. कुठे काही अनुचित प्रकार घडल्याचे लक्षात आल्यास त्याची माहिती जिल्हास्तरावर द्यावी. जिल्ह्यातील मनसेच्या रिक्त पदांची पुनर्नियुक्ती आणि आवश्यक संघटनात्मक बदल करून योग्य व्यक्ती योग्य ठिकाणी असावी.

## 'मला निष्कारण अडकवले जातय'; निलंबित पीएसआय गोपाळ बदनेची पहिली प्रतिक्रिया

**फलटण-** 'मला निष्कारण अडकवले जात आहे' अशी प्रतिक्रिया गोपाळ बदने याने दिली असून तो रात्री पोलीस ठाण्यात स्वतःहून हजर झाला. त्यानंतर त्याला फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयात मेडिकलसाठी घेऊन जाताना बदने याने ही प्रतिक्रिया दिली आहे.

फलटण उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी पदावर कार्यरत असणाऱ्या पीडित महिला डॉक्टरने तळहातावर सुसाईड नोट लिहून आत्महत्या केली. तिने एका पीएसआय सोबतच पोलीस कर्मचाऱ्यावर आरोप केले. पीएसआय गोपाळ बदने व घर मालक प्रशांत बनकर यांची थेट नावे पीडितेने हातावर लिहित गंभीर खुलासे केले काल दुपारी प्रशांत बनकर याला पोलिसांनी कोर्टात हजर



केले असता त्याला २८ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

पीडिता डॉक्टर हिने पीएसआय गोपाळ बदने याने चार वेळा बलात्कार केल्याचा आरोप केला आहे. संपदा यांच्या आत्महत्येनंतर पीएसआय बदने फरार होता. काल रात्री उशिरा पीएसआय बदने स्वत: पोलिसांसमोर हजर झाला. पीएसआय गोपाल बदने याची एक तास कसून चौकशी केल्यानंतर त्याला मेडिकलसाठी नेण्यात आले. डॉक्टर आत्महत्या प्रकरणातील आरोपी पीएसआय गोपाल बदने याला उपजिल्हा रुग्णालयात मेडिकलसाठी रात्री उशिरा नेण्यात आले.

मेडिकलसाठी नेण्यात येताना पीएसआय गोपाळ बदने याने म्हटले की, 'मला निष्कारण अडकवले जात आहे' त्याचबरोबर गाडीत बसल्यानंतर माध्यमांच्या कॅमेरासमोर बदने याने हातही जोडले. पीएसआय गोपाळ बदने याला आज दुपारी कोर्टात हजर केले जाणार आहे.

## 'आनंदाचा शिधा' गायब? गोरगरिबांची दिवाळी झाली कडू; गृहिणींमध्ये उमटतोय नाराजीचा सूर

**मुंबई :** राज्य सरकार कडून दरवर्षी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर राबवला जाणारा 'आनंदाचा शिधा' या वर्षी राबवण्यात आलेला नाही. परिणामी, अनेक कुटुंबांना सणासुदीच्या काळात अतिरिक्त धान्य, साखर किंवा तेल यांचा लाभ मिळणार नाही. यामुळे महागाईच्या झटक्याने त्रस्त असलेल्या सर्वसामान्य नागरिकांच्या नाराजीचा सूर वाढताना दिसत आहे.

दिवाळी संपली, पण सरकारकडून 'आनंदाचा शिधा' दिला नाही ! सणासुदीच्या काळात महागाईने आधीच कंबर तोडली असताना, यंदा आनंदाचा शिधा दिला नसल्याने लाडक्या बहिणी नाराज झाल्या आहेत. दरवर्षी दिवाळीपूर्वी राज्य



सरकारतर्फे गरजू कुटुंबांना 'आनंदाचा शिधा' म्हणून साखर, रवा, डाळ, तेल, मसाले यांचे पॅकेज दिले जाते. पण यंदा तो उपक्रम अचानक बंद झाला. त्यामुळे हजारो कुटुंबांची दिवाळी अक्षरशः 'फिकी' झाली आहे.

रेशनवर गहू अन् तांदूळ दुकानावर ग्राहकांना आम्ही गहू आणि तांदूळ देतो असे गोरेगाव पूर्वेतील रेशन दुकानदाराने सांगितले. तर मुंबईत गव्हाचा साठा मुबलक असून ग्राहकांना ज्वारी द्यायचा प्रश्नच येत नाही. ग्राहकांना गहू आणि तांदूळाचे वितरण करण्यात आले असल्याचे अन्न व नागरी पुरवठा अधिकारी म्हणाले.सरकारने यंदा गोरगरिबांना आनंदाचा शिधा दिला नाही आणि त्यांची दिवाळी कडू केली. जनतेचा आनंद हिरावणाऱ्या सरकारने दिवाळीतही आभाळाएवढी त्यांची निराशा केली. सण संपला, शिधा पण दिला नाही. सुनील प्रभू उद्धवसेनेचे नेते, आमदार

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, २७ ऑक्टोंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

## मेहकर–मालेगाव रोडवर भीषण अपघात
# दोन तरुणांचा जागीच मृत्यू




**- मुंदडा मार्केटजवळ शनिवारी रात्रीची घटना**
**- लक्झरी बसने दुचाकीला दिली जोरदार धडक**

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

**मेहकर-मालेगाव रोडवर मुंदडा मार्केटजवळ शनिवारी रात्री झालेल्या भीषण अपघातात दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.**

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, तिगाव (ता. पांढुर्ना, जि. छिंदवाडा, म.प्र.) येथील विकास रघुनाथ नेहारे (वय २०) आणि विकास बाबूराव नेहारे (वय २१) हे दोघे दुचाकीवरून मेहकरच्या दिशेने येत असताना लक्झरी बस (क्र. श्प ३७ ऊ ९९८८) ने समोरून जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की, दोघांचाही घटनास्थळीच मृत्यू झाला.

या अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांना माहिती देत जखमींना रुग्णालयात हलविण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र तोपर्यंत दोघेही मृत घोषित करण्यात आले.

या घटनेची फिर्याद आकाश बाबूराव नेहारे (वय २३, रा. तिगाव पांढुर्ना) यांनी मालेगांव पोलिस ठाण्यात दिली असून, लक्झरी बस चालक राजू विठ्ठल खडसे (वय ५३, रा. वाईलिंगी, ता. पुसद, जि. यवतमाळ) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मालेगांव पोलिसांनी अपघात क्र. ४८३/२५ अंतर्गत कलम १०६(१), २८१ भा.दं.वि. तसेच मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे मृतांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून तिगाव गावात हळहळ व्यक्त होत आहे.

## शेतातील घराला लागलेल्या आगीत शेतीसाहित्य जळून खाक

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

तालुक्यातील मारसुळ येथील गट नंबर ४२५ मध्ये वंदनाबाई रंजन घुगे यांच्या शेतात शेतीसाठी ठेवलेले साहित्य व निवारा म्हणून बांधलेल्या घरास दिनांक २४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी अंदाजे दहा वाजता अचानक आग लागून मोठे नुकसान झाले. या आगीत घरावर ठेवलेले सुमारे ८० पाईप, दोन तोटे सेट, दोन पाण्याच्या मोटारी, तीन फवारणी पंप, दोन एकर क्षेत्रातील ठिबक संच, फिल्टर दोन तसेच इतर शेतीसाहित्य जळून खाक झाले आहे.

या आगीत एकूण अंदाजे दोन ते अडीच लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे पंचनाम्यात नमूद करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच तहसील कार्यालयातील





कर्मचारी, तलाठी बानाईत, तलाठी घुगे, कृषी सहाय्यक वानखेडे सर तसेच पोलिस पाटील संदीप घुगे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. दरम्यान, रब्बी हंगाम सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर ही दुर्घटना झाल्याने शेतकरी घुगे कुटुंबावर आर्थिक संकट कोसळले आहे. शेतीसाठी लागणारे सर्व आवश्यक साहित्य जळून खाक झाल्याने आगामी हंगामातील शेतीकामांवर परिणाम होणार आहे. या घटनेचा विचार करून शासनाने तत्काळ मदतीचा हात द्यावा व नुकसान भरपाई मंजूर करावी, अशी मागणी परिसरातील शेतकरी बांधवांनी केली आहे.

## मालेगावात गुटखा माफियांचा धुमाकूळ
### दररोज लाखोंची उलाढाल : प्रशासनाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष



■ अक्षय सावले ■

**मालेगाव :** शहरात गुटखा माफियांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून रोज लाखो रुपयांची उलाढाल होत आहे. गुटखा विक्रेत्यांचे जाळे शहराच्या कानाकोपऱ्यात पसरले असून प्रशासन मात्र याकडे अर्थपूर्ण डोळेझाक दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे.

शहरातील बहुतांश शासकीय कार्यालयांमध्ये अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून खुलेआम गुटखा सेवन केले जात असल्याचे उघड झाले आहे. कार्यालयांच्या भिंतींवर दिसणारे लालसर थुंकीचे डाग गुटखा बंदीचा फज्जा उडवत असल्याचे जिवंत उदाहरण ठरत आहेत.

गुटखा विक्रेत्यांचे काही अधिकारी आणि स्थानिक प्रभावशाली व्यक्तींशी अर्थपूर्ण संबंध असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे. त्यामुळेच प्रशासनाकडून ठोस कारवाई न होण्याचे कारण लोकांच्या चर्चेचा विषय ठरत आहे.

राज्य सरकारने काही वर्षांपूर्वी गुटखा विक्री आणि सेवनावर संपूर्ण बंदी घातली असली तरी मालेगावात ही बंदी केवळ कागदोपत्रीच असल्याचे वास्तव समोर येत आहे. शहरातील तरुण वर्ग या व्यसनाच्या विळख्यात सापडत असून त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. गुटख्याच्या वाढत्या व्यापारावर नियंत्रण ठेवण्यासाठी अन्न औषध विभाग आणि पोलिस प्रशासनाने तातडीने संयुक्त मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा आगामी काळात या बेकायदेशीर व्यवसायाचा अधिकच विस्तार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## महादेवा योजनेअंतर्गत फुटबॉल निवड चाचणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राज्यातील फुटबॉल खेळाचा विकास, प्रचार व प्रसार करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत 'महादेवा' ही महत्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्स्फॉर्मेशन (MITRA), सिडको आणि वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (WIFA) यांच्या संयुक्त विद्यमाने ही योजना राज्यभर सुरू करण्यात आली आहे.या योजनेद्वारे राज्यातील युवकांना फुटबॉल खेळात करिअर घडविण्यासाठी प्रोत्साहन देणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्याअंतर्गत १३ वर्षांखालील मुले व मुलींसाठी जिल्हा, विभागीय व राज्यस्तरावर फुटबॉल निवड चाचण्यांचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या निवड चाचण्यांमधून निवड झालेल्या प्रतिभावान फुटबॉलपटूंना १४ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई येथे जागतिक कीर्तीचे फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी यांच्यासोबत खेळण्याची अभूतपूर्व संधी मिळणार आहे.

## आजाद समाज पार्टीच्या नगरपरिषद निवडणुकीच्या तयारीचा प्रारंभ



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

दिनांक २५ ऑक्टोबर २०२५ रोजी मंगरूळपीर येथील स्थानिक विश्रामगृहात आजाद समाज पार्टी (कांशीराम) वाशिम जिल्ह्याच्या वतीने नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित आढावा बैठक व पक्षप्रवेश कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान तालुका अध्यक्ष संजय खडसे यांनी भूषविले, तर प्रमुख अतिथी म्हणून राज्य महासचिव दत्तराव धांडे, राज्य उपाध्यक्ष सिद्धार्थ देवरे, पश्चिम विदर्भ महासचिव किशोर मानकर, प्रा. विठ्ठलराव खाडे उपस्थित होते.

यावेळी वाशिम जिल्हाध्यक्ष सुभाष अंभोरे, उपाध्यक्ष संजय पडघन, जिल्हा सचिव केशव उचित, जिल्हा प्रभारी पुष्पाताई खंडारे, तालुका अध्यक्ष किशोर खडसे, तालुका महासचिव रवी वानखेडे, जम्मुभाई पठाण, तालुका सचिव वाघमारे ताई आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात समाजातील अनेक मान्यवरांनी आजाद समाज पार्टीमध्ये प्रवेश करून पक्षाला बळकटी दिली. प्रमोदभाऊ भगत, प्रेमकुमार इंगोले, पंजाबराव कांबळे, विजय भगत, संजय खाडे, बबन वंजारे, विनोद नंदागवळी यांनी आजाद समाज पार्टीत प्रवेश केला. सर्व नवागत कार्यकर्त्यांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. राज्य कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या भाषणातून कार्यकर्त्यांना प्रोत्साहित करताना म्हटले की, 'येणाऱ्या नगरपालिका निवडणुकीत आजाद समाज पार्टीने संघटन बळकट करून जनतेच्या मनात विश्वास निर्माण करावा. हीच संधी सोनं करण्याची वेळ आहे. माननीय चंद्रशेखर आजाद साहेबांच्या नेतृत्वाखाली सामाजिक न्याय व समानतेचा लढा अधिक जोमाने लढवायचा आहे.'

## भावनिक वातावरणात साजरा झाला विचार मंचचा भाऊबीज सोहळा

■ प्रतिनिधी | कारंजा ■

संत गाडगेबाबा विचार मंच बहुउद्देशीय संस्था, कारंजा यांच्या वतीने श्री भायजी महाराज वृद्धाश्रमात भगिनींसाठी विशेष भाऊबीज सोहळा अत्यंत भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला.

या सोहळ्यात भगिनींनी आपुलकी, स्नेह आणि प्रेमाचा अनमोल क्षण अनुभवला. भाऊबीजचा साज, प्रेमाचा दिवा आणि वृद्धाश्रमातील आनंदाचा सुगंध यामुळे वातावरण भावनिक आणि उत्साही झाले.

'नातं रक्ताचं नव्हे, मनाचं असतं; स्नेहाच्या धाग्याने माणूस जोडतं'या भावनिक संदेशाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

वृद्धाश्रमा तील भगिनींनी विचार मंच संस्थेच्या सदस्यांना ओवाळनी करत भाऊबीज साजरी केली. तसेच वृद्धाश्रमात असलेल्या बांधवांना संस्थेच्या महिला सभासदांनी ओवाळनी करत मिठाई खाऊ घालत भाऊबीज साजरी केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वनाथ राऊत उपस्थित होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून श्याम सवाई (सासप्रमुख ) संतोष धोंगडे (अध्यक्ष, संत गाडगेबाबा विचार मंच बहुउद्देशीय संस्था, कारंजा) आणि पुजा राधेश्याम राठोड (अध्यक्षा, भायजी महाराज संस्था, कारंजा) यांनी उपस्थिती दर्शवून भगिनींशी संवाद साधला.

या उपक्रमातून समाजात समता, प्रेम आणि आत्मीयतेचा संदेश पोहोचविण्याचा सुंदर प्रयत्न करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विचार मंचचे उपाध्यक्ष राजेश चंदन, सचिव रोहित देशमुख, सदस्य सुरेश तिडके, प्रवीण तुपोणे, वसंतराव देशमुख (मार्गदर्शक), सचिन कोळसकर, करण पवार, प्रदीप राऊत, सुरज गुल्हाने आणि कार्याध्यक्ष भारत हांडगे यांनी मोलाचे योगदान दिले. या आगळ्या-वेगळ्या भावस्पर्शी उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## जनावरांच्या कोठ्यांसाठी मंजुरीत गैरव्यवहाराचा आरोप

**पंचायत समिती मालेगाव विरोधात आंदोलनाची घोषणा**

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव तालुक्यातील जनावरांच्या कोठ्यांसाठी मंजुरी मिळविण्यासाठी पंचायत समितीत गैरव्यवहार होत असल्याचा गंभीर आरोप करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने २८ ऑक्टोबर २०२५ रोजी पंचायत समिती कार्यालयावर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याची घोषणा केली आहे.

या संदर्भात गट विकास अधिकारी, पंचायत समिती मालेगाव यांना निवेदन सादर



करण्यात आले आहे. निवेदनात म्हटले आहे की — मागील काही दिवसांपासून पंचायत समिती मालेगाव येथे जनावरांच्या कोठ्यांसाठी मंजुरी देताना आर्थिक देवाणघेवाण केली जात असल्याची चर्चा असून, प्रस्ताव सादर केलेल्या शेतकऱ्यांच्या अर्जांकडे प्रशासन दुर्लक्ष करत आहे.शेतकऱ्यांनी अनेक दिवसांपासून कोठ्यांसाठी अर्ज सादर करूनही संबंधित अधिकाऱ्यांनी त्यावर कोणतीही दखल घेतलेली नाही. मात्र, प्रत्येक प्रस्तावासाठी पाच हजार रुपये दिल्यास मंजुरी दोन दिवसांत मिळत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.याबाबत आधीही प्रशासनाला निवेदन देऊन तक्रार करण्यात आली होती, परंतु कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे आता शेतकरी आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने २८ ऑक्टोबर रोजी पंचायत समिती कार्यालयावर लोकशाही मार्गाने जनआंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे.निवेदनात पुढे म्हटले आहे की, 'या आंदोलनातून उद्भवणाऱ्या सर्व परिणामांना पंचायत समिती प्रशासन जबाबदार राहील,' असा इशारा देण्यात आला आहे.या निवेदनावर भगवान बोरकर, गजानन बोरचाटे आणि विजय शेंडगे यांसह स्थानिक शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

प्रतिलिपी जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम, मुख्य कार्यकारी अधिकारी वाशिम, तसेच पोलीस स्टेशन मालेगाव यांना देण्यात आली आहे.

**जिल्हा जलसंधारण विभाग**
**जिल्हा परिषद (ल.पा.) वाशिम**

ई- निविदा सूचना क्रमांक ०२ / सन २०२५-२६
पहिली वेळ

अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांचे वतीने जिल्हा जलसंधारण अधिकारी जिल्हा परिषद (ल.पा.) वाशिम हे कामांच्या ब-१ दोन लिफाफा पद्धतीने ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या योग्य त्या वर्गातील जिल्हा परिषदेकडील नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागवीत आहे. कामाची निविदा केवळ ई - निविदा पद्धतीने सादर करावयाची आहे.

विस्तृत निविदा http://mahatender.gov.in या वेबसाईटवर पाहण्यास दिनांक २७/१०/२०२५ पासून उपलब्ध आहे.

**जिल्हा जलसंधारण**
**अधिकारी (ल.पा.)**
जिल्हा परिषद, वाशिम करिता

## पत्रकारांच्या लेखणीला दिला आदराचा मान !
### अजय घुगे यांच्या हस्ते पत्रकारांचा सन्मान सोहळा संपन्न

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

सत्यासाठी लढणाऱ्या आणि समाजातील समस्यांना आवाज देणाऱ्या मालेगांवातील पत्रकार बांधवांचा आदरपूर्वक सन्मान सोहळा व दिवाळी भेट कार्यक्रम सामाजिक कार्यकर्ता अजय उत्तमराव घुगे यांच्या पुढाकारातून मालेगाव येथील विश्रामगृहात उत्साहात पार पडला या कार्यक्रमास मालेगावातील सर्व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहिले कार्यक्रमादरम्यान पत्रकारांनी आपली मनोगत व्यक्त करताना सांगितले की, 'हा कार्यक्रम खरोखरच प्रेरणादायी असून, समाजात पत्रकारांचा सन्मान जपणारा उपक्रम क्वचितच पाहायला मिळतो.' कार्यक्रमात प्रकाश खिराडे , अरुण बळी , वसंतराव अवचार, अरविंद गाभणे , यांनी आपापली मतं व्यक्त करताना अजय घुगे यांच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. त्यांनी म्हटलं की, 'पत्रकार हा समाजाचा आरसा आहे, आणि त्याच्या मेहनतीचा असा सन्मान हा आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे प्रत्येक पत्रकाराला सन्मानचिन्ह व मिठाईचा डबा देऊन आदरपूर्वक गौरव करण्यात आला या कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्ते गजानन काळे, नागेश गरकळ, वैभव देव्हडे, पंकज महाकाळ, शुभम केकन, ऋषि सानप, उमेश आंधळे, प्रतिक राजुरकर यांची उपस्थिती लाभली संपूर्ण कार्यक्रम वातावरणात आपुलकी, आदर आणि दिवाळीचा उजाळा पसरवून गेला.



> 'अहोरात्र परिश्रम घेणारे पत्रकार बांधव समाजातील समस्या लोकांसमोर आणतात कुठलाही मोबदला न घेता जनतेसाठी झटणाऱ्या या पत्रकारांचा सन्मान करणे हे माझं सामाजिक कर्तव्य आहे दिवाळीच्या या मंगल प्रसंगी मी राजकारण न आणता, एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून पत्रकारांचा आदरपूर्वक सन्मान केला आहे. हा उपक्रम माझ्या मनापासूनचा आदर व्यक्त करण्याचा एक प्रयत्न आहे.'

## शिरपूर येथील युवक व ज्येष्ठांचा माजी खा. अनंतराव देशमुख, नकुल देशमुख यांच्या नेतृत्वात भाजपमध्ये प्रवेश

■ प्रतिनिधी | रिसोड ■

शिरपूर परिसरातील विविध राजकीय पक्षांतील अनेक युवक आणि ज्येष्ठ मंडळींनी भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेवर विश्वास ठेवत, माजी मंत्री व माजी खासदार अनंतराव देशमुख यांच्या नेतृत्वात तसेच भाजप रिसोड-मालेगाव विधानसभा निवडणूक प्रमुख नकुल देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

हा पक्षप्रवेश सोहळा रिसोड येथे अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजप जिल्हा सचिव गणेश इरतकर, शिरपूर शहराध्यक्ष प्रदीप राव देशमुख, ज्येष्ठ नेते डॉ. ढवळे, रामेश्वर



इरतकर, पवन गावंडे, संतोष शेंडे, शिवाजी लाहे आणि अमोल भांदुर्गे उपस्थित होते.या कार्यक्रमात मंगेश गावंडे, संतोष कुटाफळे, नंदू खोरणे, ज्ञानेश्वर लक्ष्मण खोरणे, पांडुरंग तुकाराम बोबडे, सुभाषराव खोरणे, मोहम्मद परसुवाले, संतोष घाटोळ, विश्वास गायके, ओम गावंडे, विलास गावंडे, विजय गावंडे, भारत गावंडे, प्रभू खोरणे, हरिभाऊ खोरणे, कैलासराव खोरणे यांसह अनेक युवक आणि ज्येष्ठ नागरिकांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.या प्रसंगी मा. माजी मंत्री अनंतराव देशमुख यांनी आपल्या भाषणात सांगितले की,'भारतीय जनता पक्षात प्रवेश घेतल्याने आपण सर्व विकासाच्या प्रवासात सहभागी होत आहात. आपल्या विश्वासाला तडा जाणार नाही, विकास हाच आपल्या कार्याचा मुख्य अजेंडा असेल.'तर नकुल देशमुख म्हणाले, 'शिरपूर आणि परिसरात नव्याने सामील झालेल्या सर्व कार्यकर्त्यांमुळे पक्ष अधिक बळकट होणार असून संघटन विस्ताराला नवी गती मिळेल.'या पक्षप्रवेशानंतर उपस्थित सर्व नव्या कार्यकर्त्यांना पक्षाचा रुमाल देऊन सन्मानपूर्वक स्वागत करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रमात उत्साह, एकता आणि पक्षनिष्ठेचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी अनेकांनी पुढील काळात भाजपच्या नेतृत्वाखाली विकासाच्या वाटचालीत सक्रियपणे सहभागी राहण्याची ग्वाही दिली.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३२७ ■ सोमवार, २७ ऑक्टोबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# सेवा हाच धर्म मानून सातत्याने चांगली कामे करा-

## आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

## -निरामय वर्धा अभियानाचे आरोग्य राज्यमंत्र्यांनी केले कौतूक

**-आरोग्य राज्यमंत्री व पालकमंत्र्यांच्या हस्ते साटोडा व बोरगाव (मेघे) पीएचसीचे ई-भूमीपूजन**

**-निरामय वर्धा अभियान यशस्वीतेसाठी सहाकार्य करणाऱ्यांचा सत्कार**



**वर्धा जनमाध्यम :** चांगले आरोग्य असेल तरच सशक्त राज्य उभे राहू शकते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात ग्रामीण भागामध्ये पाच किलोमीटरच्या परिसरात दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजे यासाठीचे नियोजन सुरू आहे. रुग्ण हा केंद्रबिंदू मानून आरोग्य विभाग काम करित आहे. सेवा हाच धर्म मानून सातत्याने चांगली कामे करा, असे आवाहन राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केले.

दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ मेडीकल सायन्य ऑडिटोरियम, सावंगी येथे आयोजित निरामय वर्धा अभियान सन्मान सोहळा तसेच साटोडा व बोरगाव (मेघे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे आभासी भूमीपूजन आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर व पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या.

याप्रसंगी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर, खासदार अनिल बोंडे, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, दत्ता मेघे उच्च शिक्षण आणि संशोधन संस्थेचे कुलगुरू डॉ. ललितभूषण वाघमारे, आरोग्य उपसंचालक डॉ. शशिकांत शंभरकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्निल बेले, प्रकल्प संचालक वैशाली रसाळ, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी मनिषा कुरसुंगे, संजय गाते, सुनिल गफाट, निलेश पोहेकर, आशिष कुचेवार, डॉ.गोयंका आदी उपस्थित होते.

आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर पुढे म्हणाल्या, छोट्या मोठ्या आरोग्य समस्यांसाठी ग्रामीण भागातील नागरिकांना उपचार घेण्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागणार नाही. आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करणे, तालुक्याच्या ठिकाणी डायलिसीसचे केंद्र सुरू करणे आदीचे काम सुरू आहे. टीबीमुक्त ग्रामपंचायत, तंबाखू मुक्त शाळा असे विविध उपक्रम राबविण्यासाठी सर्वांची सांगड घालणे गरजेचे आहे, असे त्या म्हणाल्या. मोतीबिंदू वयानुसार येत असून वेळीच उपचार नाही केले तर काचबिंदू होऊन अंधत्व येते. पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या संकल्पनेतून मोतीबिंदू असणाऱ्या रुग्णांवर उपचार व्हावे म्हणून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनापासून निरामय वर्धा अभियान राबविण्यात आले. अभियानातून मोठ्या प्रमाणावर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रीया झाल्या त्याबद्दल अभिनंदन केले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात २०४७ पर्यंत विकसित भारत करण्यासाठी राज्याच्या वतीने देखील प्रयत्न सुरू आहे. ?यासाठी टप्प्यांची आखणी करण्यात आली आहे. जगात कुठल्याही देशात नाही अशी कॅशलेस आयुष्मान भारत आरोग्य पॉलिसी सुरू करण्यात आली. या योजनेतून ५ लक्ष रुपयापर्यंतचे उपचार मोफत केले जातात. गावातील प्रत्येक कुटुंबाचे आरोग्य चांगले ठेवण्याचे काम आशाताई करित असतात. कोरोनाच्या काळात सुध्दा माझ्या कार्यक्षेत्रात येणारे लोक माझ्या कुटुंबाचे आहेत या भावनेने आशाताई यांनी काम केले. सेवा पंधरवड्यात स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानात राज्यातील १ कोटी ५० लक्ष महिलांची तपासणी करण्यात आली, असल्याचे त्यांनी सांगितले.

**साटोडा व बोरगाव (मेघे) पीएचसीचे आभासी भूमीपूजन**

आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर व पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते साटोडा व बोरगाव (मेघे) पीएचसीचे आभासी पध्दतीने भूमीपूजन करण्यात आले. बोरगाव प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ६ कोटी ९ लक्ष ५० हजार रुपये तसेच साटोडा प्राथमिक केंद्रासाठी ६ कोटी १० लक्ष रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या दोन्ही प्राथमिक आरोग्य केंद्रामुळे आरोग्य सेवा अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.

**निरामय वर्धा अभियानासाठी सहकार्य करणाऱ्यांचा सत्कार**

जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या निरामय वर्धा अभियानात (मोतीबिंदू विरहित अभियान) उत्कृष्ठ कामगिरी कामासाठी जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, महात्मे आय हॉस्पीटल नागपूर, महात्मा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस सेवाग्राम, आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी मेघे, इंडियन मेडिकल असोशिएशन, वर्धा आध्यात्मिक सोसायटी, निमा वर्धा या संस्थांचे अध्यक्ष, पदाधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुमंत वाघ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील बेले, जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वरकड, विश्वत्रिवेणी कॉटस्पिन प्राईवेट लिमिटेड हिंगणघाट, सर्व तालुका प्रशासन, निरामय वर्धा अभियानचे जिल्हा समन्वयक, तालुका समन्वयक, आकांक्षित तालुका कारंजा समन्वयक, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष, आशा स्वयंसेविकांना मान्यवरांच्याहस्ते गौरविण्यात आले. सुरुवातीला आरोग्य विभाग व उमेदच्यावतीने आयोजित प्रदर्शनीचे फित कापून मान्यवरांच्याहस्ते उद्घाटन करण्यात आले. तसेच मोतीबिंदू विरहित अभियानाच्या यशस्वीतेवर आधारित पुस्तिकेचे विमोचन देखील मान्यवरांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी केले. संचालन पल्लवी पुरोहित यांनी केले तर आभार डॉ. प्रशांत वाडीभस्मे यांनी मानले.

## वंचितांच्या चेहऱ्यावर फुलले हसू : अंबिका सोशल फाउंडेशनने केली गोड दिवाळी





**वर्धा जनमाध्यम :** अन्नदान हेच श्रेष्ठदान या उदात्त विचारातून अंबिका सोशल फाउंडेशनकडून समाजातील वंचित आणि निराधार घटकांसाठी यंदाही गोड दिवाळी साजरी करण्यात आली.

संस्थापक अध्यक्षा अंबिका हिंगमिरे यांच्या संकल्पातून गेल्या सहा वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने सुरू असून, यातून अनेक कुटुंबांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हसू फुलले आहे. लक्ष्मीपूजनाचा दिवस सर्वांसाठी सणाचा असतो. मात्र, वंचित वर्गाला या दिवशी उपासमारीला सामोरे जावे लागते. हीच जाणीव लक्षात घेऊन फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी रेल्वे स्थानक, बसस्थानक आणि मुख्य चौकांमध्ये स्वतःच्या हस्ते गोडधोड जेवण वितरित केले. त्यामुळे वंचितांनाही सणाचा आनंद अनुभवता आला.या उपक्रमात धीरज सायंकार, रोहन सायंकार, प्रवीण बोटकुळे, रोशन चंदेल, कृष्णा सायंकार, उदय कळंबे, कुणाल मोरकर, ऋषीकेश साटोणे, कार्तिक डोमडे, राहुल ईखार, आकाश कुलबांधे, आकाश सुखदेवे, रवी सांडे, सतीश झाडे आणि प्रदीप वाघाडे आदी कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. सामाजिक कार्याचा ध्यास आमचा संकल्प समाजातील दीनदुबळ्या आणि वंचित घटकांना मदत करणे हेच माझे ध्येय आहे.

मी २० टक्के समाजकारण आणि १० टक्के राजकारण करते. स्वा व साखरेचे वाटपासह विविध उपक्रमांमधून सुमारे पाच हजार गरजूंना मदतीचा हात दिला, असे अंबिका हिंगमिरे यांनी सांगितले.

## वर्ध्यात मेणबत्ती आंदोलनातून संतापाचा उद्रेक

### -डॉ.मुंडे प्रकरणी विद्यार्थ्यांचा तीव्र निषेध; उच्चस्तरीय चौकशीची मागणी

**वर्धा जनमाध्यम :** फलटण येथील तरुण वैद्यकीय विद्यार्थिनी डॉ. संपदा मुंडे यांच्या मृत्यूने राज्यभर हळहळ व्यक्त होत आहे. हा मृत्यू अपघाती नसून संशयास्पद असल्याचा आरोप करत वर्ध्यात विद्यार्थ्यांनी रविवारी रात्री मेणबत्ती आंदोलन करून तीव्र निषेध व्यक्त केला.श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक चौकात नागरिक, विद्यार्थी आणि सामाजिक संघटना एकत्र येऊन डॉ. मुंडेंना आदरांजली वाहिली. हातात मेणबत्त्या आणि डोळ्यांत संतापाचे अश्रू घेऊन विद्यार्थ्यांनी डॉ. संपदाला न्याय मिळालाच पाहिजे अशा घोषणा दिल्या.आंदोलकांनी सरकारकडे मागणी केली की या मृत्यूची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा व्हावी. तसेच वैद्यकीय शिक्षणातील विद्यार्थ्यांवरील मानसिक दडपशाही आणि अन्यायकारक वागणुकीवर तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. आंदोलनस्थळी विद्यार्थ्यांच्या डोळ्यात दुःख आणि ओठांवर न्यायाची हाक स्पष्ट दिसत होती. आज संपदासाठी लोक एकवटलेत; उद्या ही लढाई प्रत्येक विद्यार्थ्याच्या हक्कांसाठी असेल, असे म्हणत आंदोलनाचा आवाज अधिक तीव्र झाला.



## आर्वीत दीपज्योत रंगोत्सवात उत्साहाचा झंकार; ६०० स्पर्धकांचा सहभाग

**आर्वी जनमाध्यम :** दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शहरात रंगांची उधळण करत दीपज्योत रंगोत्सव २०२५ या ऑनलाईन रंगोली स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्याचे आयोजन जल्लोषात पार पडले. तब्बल ६०० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवत या उपक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद दिला.या सोहळ्याला आर्वी विधानसभा आमदार आ. सुमित वानखेडे, माजी नगराध्यक्ष प्रशांत सव्वालाखे, श्री संताजी अखिल तेली समाज संघटन युवा आघाडी अध्यक्ष मनोज आगरकर, परीक्षिका सौ. पूनम तरोने केने, समाजसेविका सौ. साधना आजमिरे, शिक्षिका सौ. संगीता मोरे, तसेच समाज कार्यकर्ते अर्सलान खान, सुधीर जाचक आणि शेख रमजान शेख अमीर उपस्थित होते.या उपक्रमाचे आयोजन व संयोजन सौ. स्नेहल सुमित शिंगाणे मिस्कन यांनी केले. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते विजेते व उपविजेत्यांना पारितोषिके व प्रमाणपत्रे देण्यात आली.




'कलेचा सन्मान, एकतेचा अभिमान रंगोलीतून सजलेला सृजनोत्सव या घोषवाक्याने दीपज्योत रंगोत्सवाने यंदाही आर्वीकरांच्या मनात सृजनतेचा झंकार जागवला.

## १४ एकर शेतीत फक्त दीड पोते सोयाबीन; कर्जाच्या ओझ्याने शेतकऱ्याची आत्महत्या



**वर्धा जनमाध्यम :** अतिवृष्टी, नापिकी आणि वाढत्या आर्थिक ताणामुळे विदर्भातील शेतकऱ्यांचे जीवन संकटात आले आहे. अशाच एका परिस्थितीत सिंदी रेल्वे जवळील हरदुलालपुरा गावातील ६३ वर्षीय शेतकरी ज्ञानेश्वर वामन वाघमारे यांनी कर्जबाजारी पणाला कंटाळून आत्महत्या केली.

१४ एकर शेतीत पेरलेले सोयाबीन अखेर फक्त दीड पोते मिळालं, आणि यामुळे हताश झालेल्या वाघमारे यांनी शनिवारी सायंकाळी विष प्राशन केलं.पावसाच्या अनियमिततेमुळे आणि कीडग्रस्त पिकांमुळे वाघमारे यांचं संपुर्ण उत्पादन हातातून गेलं. कर्जफेडीचा तगादा, वाढते दर, आणि घरगुती जबाबदाऱ्या या सर्व गोष्टींनी त्रस्त होऊन त्यांनी टोकाचा निर्णय घेतला. ग्रामस्थांनी त्यांना तातडीने सेवाग्राम रुग्णालयात दाखल केलं, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.मृत वाघमारे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत असून, शेतकरी संघटनांनी प्रशासनाकडे तत्काळ मदतीची मागणी केली आहे. स्थानिकांनी सरकारच्या मदतीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करत सांगितले की, जाहीर झालेल्या योजना कागदापुरत्याच राहतात, प्रत्यक्षात शेतकऱ्यांना दिलासा मिळत नाही. या घटनेने पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या दैन्याची आणि कृषी क्षेत्रावरील संकटाची जाणीव करून दिली आहे. तज्ज्ञांच्या मते, नुकसान भरपाई वेळेवर मिळाली नाही, तर आत्महत्यांची मालिका ग्रामीण भागात अधिक वेग घेऊ शकते. दरम्यान, प्रशासनाने घटनेचा पंचनामा करून मदतीच्या प्रक्रियेला गती देण्याचे आश्वासन दिले आहे.

## जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील: पालकमंत्री डॉ. भोयर



**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याच्या भूमिकेची पुनरुच्चार पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केला. नालवाडी ते मसाळा या रस्त्याच्या लोकार्पण कार्यक्रमात ते बोलत होते. या रस्त्याची गरज नागरिकांकडून अनेक वेळा व्यक्त केली जात होती. आज लोकार्पण झाल्याने परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. आमदारपदाच्या कार्यकाळात रस्ते, नाली, आरोग्य सुविधा यांसाठी सतत प्रयत्न केले. आता जिल्ह्याची जबाबदारी मिळाल्याने उद्योग, रोजगार आणि पर्यटन क्षेत्राचा विकास साधून वर्ध्याला प्रगत जिल्ह्यांच्या श्रेणीत आणण्याचा निर्धार असल्याचे त्यांनी सांगितले.तरुण पिढीमध्ये वाढते नैराश्य ही गंभीर बाब असून जीवनातील समस्यांकडे सकारात्मक दृष्टीने पाहिल्यास मार्ग नक्की सापडतो, असे डॉ. भोयर यांनी सांगितले. समाजात चांगल्या विचारांची जोपासना होणे आवश्यक असल्याचाही त्यांनी उल्लेख केला.मसाळा गावात वृक्षवल्ली समाज ग्रुप तर्फे सुरू असलेल्या वृक्षारोपण उपक्रमाचे आणि स्वावलंबी पुरुष गट तसेच निर्माण महिला बचत गट यांच्या कार्याचे डॉ. भोयर यांनी कौतुक केले. प्रत्येक घरातून वृक्षारोपणाची सुरुवात करण्याचे आवाहनही त्यांनी केले.या कार्यक्रमाला विस्तार अधिकारी सुनिल गावंडे, घनश्याम भिमटे, प्रकाश महाराज वाघ, माजी सरपंच संदीप पाटील, राजू धमाने, दीपक चव्हाण, अजय वरटकर, दिनेश वरटकर, संदेश किटे, किशोर कुहीकर आदी उपस्थित होते.

## वर्धा बसस्थानकावर महिलांची धुमश्चक्री दिवाळीनंतरच्या गर्दीत जागेसाठी हातापाई

### पोलिस हस्तक्षेपाने थांबला वाद



**वर्धा जनमाध्यम :** दिवाळीनंतर वर्धा बसस्थानकावर नागपूर आणि यवतमाळ मार्गावर जाणाऱ्या बसांमध्ये अभूतपूर्व गर्दी उसळली आहे. रविवार दुपारी प्रवाशांनी जागा मिळवण्यासाठी सीटवर कपडे टाकून जागा राखण्याचा प्रयत्न केला, मात्र बसमध्ये चढल्यावर विविध प्रवाशांमध्ये जागेसाठी वाद विकोपाला गेला. या गोंधळात दोन महिलांमध्ये जागेसाठी तीव्र तू-तू, मैं-मैं झाली आणि प्रकरण हातपायीपर्यंत पोहोचले.

बसस्थानकातील चढाओढी, सीटची मारामारी आणि महिलांची झुंज याचा डोंगर पोलिस व सुरक्षा रक्षकांना पाठीमागे लागला. अखेर पोलिसांनी तत्परता दाखवत दोन्ही महिलांना वेगळे केले आणि गर्दीवर नियंत्रण मिळवले. दिवाळीच्या सुटीमुळे प्रवासासाठी खचाखच गर्दी होत असून सीट मिळवण्यासाठी प्रवाशांमध्ये तणावाची स्थिती आहे. बस स्थानक प्रशासनाने अतिरिक्त बसेसची सोय केली असली तरी लोकांच्या प्रवासाच्या वेगाला बस आणि व्यवस्था पुरेशा पडत नाही.परिवहन प्रशासनाने प्रवाशांना शिस्त आणि संयम ठेवण्याचे आवाहन केले आहे. दिवाळीनंतरच्या या गर्दीच्या पार्श्वभूमीवर वर्धा बसस्थानकावर पोलिस बंदोबस्त वाढवण्यात यावा अशी मागणी होत आहे. महिलांच्या हाणामारीच्या घटनेमुळे स्थानिकांकडून प्रशासनावर नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. सुरक्षित प्रवास, जागेची शिस्त आणि व्यवस्था राखणे याच्या मागणीसाठी प्रवाशांमध्ये असंतोष असून गर्दीच्या काळात बस स्थानकावरील सुरक्षा गार्ड आणि पोलिस प्रयत्नांची प्रशंसा केली जात आहे.



## राजकारणाच्या व्यासपीठावरून काव्याच्या रिंगणात आ.वानखेडे

**कारंजा (घा.) जनमाध्यम:** राजकारणाच्या बेड्यांत अडकलेल्या समाजाला काव्याची गरज अधिक आहे, संतांच्या अभंगातून 'तेरा तुझको अर्पण' ही शिकवण मिळावी, समाज सावरावा आणि माणूसपण वाचवावं, हे शब्द आमदार सुमित वानखेडे यांनी कवी संमेलनाच्या व्यासपीठावर ठणकावले.कारंजा कला क्रीडा अकादमीतर्फे बँक ऑफ इंडिया समोरील गार्डनमध्ये भरलेल्या या कॅल्चरच्या गदारोळात आमदार वानखेडे यांनी स्वतःचा साहित्यिक चेहरा दाखवत उपस्थितांची मने जिंकली. अभियंता, नेता आणि आता कवी अशी बहुरंगी ओळख त्यांनी ठसठशीतपणे मांडली.प्रा. प्रदीप दाते, प्रा. विजया मारोतकर, आयोजक विलास वानखेडे यांच्या उपस्थितीत जोरदार शायरी, कविता आणि अभंगांची बरसात झाली. सुरेश मलवे यांच्या ना गाडी ना घोडा ना कार पाहिजे, आज माणसातला माणूस पाहिजे, या कवितेने सडकून टाकलं, तर निलेश देशमुख, राजेश माहूरकर, लक्ष्मी डांगोरे, दीपाली बारंगे यांसह तरुण कवींनी शब्दांची जुगलबंदी रंगवली.आ. वानखेडे यांनी समाजाचं विद्रुप वास्तव कवितेतून सांगितलं. उपस्थितांनी 'वन्स मोर'चा पुकारा करत दाद दिली.

आयोजक विलास वानखेडे यांची 'श्वास' गझल, आणि प्रा. दाते यांच्या साहित्यिकांची टंचाई दूर व्हावी, म्हणून अशा उपक्रमांची निकड आहे, या धारदार भाष्याने संमेलनात गडद छटा रंगल्या.शेवटी, गडद आवाज, तिखट शब्दांनी भरलेला हा काव्य महामेळा कळसाला पोहोचला. संचालन कोमल चाफले व योगिता ठोंबरे यांनी केले.

## 'वीज प्रवाहीत कुंपनाने घेतला तरुणाचा बळी

**तळेगाव (श्या.पंत.) :** वन्यप्राण्यांपासून पिकाच्या संरक्षणासाठी शेताला लावण्यात आलेल्या तारेच्या कुंपनात विद्युत प्रवाहित करण्यात आला. याच विद्युत प्रवाहित तारेचा स्पर्श झाल्याने नितुन देहारे रा. पारडी (२७) याचा मृत्यू झाला. ही घटना शनिवारी पारडी येथे घडली. मिळालेल्या माहितीनुसार, बागुलकर यांच्या शेतात वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण व्हावे म्हणून तारेच्या कुंपनाला विद्युत प्रवाह सोडण्यात आला होता. शनिवारी नितुन हा कामावर गेला. तो वेळीच परत न आल्याने कुटुंबीयांनी शोध घेतला. दरम्यान, नितुनचा मृतदेह शेतात आढळला. मृतदेहाच्या शेजारीच तारही होता. त्यामुळे विद्युत प्रवाहीत तारेचा स्पर्श झाल्यानेच नितुनचा मृत्यू झाल्याचा अंदाज वर्तविला जात आहे. या घटनेची माहिती मिळताच ठाणेदार मंगेश भोयर यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपनिरीक्षक किशोर खंडार, निखिल पाटील, निखिल काळे, जयसिंग पुरे, श्रीकांत नाईकवाडे यांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला.



# संपादकीय

प्रबंध संपादकः प्रदीप देशपांडे

## रूपयाच्या जागतिकीकरणाकडे

भारतातून होत असलेला रूपी सेटलमेंटचे विस्तार, मुक्त व्यापार करारांमध्ये स्थानिक चलनात व्यवहारावर दिलेले प्राधान्य आणि रिझर्व्ह बँकेची धोरणात्मक पावले या सर्वांचा उद्देश एकच आहे आणि तो म्हणजे डॉलरवरील अवलंबित्व कमी करून रुपयाला जागतिक व्यापार चलन म्हणून प्रतिष्ठा मिळवून देणे, हा होय.भारतीय रुपया हे केवळ देशांतर्गत चलन राहिलेले नाही; तर तो जागतिक आर्थिक घडामोडींत महत्त्वाची भूमिका बजावू लागला आहे. डॉलरवरील अवलंबित्वातून मुक्त होण्यासाठी भारताने घेतलेला पुढाकार हा केवळ आर्थिक नव्हे, तर धोरणात्मक बदलाचे स्पष्ट संकेत देणारा आहे. स्थानिक चलनाद्वारे देण्यात येणारे व्यवहारांना प्राधान्य, मुक्त व्यापार करारांमध्ये रुपया सेटलमेंटला देण्यात येत असलेले महत्त्व आणि विदेशी गंगाजळीवरील दबाव कमी करण्यासाठीची निश्चित भूमिका, या सर्वांमुळेच भारत आंतरराष्ट्रीय पातळीवर रुपयाला अनन्यसाधारण महत्त्व कसे मिळेल, या दिशेने वाटचाल निश्चितपणे वाटचाल करतो आहे. आंतरराष्ट्रीय व्यवहारांवर दशकानुदशके डॉलरचे वर्चस्व राहिले आहे.जगातील ८० टक्क्यांहून अधिक व्यापार आजही डॉलरमध्येच होतात मात्र, या वर्चस्वाचीही किंमत मोजावी लागते. अन्य देशांना अमेरिकेतील व्याजदर, धोरणे आणि आर्थिक अस्थिरतेचा फटका सहन करावा लागतो. भारताला त्यासाठी व्यवहारातील चलन-जोखीम पत्करावी तर लागतेच, त्याशिवाय विदेशी गंगाजळीही मोठ्या प्रमाणावर लागते. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने या एकसत्ताक चलनाधारित व्यवस्थेवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी, गेल्या काही वर्षांत ठोस पावले उचलली आहेत. रुपयाचे आंतरराष्ट्रीयीकरण ही कल्पना आता या धोरणाचा केंद्रबिंदू असून, अनेक देशांसोबत थेट रुपयात व्यवहार सुरू करण्यासाठी चर्चा प्रगत अवस्थेत आहे. हे पाऊल डॉलरवरील अवलंबित्व कमी करणारे ठरणार असून, भारताला स्वावलंबी चलनयंत्रणाही देणारे ठरणार आहे.विदेशी गंगाजळी म्हणजे परकीय चलन प्रवाह. यात गुंतवणूक, निर्यात, आयात किंवा भांडवली बाजारातील निधी यांचा मुख्यत्वे समावेश होतो. जागतिक महागाई आणि अमेरिकेतील उच्च व्याजदर धोरणांमुळे, हा प्रवाह आज अस्थिर झाला आहे. डॉलर मजबूत झाल्यावर उदयोन्मुख बाजारांतील स्थानिक चलनांवर दबाव येतोच. रुपयाही त्याला अपवाद नाही. गेल्या वर्षी रुपया आशियातील कमकुवत चलनांपैकी एक ठरला होता. या पार्श्वभूमीवर डॉलरवर अवलंबून राहणे म्हणजे, स्वतःचे आर्थिक स्वातंत्र्य धोयात घालणेच ठरते. म्हणूनच केंद्र सरकार स्थानिक चलनातील व्यवहारांना चालना देत, या अस्थिरतेतून स्वतःचा मार्ग शोधते आहे. केंद्र सरकारची ही भूमिका आर्थिक स्वायत्ततेचा नवा अध्याय आहे, असे म्हटल्यास ते चुकीचे ठरणार नाही. भारताने गेल्या काही वर्षांत युएई, ऑस्ट्रेलिया, जपान आणि 'युरोपियन मुक्त व्यापार संघटने'सारख्या देशांसोबत करार केले आहेत. या करारांमध्ये स्थानिक चलनातूनच व्यवहाराला विशेष प्राधान्य देण्याचा भारताचा आग्रह आहे.यापद्धतीचे काही ठोस फायदे प्रथमदर्शनी दिसून येतात. त्यामुळे, व्यवहारातील डॉलर-आधारित मध्यस्थी कमी होऊन, जोखीम कमी होईल. संबंधित दोन्ही देशांच्या चलनांना स्थैर्य मिळेल. व्यापार खर्च कमी होण्याबरोबरच, व्यवहारातील पारदर्शकताही वाढीस लागेल. दीर्घकालीन दृष्टीने द्विपक्षीय आर्थिक भागीदारी अधिक मजबूत होईल. भारताने युएईसोबत रुपया-दिरहम व्यवहारासाठीची संदर्भ दर निश्चित करण्याची प्रक्रिया यापूर्वीच सुरू केली आहे. इंडोनेशियासोबतही अशाच स्वरूपातील व्यवस्था विचाराधीन आहे. याचा उद्देश डॉलरविरोध हा नव्हे, तर रुपयाच्या वा-परात वाढ व्हावी हेच भारताच्या मध्यवर्ती बँकेचे स्पष्ट धोरण आहे.या सर्व प्रक्रियेत मध्यवर्ती बँकेची भूमिका निर्णायक ठरते आहे. तिचे काम तीन आघाड्यांवर सुरू आहे. यात चलन व्यवहार व्यवस्था सुलभ करणे, म्हणजेच रुपयाआधारित व्यवहारांसाठी आवश्यक बँकिंग लिअरिंग यंत्रणा तयार करणे. याचबरोबर, द्विपक्षीय करार सुदृढ करणे ज्यायोगे, निर्यातदार आणि आयातदारांना स्थानिक चलन व्यवहारासाठी परवानगी व प्रोत्साहन देणे. तसेच चलन स्थैर्य राखणे म्हणजेच, महागाई नियंत्रणात ठेवून, रुपयावरील जागतिक विश्वास कायम राखण्यास मदत करणे यांचा समावेश होतो. जागतिक महागाई दर जिथे पाच ते सहा टक्क्यांवर आहे, तिथे भारताने तो सातत्याने चार टक्क्यांखाली ठेवला आहे. स्थिर महागाई दीर्घकालीन गुंतवणुकीसाठीचा पाया घालणारी ठरते.भारताचा प्रयत्न उल्लेखनीय असला, तरी काही अडथळे आहेतच. आजही रुपया जागतिक व्यवहारांतील शिर्षस्थ २० चलनांमध्ये नाह-ी. ते स्थान मिळविण्यासाठी सातत्यपूर्ण व्यवहार व जागतिक भागीदारी भारताला वाढवावी लागेल. अनेक देशांत चलन लिअरिंग यंत्रणा स्थानिक स्त-रावर उपलब्ध नाहीत. या सुविधा विकसित होण्यासाठी बराच अवधी लागेल. डॉलरविरोधी अशी भारताची प्रतिमा निर्माण झाली, तर अमेरिकेसारख्या महा-सत्ता भारताबरोबर थेट शत्रुत्व घेऊ शकतात.अमेरिकी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी डॉलरविरोधी म्हणत, 'ब्रिस'ला यापूर्वीच इशाराही दिला आहे. तेलदरातील वाढ, पुरवठा-साखळीतील विस्कळीतपणा हे बाह्य घटक रुपयावर दबाव आणू शकतात. भारताच्या आर्थिक धोरणाने म्हणूनच काही उपाय राबवले पाहिजेत. द्विपक्षीय करारांमध्ये रुपयामधील व्यवहार हे कलम अनिवार्य करावे. रुपया-लिअरिंग यंत्रणा मजबूत करत, बँकिंग समन्वय वाढवावे, रुपयाचा वापर गुंतवणूक, पर्यटन आणि सेवा व्यवहारांतही वाढवावा, महागाई नियंत्रणात ठेवून चलन स्थिरता राखावी, तसेच उद्योगांना मार्गदर्शन देऊन, रुपया व्यवहार सुलभ करावा.डॉलरवरील अवलंबित्व कमी करणे, हा भारताचा आर्थिक स्वातंत्र्याचा निर्णायक टप्पा आहे. हा फक्त व्यवहारातील बदल नसून, तो आत्मनिर्भरतेचा आर्थिक आविष्कार आहे. रुपया जागतिक व्यापारातील विश्वासार्ह चलन म्हणून उभा राहिला, तर त्याचे दीर्घकालीन परिणाम होणार आहेत. यात भारताचा व्यापार तसेच वित्तीय निर्णय स्वतंत्र होतील. रुपयाचे मूल्य जागतिक बाजारात स्थिर व विश्वसनीय ठरेल. त्याचबरोबर, जागतिक चलनव्यवस्थेत भारताच्या भूमिकेला महत्त्व प्राप्त होईल. डॉलरचे वर्चस्व आणखी काही काळ कायम राहणार आहे. मात्र, भारताने दाखवलेली दिशा ही नवी आहे. तसेच, हे चलन बदलाचे राजकारण नसून, आर्थिक परिपक्वतेचा संकेत आहे. रिझर्व्ह बँक, वित्त मंत्रालय आणि उद्योगक्षेत्र या तिन्हींमध्ये समन्वय कायम राहिला, तर रुपया हा शब्द येत्या दशकात केवळ भारतीयच नव्हे, तर जागतिक आर्थिक व्यवहारा-च्या केंद्रस्थानी आदराने उच्चारला जाईल, यात कोणताही संदेह नाही.

# अवकाशाचे आवाहन

**आपल्याकडे विज्ञानाबाबतही सगळा वलयाचा मामला. ज्याच्या नावे एकही संशोधन नाही असे, केवळ भाभा अणुसंशोधन केंद्रातील चाकरीची पुण्याई असणारे आणि काही तर केवळ विज्ञानकथा सांगणारे... अशा सगळ्यांनाच येथे वैज्ञानिक म्हटले जाते.**




भारताच्या अवकाश विज्ञान क्षेत्राचे क्षितिज विस्तारणारे शास्त्रज्ञ एकनाथ वसंत तथा ई. व्ही. चिटणीस यांचे काम हा भारताच्या विज्ञान प्रगतीच्या इतिहासाचा दस्तावेजच.

आपल्याकडे विज्ञानाबाबतही सगळा वलयाचा मामला. ज्याच्या नावे एकही संशोधन नाही असे, केवळ भाभा अणुसंशोधन केंद्रातील चाकरीची पुण्याई असणारे आणि काही तर केवळ विज्ञानकथा सांगणारेष्ठ अशा सगळ्यांनाच येथे वैज्ञानिक म्हटले जाते. कोणालाही विचारवंत असा किताब द्यावा तसेच हे. आणि सध्याचा काळ तर काही सेकंदांच्या 'रील'मध्ये मावणाऱ्या कर्तृत्वाला नमन करण्याचा. दर श्वासागणिक जिथे नवा तारांकित लागतो, तिथे समग्र आयुष्य विज्ञानालाच समर्पित असलेल्यांची कथा सांगणार कोण? आणि सांा-गितली, तरी या वावदुकी वातावरणात ऐकणार कोण? एखाद्या वाक्याच्या वा मोजक्या शब्दांच्या आत्मचरित्रात विरून जाणाऱ्या 'स्टोरी'इतके भागधेय उरणे, हा केवळ त्या व्यक्तीवर तर अन्याय आहेच; पण तो व्यक्तीला तेवढ्यातच बंदिस्त करणाऱ्यांचा करंटेपणाही. अर्थात, शतायुषी शास्त्रज्ञ एकनाथ वसंत तथा ई. व्ही. चिटणीस यांना तर निधनानंतर एवढेही भाग्य अपवादानेच मिळाले असेल. म्हणूनच त्यांची फक्त स्मरणनोंद न लिहिता त्यांची महत्ता सविस्तर सांगायला हवी. भारताच्या अवकाशविज्ञान क्षेत्राचे क्षितिज विस्तारणारे चिटणीस यांचे काम ही फक्त त्यांच्या कार्यकर्तृत्वातील एकेका प्रसंगाची गोळाबेरीज नाही, तर तो भारताच्या स्वातंत्र्योत्तर विज्ञान प्रगतीच्या इतिहासाचा मोठा दस्तावेज आहे, जो उद्याच्या विज्ञानवाटेची दिशा ठरविण्यासाठी धोरणकर्त्यांनीही अभ्यासायला हवा.

चिटणीस मूळचे कोल्हापूरचे. शिक्षणासाठी पुण्यात आले. तत्कालीन पुणे विद्यापीठात पदार्थविज्ञान विषयात पदव्युत्तर पद-वी मिळविल्यानंतर काही काळ ते गुजरातमधील एका गावात व्याख्याते म्हणून काम करत. ओढा संशोधनाकडे असूनही तो काळ असा की, संशोधनासाठी पुरेशा सुविधा नसल्याने मास्तरकीवाचून गत्यंतर नव्हते. अर्थात, कालांतराने संशोधन सहायक म्हणून काम मिळाले. आणि, मग थेट अमेरिकेत मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अर्थात 'एमआयटी'मध्ये त्यांना संशोधनाची संधी मिळाली. रुढार्थाने स्थिरस्थावर झालेले असताना, त्यांना खुद्द विक्रम साराभाईंनी भारतात परतण्यासाठी हाक दिली. नुकत्याच स्वतंत्र झालेल्या भारतासमोर भूक, रोगराई, गरिबी या समस्या आ वासून उभ्या होत्या. त्या विज्ञानाच्या मार्गे सोडविण्यासाठी भारतात परत ये, अशी साराभाईंची साद होती आणि त्याला चिटणीसांनी लगेच प्रतिसाद दिला. काही कालावधीत चिटणीस हे इंडियन नॅशनल का-मिटी फॉर स्पेस रीसर्च-'इन्कोस्पार'चे सदस्य-सचिव झाले. याच 'इन्कोस्पार'चे रूपांतर १९६९ मध्ये भारतीय अवकाश संशोधन संस्था अर्थात 'इस्रो'त झाले. चिटणीस हे त्या अर्थाने 'इस्रो'ची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या महत्त्वाच्या वैज्ञानिकांपैकी एक.

'एमआयटी'तून परत आलेल्या चिटणीसांना साराभाईंनी पहिले काम दिले, ते रॉकेट प्रक्षेपणासाठी भारतात योग्य जागा निवडण्याचे. चिटणीस यांनी पाच महिन्यांच्या अथक शोधानंतर केरळातील तिरुअनंतपुरममधील थुंबा ही पृथ्वीच्या चुंबकीय विषुववृत्तानजीकची जागा त्यासाठी सुचवली. संशोधनासाठी, रॉकेट प्रक्षेपणासाठी हीच जागा उत्तम, यावर बऱ्याच चर्चांनंतर एकमत झाले आणि वर्षभरातच नोव्हेंबर १९६३ मध्ये 'नासा'च्या मदतीने, वातावरणाचा अभ्यास करणाऱ्या नाइके-अपाचे या रॉकेटचे येथून प्रक्षेपणही झाले. भारतीय शेतकऱ्यांसाठी हवामान अंदाज देण्यासाठी याचा उपयोग झाला. या रॉकेटचे भाग सायकलींवर आणि बैलगाड्यांतून प्रक्षेपणाच्या ठिकाणी आणण्यात आले होते, हे आज सांगितले, तरी आश्चर्य वाटेल. पण, भारताच्या अवकाश विज्ञानातील भरारीची आस लागलेल्या वैज्ञानिकांच्या दृढनिश्चयी भूमिकेची आणि समर्पित वृत्तीची आठवण करून देण्यासाठी ते पुरेसे ठरावे. थुंबा येथील ही जागा आज विक्रम साराभाई अवकाश केंद्र म्हणून ओळखली जाते. पहिले रॉकेट प्रक्षेपित करण्यासाठी ज्या राष्ट्रांची मदत लागली, त्यांची रॉकेट आज येथून प्रक्षेपित होतात. यातून, 'अवकाशविज्ञानात भारताची झेप प्रचंड असेल,' असे भाकीत चिटणीस यांनी भारताच्या १०० व्या अवकाश मोहिमेवेळी काही वर्षांपूर्वी केले होते, जे प्रत्यक्षात येताना दिसते.

विज्ञान संशोधन पुढे जायचे असेल, तर त्यामागे राजकीय नेतृत्व प्रभावीपणे उभे राहण्याची गरज असतेच. चिटणीसांनीच काही वर्षांपूर्वी एका मुलाखतीत याचे महत्त्व सांगितले होते. त्या वेळच्या सोव्हिएत महासंघाने १९५७ मध्ये 'स्पुटनिक'चे प्रक्षेपण केले. या घटनेने अमेरिकेला आश्चर्याने तोंडात बोटे घालायला लावलीच, शिवाय आपण मागे राहून चालणार नाही, हाही संदेश अमेरिकेत पोहोचला. भारतातील वैज्ञानिक हे सर्व पाहत होते. साराभाईंच्या पुढाकाराने अहमदाबादेत उभ्या राहिलेल्या 'फिजिकल रिसर्च लॅबोरेटरी'मध्ये त्या वेळी पृथ्वीच्या वातावरणाच्या बाहेरून येणाऱ्या किरणोत्सर्गांचा आणि त्यामुळे घडत असलेल्या आयनोस्फीअर, कॉस्मिक किरणे अशा घटनांचा अभ्यास सुरू होता. 'स्पुटनिक'च्या उड्डाणानंतर त्याला आणखी दिशा मिळाली आणि भारत अवकाश कार्यक्रम हाती घेण्याच्या दिशेने गेला. तिसरी पंचवार्षिक योजना तोवर तयार झालेली असल्याने त्यात यासाठी तरतूद नव्हती, पण याचे महत्त्व लक्षात आले ते पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांना. त्यांनी लगेच निधीची व्यवस्था केली. आण्विक आणि अवकाश संशोधन क्षेत्रांत संशोधन करायचे तर अपयशांसाठी तयार राहावे लागते. ती तयारी असणारे विज्ञानप्रेमी राजकीय नेतृत्व असेल, तरच संशोधन पुढे जाते, याचा जिवंत इतिहास चिटणीस यांच्या रूपाने आपल्यात होता. तो ते 'इस्रो'च्या प्रत्येक यशस्वी कार्यक्रमानंतर सांगत राहिले. विज्ञान संशोधनात पुढे जाण्यासाठी मागच्यांच्या कर्तृत्वाचा हा इतिहास समजून घेणे महत्त्वाचे.

असे चिटणीस नुकतेच शयायुषी होऊन निवर्तले. चिटणीस यांच्या जाण्याने स्वतंत्र भारतातील वैज्ञानिकांच्या पहिल्या पिढीतील एक महत्त्वाचे वैज्ञानिक आपल्यातून गेले, हे समजून घेतले, तर भारतीय अवकाश संशोधनाचा आजच्या तंत्रज्ञान युगाशी सांगड घालणारा किती मोठा दुवा निखळला आहे, हे लक्षात येईल. आज संपर्कजाळे आपल्या जगण्याच्या मूलभूत गरजांपैकी एक गरज बनले असताना, चिटणीस हे 'इंडियन नॅशनल सॅटेलाइट सिस्टीम' अर्थात 'इन्सॅट' कार्यक्रमाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्यांपैकी होते, याची आठवण ठेवावी लागेल.

सुदूर संवेदन उपयोजने आणि अवकाशाधारित संज्ञापन प्रकल्प उभारण्यात त्यांचे योगदान होते. त्यांच्या या कामातील सहभागामुळे ग्रामीण भारतात दूरचित्रवाणी आणि दूरध्वनी पोहोचण्यास मदत झाली. पुढे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात शैक्षणिक बहुमाध्यम संशोधन केंद्र अर्थात 'ईएमआरसी'ची स्थापना करण्यातही त्यांचा पुढाकार होता. शिक्षणाचे दूरचित्रवाणीच्या माध्यमातून सार्वत्रिकीकरण करण्याचा हा प्रयोग होता. प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया (पीटीआय) या वृत्तसंस्थेशीही ते नंतर संलग्न राहिले. विज्ञान पत्रकारितेला बळकटी देणे हा त्यामागचा उद्देश. एक प्रकारे तंत्रज्ञानाद्वारे बहुतांच्या अंतरी ज्ञान पोहोचवण्याचा वसा घेतलेला हा वैज्ञानिक होता. एखादी व्यक्ती शंभर वर्षे जगते, तेव्हा त्या-च्या शतायुषी जगण्याचे सोहळे होतात, तब्येतीचे रहस्य वगैरेवर मुलाखती होतात. चिटणीसांच्या शंभराव्या वाढदिनी 'अवकाशविज्ञान, धोरण आणि नवोन्मेषातील अग्रक्रम' या विषयावर विज्ञान संशोधनात कार्यरत जुन्या-नव्यांची एक परिषद झाली. कारण, त्यांचा शंभरावा जन्मदिन हा केवळ शंभरी साजरे करणे नव्हते, तर भारताच्या विज्ञान दृष्टीचा मागोवा होता. अवैज्ञानिक गोष्टींची भलामण करणाऱ्या आजच्या जगात हे विरळाच. चिटणीसांनी स्वत: संशोधनात काम केलेच, पण जोडीने गुणग्राहक राहून संशोधनात चांगले मनुष्यबळही आणले. डॉ. एपीजे अब्दुल कलामांची 'नासा'च्या कार्यक्रमासाठी शिफारस करणारे तेच होते.

निवृत्तीनंतरही अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले.

इतिहास घडवूनही भविष्य साकारायची दृष्टी असलेली माणसे कमी होत असतानाच्या काळात चिटणीस यांचे जाणे नैसर्गिक असले तरी हळहळ निर्माण करते. त्यांच्याच कार्यातून प्रेरणा घेऊन विज्ञान संशोधनासाठीच्या अवकाशाचे आवाहन केवळ यशापुरते नसते- अपयशाचीही तयारी ठेवून संशोधनात पुढे जाण्याचे ते आवाहन असते, हे ओळखण्याची सुबुद्धी आपल्याला मिळणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

# संत शिरोमणी नामदेव महाराज

संत शिरोमणी नामदेव महाराज यांची काल २६ ऑक्टोबर रोजी जयंती होती. संत शिरोमणी नामदेव महाराज यांचा जन्म २६ ऑक्टोबर १२७० रोजी हिंगोली जिल्ह्यातील नरसी गावात एका गरीब शिंपी कुटु-ंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाम दामाशेठी तर आईचे नाव गोनाई असे होते. त्यांना एक बहिणही होती तिचे नाव आऊबाई असे होते. वयाच्या ११ व्या वर्षी त्यांचा विवाह राजाबाईशी झाला. त्यांना चार मुले व एक मुलगी होती. मुले, मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार असणारे नामदेव महाराज मात्र विठ्ठल भक्तीत लिन असायचे. लहानपणापासूनच नामदेव विठ्ठलमय झाले होते. विठ्ठल हेच त्यांच्यासाठी सर्वकाही होते. देव, आईबाप, गुरू, सखासोयरा, स्वामी तोच होता. विठ्ठल भक्तीत ते इतके लिन असायचे की साक्षात विठ्ठल त्यांना भेटायला यायचे असे म्हटले जाई. त्यांच्या हट्टापायी विठ्ठलाने त्यांच्या घरी येऊन दुधाच्या नैवेद्याचे सेवन केले होते अशी आख्यायिका प्रसिद्ध आहे. एकदा एका कुत्र्याने त्यांच्या घरी येऊन रिकामी वाटी पळवली तेंव्हा तेंव्हा कुत्र्याला भूक लागली असून वाटीत तर काहीच नाही म्हणून ते कुत्र्याच्या मागे सुकी भाकर आणि तुपाची वाटी घेऊन त्याला देण्यासाठी त्याच्या मागे धावत होते. लहानवयातच सर्वांभूती परमेश्वर ही भावना त्यांच्यात दिसून आली. लहानपणापासूनच विठ्ठलाचे भक्त असलेल्या नामदेवांनी सत्य समजून घेण्यासाठी वेदज्ञ ब्राह्मणांकडे हेलपाटे मारले पण नामदेव हे शूद्र जातीचे असल्याने त्यांना ब्रह्म जाणून घेण्याचा अधिकार नाही असे सांगून त्यांना ज्ञान घेण्यापासून रोखण्यात आले. तेंव्हा त्यांनी भक्तीतून थेट परमेश्वरलाच आधार मानून स्वतःच बुद्धीचा कस लावत विश्वाचे सत्य समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्याचाच एक भाग म्हणून ते लंगोटी नेसून चंद्रभागेच्या वाळवंटात कीर्तन करत सदविचारांचा प्रसार करू लागले. ही वाट त्यांना स्वतःच शोधायची होती. त्यातून साधनेची नवीनवी साधनं निर्माण होऊ लागली. श्रोत्यांनाही समजून घेणारी वारकरी सामूहिक कीर्तनाची मुहूर्तमेढ त्यांनीच रोवली. त्यासाठी त्यांनी अभंग या छंदाची निर्मिती केली. नामदेवांनीच वारकऱ्यांच्या लाडक्या काल्याच्या कीर्तनाची सुरुवात केली. नामदेव महाराजांना अभंग लेखनाचा इतका छंद जडला की त्यांनी जवळपास १ कोटी अभंग लिहिले. याचाच अर्थ त्यांनी विपुल साहित्य लेखन केले. त्यांच्या साहित्याची भाषा खूप सोपी होती. ज्ञानेश्वर, मुक्ताबाई, चांगदेव या त्यांच्या समकालीन संतांच्या तुलनेत आज आपल्याला त्यांची भाषा लगेच कळते. त्यांनी कायम सर्वसामान्यां-साठी लिहिले. त्यात संवाद आहे. नाट्य आहे. लोककलांचे विविध प्रकार आहे. ज्ञानेश्वरांच्या समाधी नंतरही नामदेवांनी तीर्थयात्रा करून रामेश्वरापासून मुलतान पर्यंतचा भारत पालथा घातला. जे जिथे गेले तिथले बनले. त्यांनी तिथल्या स्थानिक भाषेत लोककाव्य लिहिले. त्यांनी हिंदी साहित्याला नवा आयाम दिला. त्यांच्या कामातूनच पुढे रामानंद, कबीर, नानक, दादू दयाळ, मीरा, नरसी मेहता अशी संतांची मांदियाळी देशभर उभी राहिली. पंजाबात तर ते दोन दशकांहून अधिक काळ राहिले. शीख धर्माच्या गुरु ग्रंथसाहेब या पवित्र ग्रंथात त्यांची ६१ पदे समाविष्ट आहेत. पंजाबात आजही त्यांच्या अभंगाचे नियमित वाचन केले जाते. पंजाबातच नाही तर संपूर्ण देशात त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे. महाराष्ट्र आणि पंजाब बरोबरच राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, हरियाणा, उत्तराखंड, उत्तरांचल, हिमाचल प्रदेश या राज्यात त्यांची मंदिरे आहेत. तामिळनाडू पासून काश्मीरपर्यंत लाखो लोक त्यांचे नाव किंवा आडनाव किंवा जातीची ओळख अभिमानाने मिरवतात. संपूर्ण देशात प्रभाव असणारे नामदेव हे एकमेव संत आहेत म्हणूनच त्या-ंना संत शिरोमणी असे म्हणतात. ३ जुलै १३५० रोजी वयाच्या ८० व्या वर्षी अत्यंत समाधानाने आपला देह ठेवला. त्यांची एक समाधी पंढरपु-रात विठ्ठलाच्या पायरीशी आहे तर दुसरी पंजाबमधील घुमान येथे आहे. या समाधीचे दर्शन घेण्यासाठी दररा-ेज हजारो भाविक मोठ्या भक्तिभावाने या ठिकाणी येतात आणि नतमस्तक होतात.

**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# संवाद

## नागरी सुविधांची समस्या दूर होणे आवश्यक

आपल्या महाराष्ट्र राज्यात लोकशाही व्यवस्थेचे नेहमी गुणगान किंवा कौतुक करीत असतो. आणि ही लोकशाही संपुर्ण राज्यात किंवा देशामध्ये किती महत्वपूर्ण आहे हे सांगत असतानाच तिचे संवर्धन कारण्याविषयीसुद्धा मोठी भाषणे केली जातात. परंतु महापालिका किं-वा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार चार वर्षे जाणीवपूर्वक रखडवायच्या यातून सरकार किंवा निवडणूक आयोगाची लोकशाहीविषयक आस्थादेखील अधोरेखित होते. केवळ संसद आणि विधानसभांच्या निवडणुका ठरल्या वेळी घ्यायच्या आणि तो लोकशाहीचा उत्सव असल्याचा मोठा मोठा उदोउदो करायचा. मग महा-पालिका निवडणुकांबाबत एवढा पंक्तिप्रपंच का केला जातो हा सर्वसामान्यांना प्रश्न निर्माण होतो. उलट स्थानिक स्तरावर सामान्य माणसाच्या समस्या सोडवण्याकरिता किंवा एकूणच शहरे, महानगरांच्या विकासाला अधिक बळ देण्याकरिता त्या त्या ठिकाणी लोकनियुक्त कारभार असणे गरजेचे ठरते.

मागील चार वर्षे केवळ प्रशासनाच्या किंवा लोकशाहीच्या हातात महानगरांचा कारभार सोपवणे फारसे योग्य ठरत नाही. आता सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे निवडणूक प्रक्रिया संपवायची असेल तर नोव्हेंबरपासून आचारसंहिता लागू करावी लागेल. यंदा दिवाळी लवकर झाल्याने तिला आचारसंहितेचा फटका बसला नाही. मात्र दिवाळीनंतर नव्या वर्षाच्या स्वागताला राजकीय फटाक्यांची धुमशान उडाली असेल यात काही शंका राहत नाही. सर्वोच्च न्यायालयाने आता मात्र एकतीस जानेवारी २०२६ पर्यंत महाराष्ट्रातल्या सगळ्या म्हणजे २९ महापालिका निवडणुकांची प्रक्रिया संपली पाहिजे, अशा स्पष्ट शब्दात आदेश दिले आहेत. स्वाभाविकपणे आता राज्य सरकार किंवा निवडणूक आयोग यांना कोणलाही निवडणुका पुढे ढकलता येणार नाही.

संविधानाच्या चौकटीप्रमाणे या सगळ्या प्रक्रिया जरी पार पडत असल्या तरी त्यात राजकारणच सर्वाधिक होत असते. राजकीय पक्षां-ना आपापली ताकद दाखवण्याची मोठी संधी उपलब्ध असते. आणि मुळात म्हणजे या महापालिकांच्या तिजोऱ्या आपल्या ताब्यात कशा काय राहतील यासाठी संघर्ष आणि कुरघोडी मोठया प्रमाणावर होत असते. राज्यात साधारणपणे गेल्या पंचवीस वर्षांपासून या महापालिका अस्तित्वात आहेत. परंतु या मह-ानगरांच्या परिस्थितीत कोणालाही आमूलाग्र बदल घडून आलेला नाही हीदेखील खरी वस्तुस्थिती आहे. पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न, अस्वच्छता, आरोग्य, आणि प्राथमिक शिक्षणाचा अभाव एकूणच महानगरांच्या नियोजनाबाबतच ढिसाळपणा अशा एक ना अनेक गोष्टी कायम असल्याचे पाहायला मिळते. नवीन वर्षी जानेवारीत जर या महापालिका निवडणुका झाल्या तर तोदेखील महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात विक्रम ठरू शकतो.

कारण पहिल्यांदाच एकाचवेळी एकोणतीस महापालिकांच्या निवडणुका होतील. त्यात अगदी राज्याची राजधानी असलेल्या मुंबईपासून ते उपराजधानी असलेल्या नागपूरपर्यंत ही निवडणुकांची रणधुमाळी पाहायला मिळणार आहे. एकाअर्थी ही मिनी विधानसभा निवडणूक म्हणता येऊ शकेल. महाराष्ट्राच्या नागरी नियोजनाचा विचार केला तर महापालिकांच्या निर्मिती ज्या कारणांसाठी झाल्या आहेत, ते उद्दिष्ट कितपत यशस्वी झाले, हेदेखील यानिमित्ताने तपासले जाऊ शकतात. राजकीयदृष्ट्या महा-पालिका आपल्या ताब्यात ठेवण्याकरीता होणारी राजकीय स्पर्धा त्या त्या पक्षांची कसोटी पाहणारी ठरू शकते. परंतु सर्वसामान्य माणसाचा विचार केला तर तो मुंबई, नागपूरसहित मूलभूत सोयीसुविधांपासून अजूनही वंचितच आहे. तर दुसरीकडे स्वतःच्या स्वार्थासाठी ही महानगरे बकाल करण्याचीदेखील स्पर्धा पाहायला मिळते. यावेळच्या पावसाळ्यामध्ये जवळपास सगळ्याच महानगरांमध्ये नागरी सुविधांची लक्तरे वेशीवर टांगली गेली. वाहतूक कोंडीपासून ते पाणी तुंबण्यापर्यंतचे सगळे प्रकार त्या त्या महानगरात घडलेले आहेत. या सगळ्याच महापालिकांमधली गंभीर समस्या म्हणजे अतिक्रमणे,अनधिकृत बांधकामांची वाढलेली संख्या मोठ्या प्रमाणात आहे. आणि या सगळ्यांना मोठ्या प्रमाणावर राजकीय संरक्षण मिळालेले आहे.

**मधुकर चुटे**
नागपूर ९४२०५६६४०४

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# खूनाचे रहस्य उलगडले! अनैतिक संबंधातून घडली थरारक हत्या

## वणी पोलिसांची धडाकेबाज कामगिरी, २४ तासांच्या आत दोन्ही आरोपी तुरुंगात, स्थानिक गुन्हे शाखेचा तपास वाखाणण्याजोगा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



वणी - वणी शहर हादरवून टाकणाऱ्या एका थरारक हत्येचा गुन्हा अवघ्या २४ तासांत उघडकीस आणत वणी पोलिसांनी उत्कृष्ट तपास कौशल्य दाखवले आहे. अनैतिक संबंधातून झालेला हा खून असल्याचे पोलिस तपासात स्पष्ट झाले असून आरोपींनी रागाच्या भरात स्वप्नील राऊत याची निर्घृण हत्या केली.अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे सुमेश रमेश टेकाम (२४) आणि सौरभ मारोती आत्राम (२७) अशी असून दोघेही वडजापूर (ता. वणी) येथील रहिवासी आहेत.

खूनामागील कारण मृत स्वप्नील राऊत याची पत्नी आणि मुख्य आरोपी सुमेश टेकाम यांच्यात अनैतिक संबंध होते. स्वप्नील पत्नीला मारहाण करत असल्याने सुमेश त्याच्यावर राग धरून होता. या वैमनस्यातूनच खूनाचा कट रचण्यात आला. गुरुवारी दुपारी सुमेश आणि सौरभ हे दोघे दुचाकीवरून जत्रा मैदान परिसरात गेले. तेथून त्यांनी स्वप्नीलला फोन करून दारू पिण्याच्या बहाण्याने बोलावले. तिघेही वरोरा रोडवरील गजानन नगरी परिसरात गेले.दारू पार्टीदरम्यान आरोपी सुमेशने स्वप्नीलला जाणीवपूर्वक जास्त प्रमाणात दारू पाजली. नंतर सुमेशने मोठा दगड उचलून स्वप्नीलच्या डोक्यावर मारला.

खात्री करण्यासाठी त्याने बाटली फोडून त्याच्याच तुकड्यांनी स्वप्नीलचा गळा चिरला. ही घटना पोलिसांसाठी मोठे आव्हान ठरली होती. मात्र स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने फॉरेन्सिक तपास, मोबाईल लोकेशन, आणि घटनास्थळावरील पुरावे यांच्या आधारे दोन्ही आरोपींना अवघ्या २४ तासांत गजाआड केले.या तपासात चमकदार कामगिरी करणारे अधिकारी या प्रकरणाच्या तपासात पोलीस निरीक्षक गोपाळ उंबरकर, उपनिरीक्षक सुधाम असोरे, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पथक यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांची कामगिरी वणी पोलिसांच्या इतिहासात नोंद घेण्याजोगी ठरली आहे. पुढील तपास सुरू असून, आरोपींविरुद्ध कठोर गुन्हेगारी कारवाईची प्रक्रिया सुरू आहे.

# गुंज सर्कलमध्ये पंचायत समिती निवडणुकीची लगबग पराभुत उमेदवाराला मिळणार का यंदा संधी?

**जनमाध्यम प्रतिनिधी**



महागाव : गुंज : आगामी पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुंज सर्कलमध्ये राजकीय चर्चांना उधाण आले आहे. मागील निवडणुकीत विजयी उमेदवारांना पुन्हा संधी न देता, यावेळी पराभूत उमेदवाराला संधी मिळाली तर गाव त्यांचा विचार करेल, अशी सहानुभूतीची लाट गावात दिसून येत आहे.

सन 2017 मध्ये गुंज गावातून काँग्रेस पक्षाकडून गजानन कांबळे, राष्ट्रवादी काँग्रेसकडून विठ्ठल कांबळे, भाजपकडून हरिभाऊ खंदारे, तर शिवसेनेकडून सुदाम खंदारे कलगावकर हे उमेदवार रिंगणात उतरले होते. त्या वेळी काँग्रेस विरुद्ध भाजप अशी थेट लढत रंगली होती. मात्र, भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाकडून आवश्यक लक्ष न दिल्यामुळे भाजपचे उमेदवार हरिभाऊ खंदारे यांचा पराभव झाला आणि काँग्रेसचे गजानन कांबळे विजयी ठरले. त्या पार्श्वभूमीवर गावातील अनेक मतदारांनी “यावेळी पराभूत उमेदवाराला संधी दिल्यास तो गावाचा विकास साधू शकेल,” असा सूर लावला आहे. त्यामुळे यंदा उमेदवारी कोणाला मिळते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, जिल्हा परिषद पातळीवर मागील निवडणुकीत काँग्रेसकडून पल्लवी कांबळे विरुद्ध राष्ट्रवादीकडून वर्षा भवरे (विजयी उमेदवार) ठरल्या होत्या तर भाजप आणि शिवसेनेचे भवरे यांची पत्नी उमेदवार म्हणून रिंगणात होते. गुंज सर्कलमध्ये या पार्श्वभूमीवर राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता वर्तवली जात असून, काँग्रेस, राष्ट्रवादी, भाजप आणि शिवसेना या सर्वच पक्षांचे कार्यकर्ते पुन्हा एकदा सज्ज झाले आहेत. गावातील चर्चांमधून असे स्पष्ट होत आहे की, “यावेळी जो उमेदवार खऱ्या अर्थाने विकासाची हमी देईल आणि जनतेशी जोडला जाईल, त्यालाच मतदार पसंती देतील.” आगामी काही दिवसांत पक्षांतर्गत उमेदवारी जाहीर होताच गुंज सर्कलमधील निवडणुकीचा रंग अधिक गडद होण्याची चिन्हे आहेत.

# पुन्हा अकाली पावसाने तोंडचा घास हिरावला..! शेतकऱ्यांची काळी दिवाळी

**जनमाध्यम प्रतिनिधी**




यवतमाळ - जिल्ह्यासह विदर्भातील शेतकरी यंदा अक्षरशः संकटात सापडले आहेत. वर्षभर कष्ट करून उभे केलेले पीक आधी अतिवृष्टीने वाहून गेले, आणि आता ऐन कापणीच्या टप्प्यावर पुन्हा पावसाने हजेरी लावून तोंडचा घासच पळविला आहे. शेतकऱ्यांसाठी दिवाळीचा सण म्हणजे आनंद, आपुलकी, उजेड आणि आशेचा क्षण पण यंदा हा सण अनेकांच्या आयुष्यात काळी छाया बनून आला.

अतिवृष्टीने आधीच हवालदिल झालेला शेतकरी कसाबसा उरलेल्या पिकाची जोपासना करत होता. सोयाबीन आणि कापूस हे जिल्ह्याचे प्रमुख नगदी पीक असून, याच पिकावर शेतकऱ्यांचे वर्षाचे अर्थचक्र अवलंबून असते. सुरुवातीला पिकांची वाढ बरी होती, परंतु ऑगस्ट महिन्यातील सलग पावसाने शेतीतील माती वाहून गेली, नाल्यात गाळ साचला, आणि बियाण्याचे खर्चही वाया गेले. अशा परिस्थितीत कसाबसा उरलेला माल वाचवून शेतकरी कापणीला लागला, तर पुन्हा पावसाने ‘धडकी’ भरवली. २५ ऑक्टोबर रोजी सकाळ पासूनच आकाश ढगाळले, आणि दुपारनंतर रिमझिमने सुरुवात होऊन जोरदार सरी पडू लागल्या. शेतकऱ्यांनी बांधावर सुकवायला टाकलेला सोयाबीन ओला झाला, कापसाच्या ढिगांवर पाणी साचले, तर काही ठिकाणी मळणी केलेला माल सडण्याची भीती निर्माण झाली. हा अकाली पाऊस शेतकऱ्यांच्या मनातील आशेचा दिवा विझवून गेला.शहरात दिव्यांच्या रोषणाईने दिवाळी उजळली, पण ग्रामीण भागात अनेक घरांमध्ये दिवाही पेटलाच नाही. काही गावांमध्ये शेतकरी कुटुंबांनी दिवाळी “काळी दिवाळी” म्हणून साजरी केली. अनेक शेतकऱ्यांनी आपले नुकसान पाहून हतबलतेने फक्त आकाशाकडे पाहत “देवा, आता तरी दया कर” अशी विनंती केली. शेतकऱ्यांची अवस्था आज अतिशय दयनीय आहे. एकीकडे कर्जाचा डोंगर, दुसरीकडे बाजारभावाचा खेळ, आणि आता हवामानाचा अनिश्चित कोप. पावसाचे पॅटर्न बदललेत, आणि शासनाकडून मिळणारी मदत वेळेवर मिळत नाही. सर्व पिकविमा योजना कागदावरच आहेत, तर प्रत्यक्षात नुकसानभरपाईचे धनादेश अजूनही वाटेतच अडकले आहेत. आज ग्रामीण भागात “कृषी हीच जिविका” असलेला शेतकरी निराश आहे. दिवाळीचे गोड पदार्थ, नवे कपडे, फटाके हे सारे शहरापुरतेच मर्यादित झाले. शेतकऱ्यांची दिवाळी मात्र कर्ज, पावसाचे पाणी आणि काळजीच्या सावल्यांनी व्यापलेली आहे. शासनाने या परिस्थितीची गंभीर दखल घेऊन तत्काळ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा, विमा दावे निकाली काढावेत, आणि भावनाशून्य यंत्रणेला मानवी चेहरा द्यावा हाच आज ग्रामीण भागातून उमटणारा एकच स्वर आहे.

# मराठवाकडीतील शेकडो तरुणांचा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत जाहीर प्रवेश!



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - सन्माननीय राजसाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वावर पूर्ण विश्वास ठेवत तसेच मनसे नेते राजूभाऊ उंबरकर आणि जिल्हा अध्यक्ष देवाभाऊ शिवरामवार यांच्या मार्गदर्शनाखाली आज केळापूर तालुक्यातील मराठवाकडी गावातील असंख्य तरुणांनी मनसेत प्रवेश केला.

या प्रवेश सोहळ्याचे नेतृत्व तालुका उपाध्यक्ष अश्विन ठाकरे यांनी केले. या वेळी पांढरकवडा शहर अध्यक्ष राकेशभाऊ श्रीमनवार, तालुका उपाध्यक्ष अक्षय लक्षट्टीवार, दर्शन धानोरकर, साहिल शेख, रोहित जवादवार, श्लोक पंचोली, प्रज्योत रोंघे, शुभम पारतकर यांच्यासह अनेक मनसैनिक उपस्थित होते. तरुणांच्या या भव्य प्रवेशामुळे मनसे संघटनेला केळापूर तालुक्यात नवी ऊर्जा आणि बळकटी मिळाली असून आगामी काळात मनसेचा झेंडा प्रत्येक गावात फडकवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# अतिरिक्त ३६ शिक्षक असताना विद्यार्थी शिक्षकाविना

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : महागाव तालुक्यातील कासारबेहळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना गत अनेक महिन्यांपासून कायमस्वरूपी शिक्षक मिळाला नाही. शाळा सुरू झाल्यापासून शिक्षण विभाग आणि गटशिक्षण अधिकाऱ्यांनी शिक्षक नेमणुकीबाबत पूर्णतः दुर्लक्ष केल्यामुळे गावातील ४५ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची गंभीर बाब पुढे आली आहे. कासारबेहळ शाळेसाठी एका शिक्षकाची ऑर्डर देण्यात आली होती. मात्र संबंधित शिक्षकाने शिक्षणाधिकाऱ्यांच्या आदेशाची पायमल्ली करून शाळेत रुजू होण्यास नकार दिल्याचे समजते. यामुळे गावकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. सध्या शाळेत केवळ कंत्राटी (कॉन्ट्रॅक्टबेस) शिक्षकावरच विद्यार्थ्यांचे शिक्षण चालू असून शिक्षणाची गुणवत्ता घसरत चालल्याचे पालकांनी सांगितले आहे. गावातील माजी उपसरपंच यांनी या संदर्भात शिक्षणाधिकारी व केंद्रप्रमुखांना लेखी तक्रार दाखल करून कायमस्वरूपी शिक्षक देण्याची मागणी केली होती. परंतु, अनेक दिवस उलटून गेल्यानंतरही शिक्षण विभागाने कोणतीही ठोस कारवाई न केल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. विशेष म्हणजे, महागाव तालुक्यामध्ये एकूण ३६ शिक्षक अतिरिक्त असल्याची माहिती शिक्षण विभागाकडूनच मिळालेली आहे.

मग या शिक्षकांचा योग्य ठिकाणी उपयोग न करता कासारबेहळसारख्या ग्रामीण भागातील शाळा शिक्षकांविना का ठेवण्यात आल्या आहेत, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

गावातील नागरिक व सरपंच मंडळींनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी तसेच गटशिक्षण अधिकाऱ्यांनी या प्रकरणाकडे तत्काळ लक्ष देऊन विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी कायमस्वरूपी शिक्षक नेमावा, अशी मागणी केली आहे.

# पुसद नगरपरिषदेची निवडणूक स्वबळावर लढणार : शरद मैंद, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष प्रदेश सरचिटणीस

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद : आगामी काही महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत असून पुसद नगरपरिषदेतील राजकीय हालचालींना वेग आला आहे. महाविकास आघाडीतील घटक पक्षांकडून अद्याप कोणताही संपर्क किंवा चर्चा न झाल्याने राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष ही निवडणूक स्वबळावर लढविणार असल्याची माहिती पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस शरद मैंद यांनी दिली.

ते म्हणाले की, “नगराध्यक्ष पदासह सर्व प्रभागांत उमेदवार उभे करून आम्ही पूर्ण ताकदीने मैदानात उतरणार आहोत. मागील काही वर्षांपासून नगरपरिषदेवर महायुतीचे घटक पक्ष सत्तेत असून शहराच्या विकासाचा खेळखंडोबा केला आहे. पुसदकरांना विकासापासून वंचित ठेवणाऱ्या सत्ताधाऱ्यांना दूर ठेवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.” नगराध्यक्ष पद या वेळी खुल्या प्रवर्गासाठी राखीव असल्याने अनेक इच्छुकांनी दावेदारी दाखल केली आहे.

कोरोनानंतर आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरून निवडणुका रखडल्या होत्या; मात्र आता आरक्षण जाहीर झाल्याने निवडणुका लवकरच होणार आहेत. शरद मैंद पुढे म्हणाले, “महाविकास आघाडीसोबत आमची मानसिकता आहे; परंतु संपर्क न झाल्यास आम्ही स्वतंत्रपणे निवडणूक लढवू. पुसद शहरातील सर्व प्रभागांत राष्ट्रवादी (शरद पवार) पक्ष जनतेच्या हितासाठी जोमाने लढणार असून नगराध्यक्ष पद पुन्हा आपल्या पक्षाकडे आणून शहराचा चेहरा मोहरा बदलण्याचा आमचा निर्धार आहे.”

# वेचक

## न. प. निवडणूककरिता पुसद काँग्रेसतर्फे उमेदवार अर्ज प्रक्रिया सुरु



पुसद - आगामी होऊ घातलेल्या नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक करिता पक्षाचे छापील अर्ज प्रदेश कार्यलयातून प्राप्त झाले आहे. सदर अर्ज विनामूल्य प्राप्त करता येईल अर्ज सादर करतांना पक्षाने ठरवलेल्या फी सोबत अर्ज सादर करावा तरी इच्छुक उमेदवारांनी पक्ष कार्यालयाशी सपंर्क साधावा. इच्छुक उमेदवारांनी अर्ज करण्यासाठी शहर काँग्रेस कमेटी तर्फे आवाहन प्रसिद्धी पत्रका मार्फत करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवार यांनी डॉ. मोहम्मद नदीम सपंर्क कार्यालय (डी. एन. कॉम्पलेक्स वाशीम रोड पुसद) येथून सकाळी 11 ते सायं 5 वाजे पर्यन्त निशुल्क अर्ज प्राप्त करता येईल व अर्ज जमा करते वेळी पक्षाच्या आकरलेल्या फी सह कार्यालयात दि.30 नोव्हेंबर 2025 पर्यन्त जमा करावे. अधिक माहिती करिता सय्यद इस्तीयाक,91 98817 86369 झिया शेख (90119088 यांच्याशी सपंर्क साधावा असे आवाहन शहराध्यक्ष झिया शेख यांनी केले आहे.

## दिवाळीत आनंदाचा शिधा तर दूर, ज्वारी तरी चांगली द्या साहेब!

पांढरकवडा : दिवाळीच्या तोंडावर नागरिकांना आनंदाचा शिधा वाटप होईल, अशी अपेक्षा होती. परंतु अद्यापपर्यंत शिधा वितरण न झाल्याने सर्वसामान्यांत नाराजी व्यक्त होत आहे. त्यातच शासनाने पुरविलेल्या ज्वारीची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. "आनंदाचा शिधा तर दूर, ज्वारी तरी चांगली द्या साहेब!" असा संतप्त स्वर सर्वसामान्यांमधून उमटत असून, गरीब कुटुंबांना दरवर्षी दिला जाणारा दिवाळी शिधा या वर्षी मिळणार की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. किराणा दुकानांत आणि शिधा केंद्रांवर नागरिकांची गर्दी दिसत असली तरी अधिकारी वर्गाकडून स्पष्ट माहिती दिली जात नसल्याचे दिसते. दरम्यान, शासनाकडून मिळणाऱ्या धान्याच्या निकृष्ट गुणवत्तेमुळे लोकांचा संताप अधिक वाढला आहे. गरिब जनतेला दिवाळीत थोडासा दिलासा मिळावा, हीच त्यांची अपेक्षा आहे. मात्र, आनंदाचा शिधा अद्यापही ‘कागदावरच’ असल्याने प्रशासनावरील नाराजी वाढत आहे.

## बाभूळगाव चोऱ्या वाढल्या सीसीटीव्ही बसविण्याची मागणी

बाभुळगाव - बाभूळगाव येथील वार्ड क्रमांक १२ मध्ये झाडे, झुडपे मोठ्या प्रमाणावर वाढली असून चोरीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढलेले आहे. वारंवार चोऱ्या होत असल्यामुळे सीसीटीव्ही बसविण्यात यावे अशा आशयाचे निवेदन नागरिकांनी नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी यांना दिले. वार्ड क्रमांक १२ मध्ये १६ वेळा चोऱ्या झाल्या आहे. नागरिक चोरांचा पाठलाग करण्याच्या तयारीत असताना मध्ये काट्या झाडे झुडपे आडवे येत असल्याने चोरांच्या मागे धावणे शक्य होत नाही शिवाय सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने पोलीस तपासात अडचणी येत आहे यामुळे भयभीत नागरिकांनी नगरपंचायत गाठून लेखी निवेदन सादर करून सीसीटीव्ही बसविण्याची मागणी केली आहे. निवेदन देणाऱ्यांमध्ये पंकज शर्मा, राहुल बोथरा, सुजित साव, सागर काळे, प्रसाद बहिरे, वैभव लेंडे, महेंद्र जावरे, विजय जाधव, नितेश ठाकरे, प्रीतम वेळूकार, बिपिन कडू, भाऊसाहेब फाले आदिचा समावेश होता.

## महाराष्ट्र वीज सेवानिवृत्त कामगारांची सभा मंगळवारी

यवतमाळ : महाराष्ट्र वीज निवृत्त ज्येष्ठ नागरिक संघ यवतमाळ जिल्ह्यातील तिन्ही कंपनीतील सेवानिवृत्त कामगारांची सभा २८ ऑक्टोबरला सकाळी ११ वाजता श्री संताजी मंदिर संकटमोचन रोड येथे आयोजन करण्यात आले आहे. सभेमध्ये संघटनेच्या 'रौप्य महोत्सवी वर्षाचे' आठवे महाअधिवेशन अमरावती येथे ९ नोव्हेंबर रोजी होत असून अधिवेशबाबत माहिती, पुणे येथील ११ नोव्हेंबर रोजी सभेचा वृत्तांत, प्रलंबी प्रश्नावर चर्चा सन २०२६ ते २०२८ करिता जिल्ह्याची नवीन कार्यकारिणी निवड करणे आदी विषयावर वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन मिळणार आहे. या सभेला जिल्ह्यातील वीज निवृत्त परिषण / वितरण कंपनीतील सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन पुरुषोत्तम हरणे, पांडुरंग काटोले, मारोती मोडक, निळकंठ काळे, श्रीराम सावदे, अशोक आसूटकर, किशोर लोणकर यांनी केले आहे.

# यवतमाळ जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे, निवडणूक निरीक्षक व प्रभारींची नियुक्ती जाहीर

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) यवतमाळ जिल्हा वतीने . जिल्हाध्यक्ष श्रीमती वर्षा निकम यांनी जिल्ह्यातील आगामी जिल्हा परिषद, नगर परिषद, नगरपपरिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक तयारीसाठी प्रत्येक विधानसभा मतदारसंघात बैठक घेतली जाणार आहे.

पक्षाने विधानसभानिहाय निरीक्षक आणि निवडणूक प्रभारी नेमणुका जाहीर केल्या असून, संबंधित पदाधिकाऱ्यांना त्यांच्या मतदारसंघात संपर्क साधून कार्यकर्त्यांशी बैठक घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या नियुक्त्या जिल्हाध्यक्ष वर्षा निकम यांनी जारी केल्या आहेत. या अनुषंगाने यवतमाळ विधानसभा मतदारसंघाचे निरीक्षक साजिद जहागिरहार राळेगावचे रामदासजी बनकर दारव्हा विधानसभा प्रभारी रज्जाक भाई पटेल वणी विधानसभा निरीक्षक अशोकजी राऊत केळापूर मतदारसंघ प्रभारी विजयभाऊ कालनकर उमरखेड-महागाव मतदारसंघ निरीक्षिका भावना लेडे आणि पुसद मतदारसंघ निरीक्षक प्रदीप देवसरकर यांची निवड करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्ष निकम यांनी सर्व नियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, “पक्ष संघटन बळकट करण्यासाठी आणि येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा झेंडा पुन्हा फडकविण्यासाठी सर्व निरीक्षकांनी कार्यकर्त्यांशी संवाद वाढवावा, बूथ पातळीवरील तयारीला गती द्यावी आणि लोकसंपर्क अभियान राबवावे.”

या बैठकीला जिल्हा पदाधिकारी, तालुका अध्यक्ष, शहर अध्यक्ष तसेच महिला, युवक आणि किसान सेलचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांना या सभेस उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले असून, आगामी निवडणुकीसाठी पक्षाची रणनीती आणि संघटनात्मक मार्गदर्शन या बैठकीत ठरविण्यात येईल.

# आशा सेविका विश्रांती इंगळे यांचा राज्यस्तरीय सन्मान

## महिला रुग्णांसाठी देवदूत ठरलेल्या इंगळे यांचा सन्मान : शेतकरी नेते मनीष जाधव

**जनमाध्यम प्रतिनिधी**



महागाव - ग्रामीण भागातील आरोग्य सेवेत निष्ठा, समर्पण आणि जनसेवेचा आदर्श ठरलेल्या वागद इजारा ग्रामपंचायतीअंतर्गत कार्यरत आशा सेविका सौ. विश्रांती अरुण इंगळे यांना राज्यस्तरीय “वंदनीय बाळासाहेब ठाकरे जन आरोग्य सेवा पुरस्कार” प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार सार्वजनिक आरोग्य कुटुंब कल्याण मंत्री नामदार प्रकाश आबीटकर यांच्या हस्ते पुणे येथे झालेल्या सोहळ्यात देण्यात आला.

राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत राबविण्यात येत असलेल्या आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत सन 2024–25 मध्ये लाभार्थ्यांची आयुष्यमान कार्ड निर्मिती व वितरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल विश्रांती इंगळे यांची निवड करण्यात आली. पुरस्कार सोहळा 17 ऑक्टोबर 2025 रोजी पिंपरी-चिंचवड येथील ग.दि. माडगूळकर नाट्यगृहात पार पडला. या गौरवाच्या निमित्ताने वागद इजारा ग्रामस्थांच्या वतीने इंगळे यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शेतकरी नेते मनीष जाधव उपस्थित होते. आपल्या भाषणात त्यांनी म्हटले की, “ग्रामीण भागातील महिलांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती घडवून आणत आशा सेविका खऱ्या अर्थाने लोकसेवेचा व्रत जोपासत आहेत. प्रतिकूल परिस्थितीतही विश्रांती इंगळे यांनी केलेले कार्य प्रेरणादायी आहे. या सन्मानाने वागद इजारा गावाचा गौरव वाढविला असून, या कार्याचा आम्हाला अभिमान आहे.” कार्यक्रमाला प्रा. राजू कांबळे, विनोद राठोड, शंकर खोकले, देवला काळे, सुरेश कांबळे, अरुण इंगळे, भीमराव पवार यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवी राठोड यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. राजू कांबळे यांनी मानले.

# महिलांना शिलाई मशीन, एम्ब्रॉयडरी टूलकिटचे वाटप महिला उद्योजकता व कौशल्य उन्नतीसाठी उपक्रम

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आणि स्थानिक हस्तकला व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी, एमआयडीसी बंजारा आर्ट्स फाउंडेशन यवतमाळ येथे एक महत्त्वपूर्ण उपक्रम यशस्वीरित्या पार पडला. कार्यक्रमाचे प्रायोजक हस्तशिल्प विकास कार्यालय, नागपूर यांच्या सौजन्याने व स्नेहदीप बहुउद्देशीय संस्थे अंतर्गत ५० महिलांना शिलाई मशीनचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमाचा उद्देश महिलांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देणे, तसेच त्यांचे कौशल्य वाढवणे हा आहे. हा कार्यक्रम केंद्र शासनाच्या हस्तशिल्प विभागाच्या महिला उद्योजकता व कौशल्य उन्नती कार्यक्रमांतर्गत आयोजित करण्यात आला होता. या विशेष प्रसंगी अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. अध्यक्षस्थान माजी प्राचार्य डॉ. लक्ष्मण उत्तरवार यांनी भूषवले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी हस्तशिल्प विकास कार्यालय, नागपूर येथील असिस्टन्स डायरेक्टर अवधेश ठाकूर यांची उपस्थिती होती. त्यांच्या मार्गदर्शन आणि सहकार्यामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला. राजेश जाधव यांची उपस्थिती मोलाची ठरली. या कार्यक्रमास यवतमाळ ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनील नाईक विशेष अतिथी होते. तसेच प्राध्यापक डॉ. ओंकार यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक यश उत्तरवार यांनी केले. संचालन आकाश राठोड यांनी केले. कार्यक्रमात सहभागी झालेल्या महिलांना आधुनिक शिलाई मशीन व एम्ब्रॉयडरी टूलकिट वाटप करण्यात आले. या मशीनद्वारे त्या महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची संधी मिळणार आहे. स्थानिक बाजारपेठेत शिवणकाम, फॅशन डिझाईन, हातकागद वस्त्रनिर्मिती यासारख्या क्षेत्रात आपला ठसा उमठविता येईल. हा उपक्रम ग्रामीण व निमशहरी भागातील महिलांमध्ये आत्मनिर्भरता जागवणारा असून भविष्यात अधिक महिलांपर्यंत असे उपक्रम पोहोचावेत अशी अपेक्षा मान्यवरांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हस्तशिल्प विकास कार्यालय, नागपूर, व स्नेहदीप संस्था यांनी आयोजन केले.

# शैक्षणिक सेवेतून लोकसेवेकडे झेप, सेवानिवृत्त मुख्याध्यापक ताजुद्दीन काझी काँग्रेसच्या तिकिटावर नगराध्यक्ष पदासाठी इच्छुक

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पांढरकवडा : शैक्षणिक क्षेत्रात तीन दशकांहून अधिक काळ निष्ठेने सेवा बजावून असंख्य विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल करणारे सेवानिवृत्त जिल्हा परिषद मुख्याध्यापक श्री ताजुद्दीन काझी सर यांनी आता लोकसेवेच्या नव्या वाटचालीचा संकल्प केला आहे. येत्या पांढरकवडा नगर परिषद निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या तिकिटावर नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची त्यांची तयारी सुरू असून, या घडामोडीमुळे स्थानिक राजकारणात चांगलीच चर्चा रंगली आहे.

काझी सर हे शिक्षणक्षेत्रातील प्रामाणिक, शिस्तबद्ध आणि जनसंपर्कक्षम व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात. शिक्षक म्हणून काम करताना त्यांनी ग्रामीण आणि दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लावण्यासाठी, तसेच संधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले. राजकारणात प्रवेशाबाबत बोलताना काझी सर म्हणाले, “आता समाजाने दिलेलं ज्ञान आणि अनुभव जनतेच्या सेवेसाठी वापरण्याची वेळ आली आहे. पांढरकवड्याचा सर्वांगीण विकास आणि जनतेच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे हेच माझे उद्दिष्ट आहे.” काँग्रेस पक्षातील अनेक स्थानिक कार्यकर्त्यांनी त्यांच्या इच्छेला पाठिंबा दर्शविला असून, काझी सरांच्या उमेदवारीमुळे निवडणुकीत नवा उत्साह आणि वेगळं समीकरण निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**मोबाईल विसरून मातीशी खेळ**

# अमरावतीत १४५ विद्यार्थ्यांनी साकारले शिवकालीन किल्ले!

**अमरावती/का.प्र.**

दिवाळीच्या आनंदसोहळ्यात विसरलेल्या परंपरेला पुन्हा जीवनदान देत अमरावती शहरात चिमुकल्यांनी शिवकालीन किल्ल्यांची अप्रतिम निर्मिती साकारली. आधुनिक युगात मोबाईलमध्ये रमणारी मुले या उपक्रमात मातीत तुडवत, किल्ले उभारत आणि इतिहासाशी जोडली गेली, गेल्या ३१ वर्षांपासून सलगपणे आयोजित केल्या जाणाऱ्या 'किल्ले बनवा स्पर्धे' त यंदा शहरातील ३५ शाळांतील १४५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. अंबिका नगर येथील महापालिका शाळेच्या मैदानावर ही स्पर्धा उत्साहात पार पडली.

## 'मातीशी नाते जोडा, इतिहासाशी मैत्री करा!'

**'मातीतून इतिहास साकारला'**

अंगाला माती लागू न देणाऱ्या पिढीतले हे चिमुकले माती, चिखल आणि पाण्यात खेळत किल्ले बनवण्यात दंग झाले.कोणीतरी रायगड उभा केला, तर कोणीतरी शिवनेरी, सिंधुदुर्ग, प्रतापगड, लोहगड, तोरणा आणि जंजिरा उभारून इतिहास जिवंत केला. मुलांनी मातीच्या भिंती, बुरुज, दरवाजे,



झेंडे, सरदारांचे पुतळे आणि अगदी तोफाही बनवल्या.

दोन गटांत उत्साही स्पर्धा स्पर्धा शिवाजी गट (१६ वर्षांवरील) आणि संभाजी गट (५ ते १६ वर्षे वयोगट) अशा दोन विभागांत झाली.प्रत्येक गटाला दोन दिवसांचा वेळ देण्यात आला. मुलांनी अथक परिश्रमाने आणि संघभावनेने किल्ले पूर्ण केले.

'मोबाईल विसरून मातीशी खेळणारी मुले पाहून पालक भारावून गेले, असे मत पालकांनी आयोजकांना सांगितले. पालकांचा अभिमान, शिक्षकांचा आनंद अनेक पालकांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. 'घरात बसून मोबाईलमध्ये रमणारी मुले आज मातीशी खेळताना पाहून डोळ्यांत आनंदाश्रू आले, असे एका पालकाने सांगितले. 'आपल्या मुलांना आपली संस्कृती, आपला इतिहास समजावा, म्हणून ही स्पर्धा घेतो, असे सुनील पांडे सर यांचे मत आहे. त्यांनी आवाहन केले - 'किल्ले फक्त मातीचे नव्हेत, ते आपल्या संस्कारांचे प्रतीक आहेत. प्रत्येक घरात एक किल्ला उभा राहू दे!'

**'परंपरा जपा, संस्कार रुजवा'**

दिवाळी म्हणजे फक्त दिव्यांचा उत्सव नव्हे, तर संस्कारांचा उत्सव. मुलांना इतिहास, कल्पकता आणि संस्कृतीशी जोडणारा हा उपक्रम म्हणजे अमरावतीच्या मातीचा अभिमानच म्हणावा लागेल.किल्ला म्हणजे फक्त बांधकाम नव्हे, तो आपल्या स्वराज्याचा पाया आहे!, मातीशी नाते जोडले की इतिहास आपोआप जवळ येतो! ,मोबाईल विसरा, मातीला स्पर्श करा तीच खरी परंपरा आहे!ह या सोबतच श्री विठ्ठलानंद सरस्वती फिरते वाचनालय यांच्या द्वारे मुलांसाठी 'पुस्तक तुमच्या दारी' या कल्पनेतून पुस्तकांची मोठी प्रदर्शनी साकारली. या प्रदर्शनाचा पालकांनी व मुलांनी उत्साहपूर्वक आनंद घेत २१/-रूपात आपली नोंदणी करत २ महिने पुस्तक वाचनाचा संकल्प करत सहभाग नोंदवला. आपण देखील यात सहभागी होऊ शकता. १७,१८,१९ ऑक्टोबर २०२५ मध्ये होऊ घातलेल्या स्पर्धेत संभाजी गटात प्रथम क्रमांक सोहम चौधरी आणि रुद्र मरकाम यांनी पटकावला. द्वितीय क्रमांक कुलदीप चव्हाण, चेतन राणे आणि तन्मय रावळे यांनी मिळवला. तृतीय क्रमांक देहूळकर, अनुप भेंडे, माही केने आणि रिद्धी बावणे यांनी प्राप्त केला. तसेच प्रोत्साहन पारितोषिक ऋग्वेद ठाकरे, सिद्धार्थ ढेमने, आरव मेहरे आणि कृष्णा अवधाते यांना देण्यात आले.

शिवाजी गटात प्रथम क्रमांक ऋषी ओकलकर आणि ओम ओकलकर यांनी मिळवला. द्वितीय क्रमांक प्रज्वल दवळे आणि राम गायकवाड यांच्या नावावर राहिला. तृतीय क्रमांक रश्मी आपटे, मिताली गिजरे,



मंजिरी गिजरे आणि यशवंत गिजरे यांनी पटकावला. या समारोपिय कार्यक्रमावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनील पांडे यांनी केले. प्रा. डॉ. निखिलजी मोहोड यांनी मुलांना मार्गदर्शन केले. तसेच किल्ल्यांचे परीक्षण नितिन कोळेश्वर व नितिन लवंगे यांनी केले समारोपिय कार्यक्रमाचे संचालन स्वराज ठाकरे व अनुराधा पांडे यांनी केले व आभार प्रदर्शन प्रथमेश सिंग यांनी केले.

कल्पक किल्ले बनवा स्पर्धा २०२५ कार्यकारिणी मुख्य संघटक सुनील पांडे, अध्यक्ष अशोक महल्ला, उपाध्यक्ष विनोद वैद्य, स्वागताध्यक्ष नानकराम नेमनानी, सचिव सुनील भालेराव, सहसचिव प्रवीण कौंडन्य, कोषाध्यक्ष श्याम झोडे,मतदारसंघ विजय बोबडे, समन्वयक अनुराधा एस. पांडे नियोजन प्रमुख रक्षित खानीवाले, अथर्व हिल्स स्वराज ठाकरे, प्रथमेश सिंग, अथर्व देशमुख, भावेश बोरकुटे ,अदिती हिर्लेकर, कृषिका डफळे,सृष्टी महाजन, केशव बत्रा, पार्थ मालवीय, मित बुधलानी, सुनील देशमुख, सुधीर देशमुख, चेतन पवार, प्रशांत वानखेडे, राजाभाऊ गयाल, सुजाता पांडे, ललिता ढोले, क्षामा वैद्य, मीनाक्षी भालेराव, सुनिला पाकिणे, वैशाली गाडे कविता पांडे, गौरव केणे, प्रथमेश पाठक, अथर्व दाबेली, समीर भारती, अजिंक्य देशपांडे, रिश्वंजय देशमुख, शशिकांत क्षीरसागर, पार्थ कर्णिक, प्रसनजीत सवाई, समर्थ दिघेकर, परीक्षित ठाकरे, भारती, यश गहाणकर, अथर्व देशमुख, वैभवी भारती, सई आकांत. मार्गदर्शक- नंदकिशोर बजाज, चंद्रकुमार (लंपीचंद) जाजोदिया ह्या कार्यकारणीने तसेच या सोबत अनेक सदस्यांनी ही स्पर्धा यशस्वीरित्या पार पडली.

**'प्रदर्शनातून शिकला इतिहास'**

किल्ला बनवण्याच्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांची सचित्र माहिती देणारे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. समुद्रकिनाऱ्यावरचा सिंधुदुर्ग, अभेद्य जंजिरा आणि सह्याद्रीच्या टोकावर असलेला रायगड या किल्ल्यांविषयी विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण माहिती घेतली. प्रदर्शन पाहणाऱ्या प्रेक्षकांनीही 'इतिहास इतक्या सुंदर पद्धतीने जिवंत झाला, हे अविश्वसनीय आहे,' असे मत व्यक्त केले. संघटनांचा पुढाकार, परंपरेचा वारसा या परंपरेला जिवंत ठेवण्यासाठी श्री विठ्ठलानंद सरस्वती फिरते वाचनालय, विदर्भ मल्लखांब असोसिएशन, दस्तुरनगर सेवा समिती, महाराष्ट्र राज्य विद्यार्थी कल्याण शिक्षक पालक संघ,राजापेठ स्पोर्टिंग क्लब आणि अंबिका नगर श्री गणेश मंदिर संस्था यांचा एकत्रित पुढाकार राहिला आहे. गेल्या २९ वर्षांपर्यंत ही स्पर्धा दस्तुर नगर परिसरात होत होती. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून ती अंबिका नगरमधील मैदानावर भरवली जाते.



# श्री गजानन विजय ग्रंथाचे महापारायण

**बेलोरा/वार्ताहर**

भानगाव तिर्थक्षेत्र बेलोरा (ता. चांदूरबाजार, जि. अमरावती) येथील श्री संत गजानन महाराज मंदिर परिसरात श्री गजानन विजय ग्रंथाचे महापारायण झाले. या पवित्र कार्यक्रमाचे मार्गदर्शन व प्रवचन हेमा कराळे यांनी केले.

सकाळी श्रींच्या मंगल आरतीनंतर पारायण दिवसभर श्रींच्या नामस्मरण, भजन आणि आरत्यांनी मंदिर परिसर भक्तिरसाने ओथंबून गेला.या महापारायण प्रसंगी पंचक्रोशीतील असंख्य भाविक भक्तांनी मोठ्या श्रद्धेने उपस्थित राहून श्रींचे दर्शन घेतले व पुण्यलाभ प्राप्त केला. महिलांनी पारंपरिक वेशभूषेत हरिपाठ, कीर्तन आणि आरत्या सादर केल्यामुळे संपूर्ण परिसरात



एक अद्भुत आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले. या कार्यक्रमाच्या शेवटी सर्व भाविकांना महाप्रसादाचा लाभ देण्यात आला. श्रींच्या मूर्तीचे दान हे स्व. पंचफुर्ला शेंडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ निलेश शेंडे (अकोट) यांच्या तर्फे सप्रेम अर्पण करण्यात आले आहे. तसेच येणाऱ्या बुधवारी श्रींच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कळसरोहण सोहळ्याला सर्व भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. ३० ऑक्टोबर २०२५ रोजी पुरणपोळीच्या महाप्रसादाचा विशेष बेत आखण्यात आला असून, सर्व भक्तांनी या दिव्य सोहळ्याला उपस्थित राहून श्रींच्या कृपेचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा प्रतिमा ठाकरे, सचिव अश्विनी ठाकरे, विश्वस्त योगिर्ता गाडबैल, ज्योत्सर्ना खवले, माधुरी ठाकरे, प्रमोदीनी ठाकरे, तसेच मार्गदर्शक विस्मय ठाकरे यांनी केले आहे.

# बेड्यावरील गरजूंपर्यंत पोहचली काँग्रेसची 'कपडा बँक'

## दिवाळी सणानिमित्त छोट्या-मोठ्यांना कपडे वितरित

**तिवसा/वार्ताहर**

दिवाळी हा सण सर्वत्र साजरा केल्या जातो.या सणाला घरोघरी गोड-धोड,नवीन कपडे व साहित्य खरेदी केले जातात.मात्र जे कुटुंबीय बेड्यावर वास्तव्यास असतात,रोजगाराच्या दृष्टीने फिरस्ती व्यवसाय करून पोट भरतात,अश्या गरजूंना देखील फुल ना फुलांची पाकळी म्हणून दिवाळीचा आनंद देता यावा,त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्यात यावे,म्हणून दरवर्षी माजी मंत्री यशोमती ठाकूर मित्र मंडळ, तिवसा शहर काँग्रेस व युवक काँग्रेसच्या वतीने 'कपडा बँके'च्या माध्यमातून कपडे देण्यात येते.

दहा वर्षापासून तसेच कोरोना काळात सुद्धा तिवसा शहरातील बेड्यांवर राहणाऱ्या व गावोगावी विविध रोजगाराच्या अनुषंगाने



फिरस्ती असणाऱ्या परिवारांना दिवाळी सणानिमित्त,कपडा बँक या सातत्याने सुरू असलेल्या संकल्पनेतून दीपावली पाडव्यानिमित्त नवीन साड्या व बालगोपाल व पुरुष मंडळींसाठी कपडा बँकच्या निमित्ताने सेवाभावी स्वरूपात गोळा केलेल्या कपड्यांचे वितरण करून, सामाजिक ऐक्य जपण्याचा व राजकीय क्षेत्रात काम करत असताना समाजकारणाला प्राधान्य देणाऱ्या संघटनेसोबत काम करतोय याचा सर्व उपस्थित सहकार्य व पदाधिकाऱ्यांना विशेष आनंद वाटला.यावेळी शहर काँग्रेस अध्यक्ष सेतू देशमुख,कार्याध्यक्ष सुनिल बाखडे, किसनराव मुंदाने, प्रमोदराव देशमुख, गजानन भोंबे, नरेंद्र विघ्ने, अतुल गवड, प्रणव गौरखेडे, दिवाकर भुरभुरे,योगेश कोहळे,सागर राऊत,सचिन वानखडे,वैभव काकडे, गौरव चौधरी,सर्जा वाघमारे,आकाश मकेश्वर,श्याम वानखडे,वैभव वानखडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# २८ ला राज्यस्तरीय विज्ञान नाट्योत्सव स्पर्धा

**अमरावती/का.प्र.**

नाटकोत्सव स्पर्धा २८ ऑक्टोबर रोजी श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयात आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत विज्ञान आणि कलेचा संगम रंगणार आहे. राष्ट्रीय विज्ञान संग्रहालये परिषद, नेहरू विज्ञान केंद्र, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, राज्य विज्ञान शिक्षण संस्था, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने ही राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन मनपा आयुक्त सोमेश शर्मा यांच्याहस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख हे राहतील. प्रमुख उपस्थिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे विभागीय अध्यक्ष साबळे, शिक्षण उपसंचालक नीलिमा टाके यांची राहणार आहेत. या स्पर्धा राज्य विज्ञान शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. हर्षलता बुराडे यांच्या मार्गदर्शनात पार पडणार आहेत. नाटक आणि संवादाच्या माध्यमातून विज्ञान आणि तंत्रज्ञानाबद्दल जागरूकता निर्माण करणे, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक विचारसरणी कल्पनाशक्ती आणि नवा दृष्टिकोन विकसित करण्यास प्रोत्साहन देणे, हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे. इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सर्वांनी या नाट्योत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजक सचिव डॉ. पंकज नागपुरे यांनी केले आहे.

# शेगाव नाक्यावरून दुचाकी चोरीला गेली.

**अमरावती** - शेगाव नाका येथे दुचाकी उभी करून काही कामानिमित्त गेलेल्या इसमाची दुचाकी चोरी झाल्याची घटना गाडगेनगर पोलिसस्टेशन हद्दीतील रंगोली वाईन शॉप, शेगाव नाका मुराई कॉम्प्लेक्स येथे घडली.फिर्यादी संतोष भगवानदास ग्यारल (३९) रा.लायब्ररी चौक फ्रेजरपुरा हे रंगोली वाईन शॉपमध्ये नोकरी करतात. त्यांनी आपली दुचाकी क्र. एमएच २७ बीआर २९१३ ही दुकानासमोर उभी करून ठेवली होती. रात्री सुट्टी झाल्यानंतर घरी जाण्यासाठी दुचाकी पाहिली असता ठेवलेल्या ठिकाणी मिळून आली नाही. ती अज्ञात चोरट्याने चोरून नेली अशा तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

**परिपहावा कोण राहिला भुकेला घरी!**

# आदिवासी बांधवासोबत दिवाळी साजरी

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

दिवाळीचा सण आला ।
सर्वांनीच पाहिजे केला ।
परि पाहावा कोण राहिला ।
भुकेला घरी ॥

या राष्ट्रसंताच्या ग्रामगीतेतील ओवीनुसार दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा तालुक्यातील गुरूदेवसेवा मंडळाशी एकनिष्ठ असलेल्या सातेगावातील दास संघटनेने दिवाळीनिमित्त आदिवासी बांधवांना व लहान मुलांना नवीन स्वेटर, खेळणी, शालेपयोगी वस्तू, कपडे, महिलांना साड्या वाटप करण्यात आल्या.

मेळघाट यावर्षी दास संघटनेने मेळघाट दीपोत्सव-२०२५ निमित्ताने स्वेटर वाटण्याचा निर्णय घेतला. लहान मुलांना ३० स्वेटर,




खेळणी, शालेपयोगी वस्तू व महिलांना साड्या वाटप करण्यात आल्या. हे सेवेचे १५ वे वर्ष आहे. दरवर्षी दास संघटना हा उपक्रम राबवीत असते, तसेच दहा दिवस अगोदरच पूर्ण नियोजन तयार करावे लागते. यावेळी खूप लोकांनी पैशांच्या रूपयांत मदत केली. त्या पैशांनी नवीन वस्तू खरेदी केल्या व त्या वाटप करण्यात आल्या.याप्रसंगी दास संघटनेचे संस्थापक गजानन मु. काळे, नितीन टाक, विठ्ठल ढोले राष्ट्रसंत मीडियाचे संचालक नकुल पालखडे, निलेश देवर, प्रवीण गावंडे, आदी उपस्थित होते.

## जिल्हा परिषद सर्कल मधून

# सुनील सोमवंशी निवडणूक रिंगणात उतरणार

**मोर्शी/वार्ताहर**

येत्या एक ते दीड महिन्यात तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूक होत असून या सार्वत्रिक निवडणुकीत पिंपळखुटा मोठा हा जिल्हा परिषद सर्कल सर्वसाधारण पुरुष या साठी राखीव असल्याने या जागी भारतीय जनता पार्टीच्या वतीने उमेदवारी साठी सुनील सोमवंशी इच्छुक असून निवडणूक रिंगणात उतरण्यासाठी ताकद लावणार असल्या चे चित्र दिसून येत आहे.



गेल्या दहा ते पंधरा वर्षांपासून भारतीय जनता पार्टीचे माजी कृषिमंत्री तथा विद्यमान राज्यसभेचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांचे खाजगी सचिव म्हणून गेल्या अनेक वर्षापासून मंत्रालयीन कामकाज पाहत आहे. सुनील सोमवंशी जिल्हा परिषद पिंपळखुटा सर्कल साठी भारतीय जनता पार्टी तर्फे निवडणूक लढण्यासाठी इच्छुक असून ते पार्टीकडे तिकीटी ची मागणी असल्याचे समजते. सोमवंशी हे गेल्या अनेक वर्षांपासून राजकारणाशी संबंधित असल्याने व त्यांना राजकारणाचा दीर्घ अनुभव असल्यामुळे याचा फायदा निवडणुकीच्या माध्यमातून होणार आहे. ते येरला पंचायत समिती सर्कल मधली असल्याने त्यांचा पिंपळखुटा मोठा जिल्हा परिषद दांडगा संपर्क असल्याने मतदार संघातील मतदार त्यांना पसंती देत असल्याचे दिसून येत आहे. भारतीय जनता पार्टीच्या वतीने सुनील सोमवंशी यांना उमेदवारी दिल्यास भाजपाला मोठा फायदा होणार असल्याचे दिसून येत आहे.

# शासनाकडून अद्याप सोयाबीन व कापूस खरेदी केंद्रांना प्रारंभ नाही

**चांदूर रेल्वे परिसरातील शेतकऱ्यांत तीव्र नाराजी**

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

तालुक्यातील शेतकरी वर्ग दिवाळीनंतर आता खरीप हंगामातील उत्पादन विक्रीसाठी सज्ज झाला असताना, शासनाकडून सोयाबीन आणि कापूस शासकीय खरेदी केंद्रांना अद्याप प्रारंभ न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

यंदा चांगला पाऊस झाल्याने अनेक शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सोयाबीन आणि कापसाची लागवड केली होती. मात्र सध्या बाहेरच्या व्यापाऱ्यांकडून सोयाबीनला केवळ ३२०० ते ४२०० रुपये प्रति क्विंटल इतका भाव दिला जात आहे, जो शासकीय हमीभाव ५,३२८ रुपये प्रति क्विंटल पेक्षा तब्बल ११२८ ते २१२८ रुपयांनी कमी आहे. तर कापसाचा ८१०० रूपये हमीभाव असून सध्या बाहेरच्या व्यापाऱ्यांकडून ६००० ते ६३०० रूपये दराने कापूस खरेदी केला जात



आहे. या परिस्थितीत शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून शासनाने हमीभावाने सोयाबीन व कापूस खरेदी केंद्र तात्काळ सुरू करावीत, अशी मागणी शेतकऱ्यांकडून जोर धरू लागली आहे. बाजारपेठेत व्यापारी आपल्याच मनमानीने दर ठरवत असल्याने शेतकऱ्यांना उत्पादन विक्री करतांना तोटा सहन करावा लागत आहे. काही शेतकऱ्यांना तर आर्थिक अडचणींमुळे कमी दरात माल विकावा लागत आहे.

**शासनाने तात्काळ केंद्र सुरू न केल्यास तिव्र आंदोलन - प्रशांत शिरभाते**

'शासनाकडून सोयाबीन व कापसाच्या शासकीय खरेदी केंद्रांना अजूनही सुरुवात झालेली नाही, हे शेतकऱ्यांवरील अन्यायच आहे. बाहेर व्यापारी सोयाबीनला ३२०० ते ४२०० रुपये भाव देत असताना शासनाने घोषित केलेला हमीभाव ५,३२८ रुपये आहे. हा फरक शेतकऱ्यांच्या कष्टावर पाणी फेरणारा आहे. हाच फरक कापसात सुद्धा दिसून येत आहे. शासनाने तात्काळ केंद्र सुरू करून हमीभावाने खरेदी सुरू करावी, अन्यथा स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

# ‘जीएसटी-२’ आणि पुढे...

**‘जीएसटी’मधील बदलांचा सकारात्मक परिणाम दिवाळीच्या दरम्यान संपूर्ण बाजारपेठेवर प्रकर्षाने दिसून आला. व्यावसायिक व ग्राहकांमधील खरेदीच्या उत्साहाने अर्थव्यवस्थेलाही सर्वस्वी चालना दिली. पण, अर्थव्यवस्थेतील हाच उत्साह, हीच तेजी दिवाळीपश्चातही टिकवून ठेवायची असेल, तर सरकारला आणखीन कोणत्या बाबींकडे प्रामुख्याने लक्ष केंद्रित करावे लागेल, त्याचा आढावा घेणारा हा लेख...**

नवरात्रीच्या मुहूर्तावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून ‘जीएसटी’ अंतर्गत विविध महत्त्वाच्या व ग्राहक-उत्पादकांसह जन सामान्यांना लाभदायी व फायदेशीर सुधारणांचा समावेश असलेल्या ‘जीएसटी-२’ या धोरणात्मक निर्णयाची घोषणा करून, त्याची लगोलग अंमलबजावणीही सुरू झाली. नवरात्रोत्सवापासून लागू करण्यात आलेल्या या नव्या व अर्थपूर्ण ‘जीएसटी’ धोरणाचा फायदा मिळाल्याने दिवाळीनंतर सामान्यांपासून व्यावसायिकांपर्यंत सर्वांच्याच आशा-अपेक्षा वाढल्या असून, सामान्य जनांच्या बचतीपासून उद्योजकांचा व्यवसाय व शेती-शेतकरी या विविध क्षेत्रांमध्ये नव-संवत्सरात समृद्धी घडवून आणण्यासाठी पुढील अपेक्षा प्राधान्याने व प्रमुखपणे व्यक्त केल्या जात आहेत.

### कामगार कायद्यांची अंमलबजावणी

बहुप्रतीक्षित कामगार कायद्यांच्या अंमलब जावणी साठी संसदेने केंद्रीय स्तरावर ‘कामगार कायदे संसदे’मध्ये पारित केले आहेत. यामागे व्यवसाय-पूरक व बदलत्या काळानुरूप कामगार कायद्यांचे नवे प्रारूप तयार करून त्याला आवश्यक नियमांसह अंमलबजावणी करण्याची जबाबदारी राज्य सरकारांवर सोपवली.

काही राज्यांनी यासंदर्भात पुढाकार घेऊन नव्या कामगार कायद्यांची अंमलबजावणी सुरू केली असली, तरी बर्‍याच कायद्यात राज्य स्तरावरील नवे कामगार कायदे व नियम अद्यापही लागू झालेले नाहीत. ही तफावत अद्यापही कायम असल्याने त्याचे परिणाम उद्योग-कामगार क्षेत्रात अद्याप दिसत आहेत. परिणामी, उद्योगांची व्यावसायिक क्षमता व कर्मचार्‍यांची कार्यक्षमता या उभयतांवर विपरित परिणाम अद्याप जारी आहेत.

### नागरी विकासाला चालना

मूलभूत सुविधा व शहरी विकासाला नियोजन पूर्ण चालना देणे फार महत्त्वाचे ठरले आहे. या दोन्ही संदर्भातील विकासाचे संतुलन राखणे नेहमीच महत्त्वाचे ठरते व यावर्षी अधिकांश राज्यांमध्ये झालेला मोठा पाऊस-पूरसदृश स्थिती व बरेच ठिकाणी निर्माण झालेल्या ढगफुटीच्या पार्श्वभूमीवर असे संतुलन निर्माण करणे, हे एक मोठेच आव्हान निर्माण झाले आहे. मुख्य म्हणजे, या अवकाळी वा अस्मानी संकटांचा परिणाम जनसामान्यांपासून पर्यटन-व्यवसाय, व्यापार-उद्योगांपर्यंत विविध क्षेत्रांवर विपरित स्वरुपाचा होऊन, त्यामुळे विविध प्रकारे नुकसान होत असते, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे.

### निर्गुंतवणुकीकरणाला गरजेनुरूप प्राधान्य

जागतिक स्तरावरील आवश्यक व्यवसायाला साजेसे व आवश्यक स्वरूपातील विदेशांसह विविध गुंतवणूकधारकांचे गुंतवणुकीचे प्रमाण वाढविणे व सरकारी क्षेत्रातील व्यावसायिक गुंतवणूक विधायक धोरणाचा फेरविचार करणे आवश्यक ठरते. मुख्य म्हणजे, नव्या व बदलत्या व्यावसायिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर विदेशी वा आंतरराष्ट्रीय गुंतवणुकीच्या संदर्भात गुंतवणूक करताना सरकार-वित्तीय संस्था व उद्योजक यांनी परस्परपूरक व ग्राहकांसह सर्वपक्षी फलदायी अशा धोरणांची आखणी करायला हवी.

या वर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पात एक मोठी व महत्त्वाकांक्षी धोरणात्मक आर्थिक बाब म्हणून केंद्र सरकारने राष्ट्रीय पातळीवर औद्योगिक गुंतवणुकीसाठी




व्यापक निधी गंगाजळी स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी सुमारे दहा लाख कोटी रुपयांची तरतूद करण्याची केलेली घोषणा व आखणी तरतूद महत्त्वाची ठरणार आहे.

### आवश्यक काळजीसह आयात

काही विशेष, महत्त्वाच्या व ‘मेक इन इंडिया’साठी पूरक आणि आवश्यक वस्तू व कच्चा माल आयात करणे अपरिहार्य ठरते. अशा प्रकारे भारतीयांद्वारे स्वदेशी उत्पादनांच्या निर्यातीला मोठा वाव आहे. मात्र, त्यासाठी काही काळजी घेणे मात्र महत्त्वाचे ठरणार आहे.

यासंदर्भातील प्रमुख उदाहरण म्हणजे, आज वाहनांच्या मोठ्या प्रमाणातील उत्पादन व निर्यातीसाठी भारताला विविध प्रकारच्या बॅटर्‍यांची आयात करावी लागते. प्राप्त परिस्थितीत व ‘मेक इन इंडिया’ला पाठबळ देण्यासाठी ते आवश्यक आहे. यावर्षी फेब्रुवारीमध्ये सरकारद्वारा घोषित धोरणानुसार वाहनांच्या बॅटरीशिवाय विविध तांत्रिक उपकरणे, मोटर्स, कंट्रोलर्स, पवनऊर्जेसाठी आवश्यक सुटे भाग व उपकरणे यासाठी देशी पर्याय शोधण्यासाठी संशोधक-उद्योजकांनी पुढाकार घेऊन त्यांना सरकारने पुरेसे सहकार्य वेळेत देणे आवश्यक आहे.

### विशेष संशोधनासाठी आर्थिक तरतूद

आधुनिक तंत्रज्ञानच नव्हे, तर उत्पादन-प्रक्रियेला संशोधनाची जोड देऊन त्याला अधिक प्रगत-परिणामकारक करण्यासाठी केंद्र सरकारने प्रगत संशोधनावर आधारित व पर्यावरणपूरक प्रक्रिया पद्धतीला पाठबळ देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. या निर्णयाच्या अंमलबजावणीला गतिमान करणे आवश्यक आहे.

### ऊर्जाक्षेत्राला उजाळा

देशांतर्गत ऊर्जाक्षेत्रातील विजेचे एकत्रित उत्पादन वाढत आहे. विजेच्या या वाढत्या उत्पादनाने उद्योग-व्यवसायाच्या विजेच्या वाढत्या गरजेची पूर्तता होत असली, तरी विजेचा वाढीव दर ही बाबसुद्धा मध्यम व मोठ्या उद्योगांपुढील समस्या म्हणून कायम आहे. यावर उपाय म्हणून ऊर्जा उत्पादन क्षेत्रातील परंपरागत व गैरपारंपरिक ऊर्जा उत्पादन क्षेत्राचे एक व्यापक एकत्रीकरण करून त्यांच्या उत्पादनखर्चानुसार त्या त्या ऊर्जा उत्पादकांसाठी विजेच्या दराची निश्चिती करणे व त्याशिवाय ऊर्जा उत्पादकांना स्पर्धात्मक स्वरूपात विजेच्या दराची आखणी करण्यासाठी प्रोत्साहन देणे, यासारखे उपाय महत्त्वाचे ठरतील.

### वाहतूकखर्चावरील नियंत्रण

भारतीय उद्योग-व्यवसाय क्षेत्रातील सकल घरेलू उत्पादन म्हणजेच ‘जीडीपी’ च्या १३ ते १४ टक्के खर्च हा कच्च्या मालापासून उत्पादनांच्या मालवाहतुकीवर खर्च होतो. यावर नियंत्रण मिळविल्यास व्यवसायाला आर्थिक लाभ निश्चितपणे मिळू शकतो. त्यादृष्टीने केंद्र सरकारची ‘प्रधानमंत्री गतिशक्ती योजना’ यासारखा पुढाकार लाभदायी ठरू शकतो.

### तक्रारविरहित व्यवसायपद्धती

काळानुरूप बदलत्या परिस्थितीत देश-विदेशपातळीवर व्यावसायिक संदर्भात मात करण्यासाठी उत्पादन असो वा सेवा, यासंदर्भात अचूकच नव्हे, तर गुणवत्ताप्रचुर व दर्जायुक्त कार्यपद्धतीवर भर देणे नितांत आवश्यक ठरणार आहे. ‘जीएसटी-२’ नंतरच्या टप्प्यात ही बाब भारतीय उद्योजकांनी मनावर घेऊन प्रयत्नपूर्वक काम करणे अधिक फलदायी ठरणार आहे.

**दत्तात्रय आंबुलकर**

# ‘क्रॉस व्होटिंग’ आणि राजकीय समीकरणे

केंद्र सरकारने ५ ऑगस्ट २०१९ रोजी जम्मू आणि काश्मीर राज्याला घटनेच्या कलम ३७० नुसार दिलेला विशेष दर्जा काढून घेतल्यानंतर, राज्याचे जम्मू-काश्मीर आणि लडाख अशा दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये विभाजन झाले. या ऐतिहासिक बदलांनंतर, जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीतून (जी नंतर झाली असावी) नवनिर्वाचित आमदारांनी पहिल्यांदाच चार राज्यसभेच्या जागांसाठी निवडणूक पार पाडली.या निवडणुकीत, जम्मू-काश्मीर विधानसभेत भारतीय जनता पक्षाकडे (भाजप) राज्यसभेवर निवडून येण्याइतके आमदारांचे स्पष्ट संख्याबळ नसतानाही, नाट्यमय रीत्या भाजपचे उमेदवार सत शर्मा यांचा विजय झाला. त्यांना मिळालेल्या ३२ मतांमुळे विरोधी पक्षांच्या गोटात आश्चर्य आणि संशयाचे वातावरण निर्माण झाले.जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी या निकालावर तीव्र नाराजी व्यक्त केली आणि प्रश्न उपस्थित केला की, नॅशनल कॉन्फरन्सच्या आमदारांनी आपल्या उमेदवाराला मतदान केले असताना, भाजपला ही अतिरिक्त चार मते कोठून मिळाली?अब्दुल्लांचा संशय स्पष्टपणे विरोधी आघाडीतील आमदारांनी केलेल्या ’क्रॉस व्होटिंग’ किंवा ’जाणूनबुजून चुकीच्या पसंती क्रमांकाचे मत’ टाकण्याकडे होता.एकल संक्रमणीय मत पद्धत राज्यसभा निवडणुकीत वापरल्या जाणाऱ्या एकल संक्रमणीय मत पद्धतीमध्ये आमदाराने दिलेल्या दुसऱ्या पसंती क्रमानुसार मते हस्तांतरित होतात. काही विरोधी आमदारांनी मतपत्रिकेवर भाजपला पहिली पसंती दिली असेल किंवा त्यांच्या उमेदवाराला आवश्यक कोटा मिळाल्यानंतर दुसरी पसंती भाजपला गेली असावी, ज्यामुळे भाजपच्या उमेदवाराचा अनपेक्षित विजय झाला. ही चार अतिरिक्त मते पक्षादेश झुगारून भाजपच्या पारड्यात पडली, यावरून विरोधी गटात मोठी राजकीय फूट पडल्याचे स्पष्ट झाले. विधानसभेत स्पष्ट बहुमत नसतानाही, भाजपने एका जागेवर विजय मिळवून आपले राजकीय चातुर्य आणि प्रभावी व्यवस्थापन सिद्ध केले आहे.

यामुळे ३७० कलम रद्द केल्यानंतर भाजपने राज्याच्या राजकारणात आपले बळ वाढवले आहे. नॅशनल कॉन्फरन्सला हा मोठा राजकीय धक्का आहे. पक्षाच्या आमदारांनीच पक्षाविरोधात मतदान केल्याचा संशय असल्याने, पक्षांतर्गत शिस्त आणि विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

या निकालामुळे, जम्मू आणि काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्स नंतरचा सर्वात मोठा आणि प्रभावी राजकीय पक्ष म्हणून भाजपचा प्रभाव वाढला आहे. येणाऱ्या काळात विधानसभा निवडणुकांमध्ये भाजप या ’क्रॉस व्होटिंग’च्या यशाचा फायदा घेऊन स्वतःला नॅशनल कॉन्फरन्सला कडवे आव्हान देणारा प्रमुख पक्ष म्हणून स्थापित करू शकतो.ही निवडणूक ३७० कलमानंतरच्या जम्मू-काश्मीरच्या बदललेल्या राजकीय समीकरणांचा एक महत्त्वाचा टप्पा ठरली आहे, जिथे विरोधी आघाडीतील अंतर्गत मतभेद आणि भाजपचा धूर्त राजकीय डावपेच स्पष्टपणे दिसून आला.

**अविनाश देशपांडे**

# यांच्यावर देशद्रोहाचा खटला दाखल करा !

‘अतिथी देवो भव:’ म्हणून ख्याती असलेल्या भारतात दरवर्षी लाखो विदेशी पर्यटक येत असतात. येथील प्राचीन भारतीय संस्कृती, येथील विविधतेतील एकता, परंपरा, पोशाख, भाषा त्यांना भुरळ घालते. पर्यटनाच्या माध्यमातून दरवर्षी देशाच्या तसेच राज्यांच्या तिजोरीमध्ये



अब्जावधी रुपयांची भर पडत असते. पाहुण्यांचा आदर करण्यास शिकवणारी, अतिथींमध्ये देवाचे रूप पाहणारी आपली संस्कृती पर्यटकांवर गारुड निर्माण करते. मागील काही वर्षांपासून मात्र काही विकृत मनोवृत्तीच्या धेंडांमुळे विदेशी पर्यटकांना भारतात वाईट अनुभव येऊ लागले आहेत. याच वर्षी हम्पी येथे पर्यटनासाठी आलेल्या इस्त्रायली तरुणीसह भारतीय तरुणीवर सामूहिक बलात्कार झाल्याची घटना घडली होती. त्यापाठोपाठ दिल्लीत एक ब्रिटिश पर्यटकावर अत्याचार झाल्याची घटना वाचनात आली होती. सिंहगडावरील घटनेने तर महाराष्ट्राचीही नाचक्की झाली होती. सिंहगडावर गिर्यारोहणासाठी आलेल्या न्यूझीलंडच्या एका तरुण पर्यटकाला काही अल्पवयीन मुलांनी मराठीतील अश्लील आणि गलिच्छ शिव्या द्यायला लावल्या. नुकतीच इंदूरमध्ये ऑस्ट्रेलियन महिला क्रिकेटर्सचा विनयभंग झाल्याची घटना घडली. आयसीसी महिला विश्वचषक खेळण्यासाठी भारतात आलेल्या ऑस्ट्रेलियन संघाच्या दोन क्रिकेटपटू हॉटेलबाहेर पडत असताना दुचाकीवरून आलेल्या अकील खान नावाच्या इसमाने त्यांचा विनयभंग केला. या घटनेची पोलिसाकडून तातडीने दखल घेण्यात आली आणि तासांतच अकील खानला अटक करण्यात आली. या सर्व घटना आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची प्रतिमा मलिन करणाऱ्या आहेत. एक सुसंस्कृत देश म्हणून जगभरात भारताची ख्याती आहे अशा सुसंस्कृत देशाची काही नराधमांमुळे आज बदनामी होत आहे. अशा नराधमांना आयुष्यभराची अद्दल घडेल आणि भविष्यात पुन्हा कोणी असे करण्यास धजावणार नाही अशाप्रकारची कठोर शिक्षा केली जाणे अपेक्षित आहे. देशाची प्रतिमा मालिन करणाऱ्या या धेंडांवर देशद्रोहाचाही गुन्हा प्रविष्ट करण्यात यावा !

**सौ. मोक्षदा घाणेकर,**
काळाचौकी,
मुंबई



# ‘आले देवाजीच्या मना’...!

महाराष्ट्रात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीपुर्वी दिवाळीच्या फटाक्यांना जोर आला आहे. अगदी दिवाळीत बळीराजा उध्वस्त झाला असताना आणि त्याला सरकारी मदतीचे पँकेज म्हणजे ‘वाटाण्याच्या अक्षता’ असल्याचा अनुभव आला तरी आणि लक्ष्मीपूजनाला पाऊस पडला तरी लोकांचा फटाके फोडण्याचा उत्साह काही कमी झाल्याचे दिसले नाही. त्यातच आता राजकीय पक्षांकडुनही निवडणूक तयारीचे फटाके फोडण्याचा धडाकाच सुरू झाल्याचे पहायला मिळाले आहे.

### यशाची खात्री नसल्याने फेक नरेटिव?

फटाके फोडण्याचा हा उद्योग सर्वत्र सुरूच आहे, त्यात महाविकास आघाडी मध्ये सध्या निवडणूक मतदार याद्यांवरून निषेध मोर्चाची तयारी सुरू आहे. तर त्यांच्या या विरोधीसूराला सत्ताधारी भाजप आणि मुख्यमंत्र्याकडून चोख प्रत्युत्तर देण्याची तयारी सुरू आहे. दिवाळीनंतर भाजपकडूनही पूर्वीच्या मतदार याद्यांमध्ये कश्या गमतीजमती घोळ होते आणि त्याचा त्यावेळच्या सत्ताधारी पक्षांनी कसा फायदा घेतला याची पोलखोल केली जाणार आहे म्हणे!दिवाळी पाडव्याच्या दिवशी स्वत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या कुटूंबियानी वर्षा निवासस्थानी निवडक माध्यमकर्मीना स्नेहभोजनाला आमंत्रित केले होते. त्यावेळी अर्थातच अवांतर चर्चा होणे अपेक्षित असताना राजकीय गप्पाटप्पा आणि बातम्यां मागच्या बातम्या शोधण्याचा पत्रकारितेचा आवडता कार्यक्रम झालाच! यावेळी मुख्यमंत्र्याच्या या अनौपचारिक चर्चेमध्ये स्वत: फडणवीस यांनी दहा बारा वर्षापूर्वी भाजपने देखील मतदार याद्यांमध्ये दुबार तिबार नावे आणि गोंधळावर आक्षेप घेतल्याचे सांगितले. इतकेच नाही तर त्याबाबत न्यायालयात याचिका दाखल केली ती आजही सुनावणीसाठी प्रलंबित आहे असे फडणवीस म्हणाले. मात्र राज्याच्या मुख्य निर्वाचन अधिकारी आणि राज्य निवडणूक आयोग या दोन स्वतंत्र यंत्रणा असून त्यांचे कार्य जवळपास समान असलेतरी त्यांच्या कार्यान्वयनासाठी वेगळ्या कायद्यांचा वापर केला जातो, याचे प्राथमिक भान किंवा ज्ञान विरोधकांना नसल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. ते म्हणाले की वास्तविक मतदार याद्यांमध्ये गोंधळ असल्यानेच आपल्याकडे मतदानाची टक्केवारी देखील नेहमीच अपेक्षेपेक्षा कमी असल्याचे दिसून येते. या मतदारयाद्यांमध्ये भाजप सत्तेवर नसतानाही गोंधळ होता आणि काही प्रमाणात तो अजूनही आहे मात्र त्याचा ‘बाऊ’ करून विरोधक एक नकारात्मक वातावरण निर्मिती करताना दिसत आहेत. कारण त्यांच्या यशाची त्यांना खात्री वाटत नसावी असे फडणवीस यांनी अनौपचारीक चर्चामध्ये बोलताना सांगितले. राज्याचे विद्यमान मुख्य निर्वाचन अधिकार एस चोकलिंगम याच्या कार्यपध्दतीबाबत सध्या सत्ताधारी आणि विरोधक सारेच नाखूश असल्याचेही या निमित्ताने समोर आले आहे. इतकेच नव्हे तर प्रशासकीय अधिकारी आणि यंत्रणा या ‘बिनडोक’ अधिकार्‍याला कंटाळली असल्याचे मत एका अतिवरिष्ठ उच्च पदस्थ नेत्याने व्यक्त केले आहे.

दुसरिकडे ज्या बिहारमध्ये एसआयआर बद्दल विरोधकांनी वातावरण तापवले होते त्याच्याकडून सर्वोच्च न्यायालयापर्यंत दाद मागण्यात आली त्यांनी आता ऐन प्रचारयात्रामध्ये हा मुद्दाच सोडून दिला आहे, कारण त्याने मतदारांमध्ये जो नकारात्मक जोश भरण्याचा त्यांचा मानस होता तो पुर्णत्वास जाताना दिसत नाही असेही ते म्हणाले. गंमत म्हणजे मतदार याद्यांमध्ये घोळ असल्याचे आरोप सत्ताधारी पक्षांच्या अनेक विद्यमान आमदारांकडूनही करण्यात येत आहेत. थोडक्यात ऐन पावसात विरोधकांचे फटाके भिजलेले असल्याने ते फुसके ठरणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्र्याकडून व्यक्त करण्यात आला. त्यांच्यामते विरोधकांमध्ये सध्या निवडणूक बहिष्कारापर्यंतचा टोकाचा विरोध करण्याची कुणाची मानसिकता नाही, फार तर मनसेच्या नेत्यांच उत्साह यात जास्त दिसत असलातरी निवडणूका नकोत असे खालच्या पातळीवर कोणत्याच राजकीय पक्ष कार्यकर्त्याला वाटणार नाही, कारण चार चार वर्ष अनेक ठिकाणी लोक स्थानिक निवडणूकांच्या प्रतिक्षेत आहेत. आता त्यांना थांबवले तर लोक चिडून मारतील असेही फडणवीस यांचे मत त्यांनी व्यक्त केले.

### ‘आले देवाजीच्या मना तेथे कुणाचे चालेना’. . !

महायुतीमध्ये जेथे तीनही पक्षांपैकी दोन मजबुत असतील तेथे मैत्रिपुर्ण लढून नंतर महायुति सत्ता स्थापन करू शकेल त्यामुळे महायुतीच्या विरोधकांना स्पेस मिळणार नाही. तर जेथे आवश्यक असेल तेथे निवडणुक पूर्व जागावाटप करुन निवडणूका लढवू असा फॉर्म्युला असल्याचे मुख्यमंत्रीच म्हटले आहेत. त्यामुळे सध्या महाराष्ट्रात ‘आले देवाजीच्या मना तेथे कुणाचे चालेना’ ही म्हण प्रत्यक्षात येत असल्याने फारसे काही बदल होण्याची शक्यता नाही. अगदी २०२९पर्यत मी स्थीर आहे, मंत्रिमंडळातही सध्याच काही बदल करण्याची गरज नाही, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. त्यानंतर कुजबूज आघाडीमध्ये शिंदे मुख्यमंत्री झाले त्याच्या काही दिवसांपूर्वी ते असेच आत्मविश्वासाने बोलत होते नंतर त्यांना उपमुख्यमंत्री म्हणून अडिच वर्ष काम करावे लागले होते याची आठवण दिली! काही असो देवाभाऊंचे ठरले आहे.

**मंकी बात**

सध्या तरी भारतीय जनता पक्षात तेच नंबर वनचे नेते आहेत दुसऱ्यां पक्षातून आणून सत्तेच्या मलईत डुबविलेल्यांचे ते नेते आहेत. विरोधी पक्ष तर सध्या राज्यात अस्तित्वहिन असल्याने त्यांना मित्रपक्षांसोबतच विरोधकां सारखे वागावे लागतअसावे नाही का? स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत मित्रपक्षांना स्वबळावर लढायला लावून भाजपा शिंदेसेना व अजित पवारांच्या पक्षाना ते स्वत:च्या अस्तित्वासाठी लढायला भाग पाडतील आणि राजकारणातील जुने हिशेब चुकते करत काटा काढतील हे लक्षात आल्यानेच मनधरणी करण्यासाठी एकनाथ शिंदे सातत्याने दिल्लीत जात आहेत, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

### शंतकमहोत्सवात स्वयंसेवक मुख्यमंत्री - पंतप्रधातांचे शत-प्रतिशत?

मात्र देशात जेथे ट्रिपल इंजिन सरकार आहेत तेथे सर्व काही आलबेल आहे असे नाही. भाजपा, शिंदेसेना व अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातही प्रचंड वाद आहेत, तिन्ही पक्षात कुरघोडीचे राजकारण सुरु राहणार आहे. स्थानिक निवडणूकांनंतर तर पुढील तीन वर्ष हे सरकार कसे चालणार हा सध्या कुतुहलाचा प्रश्न आहे. भाजपाचा मित्रपक्षांबद्दलचा आतापर्यतचा अनुभव पाहता ते पवार शिंदे दाद न देता २०२९च्या आधीच जाहीर केलेल्या रणनितीप्रमाणे संघाच्या शंभराव्या वर्षात स्वयंसेवक मुख्यमंत्री आणि पंतप्रधान असताना शत-प्रतिशतच्या दिशेने वाटचाल करतील हे उघडच आहे.

### शंकाचे मोहोळ की भविष्याची पेरणी?

स्थानिक निवडणूकां वगळता राज्यात सध्या पुण्यात दोन भाजपचे खासदार आणि सत्ताधारी पक्षाचे माजी आमदार धंगेकर यांचा दंगा सुरूअसल्याचे दिसत आहे. मुरलीअण्णा मोहोळ यांच्याबद्दल शंकाचे मोहोळ तयार करून त्यांच्या भविष्याच्या वाटचालीला कुणीतरी पायबंद तर घालायचा प्रयत्न करत नाहि ना?असे आता राजकीय वर्तुळात विचारले जावू लागलेआहे. राज्यात ओबीसी विरूध्द मराठा संघर्ष सुरू असताना सत्ताधारी पक्षात भविष्याच्या राजकारणाची पेरणी करण्यासाठी नवे पँटर्न वापरले जात आहेत. त्यात मुंबईत कबुतरखान्याच्या निमित्ताने जैन समाजाचे आंदोलन तर पुण्यात गोखले बिल्डरच्या प्रकरणाच्या निमित्ताने जैन समाजाचे राजकारण सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. याचा भविष्यातील सत्ताधारी राजकारणाच्या महत्वाच्या खुर्चीसाठीच्या राजकारणाचा संबधअसल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे पुण्यात उठलेले जैन समाजाचे कथित भ्रष्टाचाराचे मोहोळ, किंवा शनिवार वाड्यातील हिंदू – मुस्लिम राजकारणाचे प्रयोग हे भविष्याच्या राजकारणचे सूत्र असल्याचे सांगण्यात येत आहे.

आता मेल्यानंतरही न्याय नसल्याची खूणगाठ

त्यातच आता फलटणमधील महिला डॉक्टरचे आत्महत्या प्रकरण त्यात राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गृहखात्यावर विचारले जाणारे प्रश्न यावर अर्धवेळ गृहमंत्री म्हणून मुख्यमंत्र्याकडून कारवाईचे संकेत मात्र प्रकरण दडपण्याचाच प्रयत्न हे सारेच भयावह आहे. सामान्यपणे एक महिला डॉक्टर सुसाइड नोट हातावर लिहून जिवन संपवते त्यातही जेंव्हा राजकारण केले जाते त्यावेळी या राज्यात आता मेल्यानंतरहि न्याय मिळणार नसल्याची खूणगाठ जनसामान्य, महिला मतदारांना बांधायला हरकत नसावी. बीडचे प्रकरण अजूनही मार्गी लागले नसताना बीडच्याच संपदा मुंडे यांच्या आत्महत्येने या राज्यात पोलीस, प्रशासन, सरकार नक्की कुणाकडे न्याय मिळेल असा प्रश्न सतावत राहतो. दुसरीकडे उध्वस्त शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार असे जाहीर आश्वासन देणारे वित्तमंत्री अजित पवार यांनी आम्ही असे म्हटलेच नव्हते असे सांगणे म्हणजे न्याय या राज्यात संपला आहे किंवा राज्यकर्ते नाकर्ते झाले आहेत नक्की काय समजायचे?

**किशोर आपटे**

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत समविचारी पक्षासोबत युती

## -वंचित बहुजन आघाडीची पत्रकार परिषदेत माहिती

**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुक वंचित बहुजन आघाडी ताकदीने लढणार असून भाजपा व त्यांचे मित्र पक्ष वगळता इतर समविचारी पक्षांना युतीचा प्रस्ताव देण्यात येणार असल्याची माहिती आज शनिवार २५ ऑक्टोंबर रोजी झालेल्या एका पत्रकार परिषद मध्ये देण्यात आली आहे. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष एड.बाळासाहेब आंबेडकर यांच्या वतीने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीकरिता भाजपा व त्यांचे मित्र पक्ष वगळून इतर पक्षाची युती आघाडी करण्याचा अधिकार स्थानिक जिल्हा कमिटीला देण्यात आले आहे.




आम्ही जिल्ह्यात समविचारी पक्षांना या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून आवाहन करतो की रस्त्यावरची लढाई लढणाऱ्या कार्यकर्त्यांच्या या निवडणुका आहे. तेव्हा परिवर्तनाच्या लढाईचा आवाज जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर परिषदेच्या सभागृहात पाठवण्यासाठी सर्व समविचारी पक्षांनी एकत्रित यावे व तसा प्रस्ताव सुद्धा पक्षांना देणार आहोत.

त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्यास युती करून निवडणूक लढण्याची वंचित आघाडीची तयारी आहे. वंचित आघाडीकडे उमेदवारी करिता मोठ्या संख्येने इच्छुक उमेदवार असून पक्षाच्या वतीने जिप,पंस व नगरपरिषद निवडणूक लढण्यास इच्छुक उमेदवारांनी अर्ज पक्षाकडे सादर करावे असे आवाहन सुद्धा करण्यात आले आहे. त्याकरिता प्रशांत नगर येथील पक्ष कार्यालय व तालुका पातळीवर स्थानिक पदाधिकाऱ्यांशी संपर्क करण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष राहुल मेश्राम यांनी केले आहे. पत्रकार परिषदेमध्ये जिल्हाध्यक्ष विनय बांबोळे, नंदकुमार खंडारे, सागर भवते, रमेश आठवले, आनंद इंगळे, बाबूलाल धाकडे, अजय तायडे, प्रशांत गजभिये, शैलेश बागडे, राहुल भालेराव ,मयुरेश इंगळे, विकी डोंगरे आदी उपस्थित होते.

# सोयाबीन एकरी दोन क्विंटल, सांगा कास्तकारी कशी करावी

## -नुकसानीचा वाढीव मोबदला अजूनही नाहीच

**अमरावती/प्रतिनिधीः-** जून,जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात सतत व अतिवृष्टी सदृश पावसाने यंदा सोयाबीनचा हंगाम पार शेतकऱ्यांच कंबरड मोडून गेला, सोयाबीन शेंगा न भरल्याने एका एकरात एक किंवा दोन क्विंटल सोयाबीन झाले कुठे कुठे तर सोयाबीन सोंगले सुद्धा नाही. तसाच ट्रॅक्टर टाकून तुरीची कास्तकारी केल्या गेली आणि शासन नुकसानभरपाई मदतीच्या नावाखाली चेष्टा करून गेलं. यामुळे शेतकरी हा अस्मानी व सुलतानी (सरकारी ) यंत्रनेमूळे संकटात सापडला आहे.

दिवाळी आधी वाढीव मदत मिळणार होती पण दिवाळी झाली तरी ति मिळाली नाही.शासनाचा हमीभाव फक्त सरकारी जाहिरातीवर व सरकारशी निगडित कार्यकर्त्यांच्या स्टेटस वरच दिसतो तिथेही फसवेगिरी. सोयाबीन बाजारात ३२०० ते ३७०० याच दराने विकल्या जात आहे आणि पुढील कास्तकारीसाठी शेतकऱ्यांना ते याच दराने विकाव लागेल हमीभाव कोसोदूर आहे.



> 'सरकार स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका डोळ्यासमोर असल्यामुळे तोकडी मदत देऊन शेतकऱ्यांना झूलवत ठेवत आहे, जून ते ऑगस्ट मध्ये झालेल्या पावसाने जे शेतकऱ्यांचे नुकसान झाले ते भरून न निघण्यासारखे यात वाढीव मदतीचा घोळ करून शेतकऱ्यांची दिशाभूल केल्या जात आहे. जी अजूनही मिळाली नाही,व हमीभाव तर फक्त शासनाच्या जाहिराती पुरताच एकतर हमीभाव किंवा कर्जमाफी हाच एकमेव पर्याय आहे.'
>
> **-अमोल पाटील भारसाकळे,** युवा शेतकरी

'माहे जून ते सप्टेंबर मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे भातकुली तालुक्यातील शेतकऱ्यांचं कंबरड मोडलं,शेतात पूरसदृश परिस्थिती, शेतातील पीक खरडून जाणे, पीक सडणे, रोगराई इत्यादी मुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, सोयाबीन शेंगा भरल्या नाही. त्यामुळे सोयाबीनला झडती नाही, शेतकऱ्यांनी सोयाबीन कसे बसे सोंगले तर एकरी एक किंवा एकरी दोन क्विंटलची झडती, शेतकऱ्यांना शासन मदत जून ते ऑगस्टची मिळाली तीही तोकडी. त्यात एका एकराचं सोयाबीन बियाणे सुद्धा येत नाही, व वाढीव निकषानुसार मदत अजूनही मिळाली नाही. त्यामुळे यंत्रणा व सरकार काय करतय हे कळायला मार्ग नाही.

# दिव्यांग कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी - जिल्हाध्यक्ष राजेंद्र दिक्षित यांची मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यातील शासकीय, निमशासकीय, अनुदानित शिक्षण संस्थात अपंगासाठी आरक्षित जागेवर नियुक्त दिव्यांग कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना विशेष बाब म्हणून लागू करणे संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, प्रधान सचिव, अपंगआयुक्त, सचिव दिव्यांग कल्याणमंत्रालय यांना शासन मान्य महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेच्या वतीने निवेदने देण्यात आली आहेत.

राज्य शासनाने सध्या शासनाच्या सेवेत १ नोव्हेंबर २००५ पूर्वी जाहिरात व २००५ नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू केली आहे. हा निर्णय घेत असताना दिव्यांग कर्मचाऱ्यांवर अन्याय केला आहे. अपंग हक्क अधिनियम २०१६ नुसार दिव्यांग कर्मचाऱ्यांबाबत समानतेचे धोरण स्विकारलेले नाही. जुन्या पेन्शनमुळे दिव्यांगांना निवृतीनंतर उतार वयात सामाजिक सुरक्षा मिळू शकते. मात्र शारीरिक दृष्ट्या सक्षम उमेदवारांना त्यांचा हक्क देताना दिव्यांगांच्या समस्या सोडवलेल्या नाहीत.

राज्यात न्इए चे धोरण २००५ साली आले. या मुळे शासनाने त्यांनंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना अशंदान पेन्शन योजना लागू केली. वस्तुस्थिती पाहता २००५ पूर्वी अनेक शिक्षण संस्थात दिव्यांग उमेदवारांची सरळसेवेतून भरती झालेली नाही. न्यायालयाने दिव्यांग उमेदवारांची भरती केल्याशिवाय इतर पदांना मान्यता देता येणार नाही असा निकाल दिल्यामुळे राज्यातील अनुदानित शिक्षण संस्थामध्ये २००६ साली दिव्यांग उमेदवारांची सरळ सेवेतून अपंग आरक्षित जागेवर भरती करण्यात आली.



२००६ साली भरलेली सर्व पदे २००५ पूर्वीचा अनुशेष आहे. यात दिव्यांग उमेदवारांचा काय दोष आहे. जर जाहिरात २००५ पूर्वीचीआहे म्हणून नंतर नियुक्त शारीरिक दृष्ट्या सक्षम कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करत असेल तर २००६ साली दिव्यांगांच्या झालेल्या नियुक्त्या ह्या २००५ पूर्वीचा अनुशेष असलेने असे सर्व कर्मचारी जुन्या पेन्शनचे हकदार आहेत. १९९९ ते २००२ पर्यंत अनेक दिव्यांग कर्मचारी अनुदानित शिक्षण संस्थात रिक्त पदावर अल्पमानधनावर काम करत होते. मात्र दिव्यांगा बाबत च्या कायद्यातील समानतेच्या तत्वाला बगल देण्यात आलेचे लक्षात येते. १९९५ च्या कायद्यानुसार भरती मध्ये १, ३४, ६७ क्रमांकाच्या जागा ह्या अपंगासाठी राखीव ठेवून तेथे दिव्यांग उमेदवाराची नेमणूक करण्याच्या सूचना असताना प्रत्यक्ष भरतीत दिव्यांग उमेदवारांना डावलले आहे.

अनेक अधिवेशनात राज्यातील कर्मचाऱ्यांच्या मागण्याबाबत मागणी करणारे लोकप्रतिनिधी, आमदार, खासदार दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या हक्काबाबत आपली भूमिका मांडताना दिसत नाहीत. ही शोकांतिका म्हणावी लागेल. असे असताना दिव्यांग हक्क कायदा २०१६ ची प्रभावी अंमलबजावणी कागदावरच आहे असे वाटते. पेन्शनची खरी गरज दिव्यांगांनाच आहे. तो त्यांच्या उतार वयातील आधार आहे. याकडे शासनाची भूमिका संवेदनशील असायलाच हवी. निवृत्तीनंतरही दिव्यांग कर्मचाऱ्यांना आत्म सन्मानाने समाजात जगता यावे यासाठी सकारात्मक निर्णय घेवून २००६ साली अनुशेषा तर्गत नियुक्त सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन मिळावी या न्यायाच्या मागणी साठी संघटनेने शासनाकडे निवेदन पाठवले असून दिव्यांग कर्मचाऱ्यांना त्यांचा हक्क मिळाला नाही तर भविष्यात हा लढा तीव्र करणार असल्याचे महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना मुंबई ३२ जिल्हा अमरावतीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र दिक्षित यांनी प्रसिध्दीस दिले आहे.

## जाहीर सुचना

माझे पक्षकार यांनी मला दिलेल्या माहिती, सुचना व अधिकारान्वये मी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार नामे **श्री.अतुल रमेशराव पडोळे,** वय ५२ वर्षे, रा.राधाकृष्ण कॉलनी, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती यांच्या खालील वर्णनाची मिळकत विकत घेण्याचा सौदा माझे पक्षकारासोबत करार केलेला आहे. त्या मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन -** मौजा-जामठी, प्र.ता.पो.तु.मोर्शी, जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.६/२, क्षेत्र हे.आर. १-७४, पो.,ख. ०.०८ आर, आ.रु.१.५०, भो.वर्ग-१ असून यात असलेल्या झाडाझुडपासह, जलपाषाणासह, दगड मातीसह व शेताला लागून असलेल्या पुर्वापार रस्त्याचे हक्कासह तसेच इतर सर्व प्रकारचे हक्क सोई व सुविधांसह शेतजमीन विकत घेण्याचा सौदा केलेला आहे. या शेतजमिनीची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे--

पुर्वेस - नितीन काकडे यांचे शेत
पश्चिमेस - एकनाथ पाटील यांचे शेत
उत्तरेस - रस्ता
दक्षिणेस - एकनाथ पाटील यांचे शेत

तरी वरील मिळकतीवर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, कूळ, हितसंबंध, न्यायालयीन प्रकरण व ईतर कोणत्याही प्रकारची भानगड असल्यास किंवा कोणतीही हरकत असल्यास सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी सुचनेद्वारे किंवा प्रत्यक्ष भेटून दस्ताऐवजासह भेटावे. त्यानंतर सदर मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतल्या जाणार नाही. व माझे पक्षकार सदर मिळकतीची खरेदीखत नोंदवून घेण्यास मोकळे राहतील.

सबब जाहीर सूचना

**दिनांक /१०/२०२५**

(ॲड.स्वराज रा.श्रीराव)
रा.राजगड, शिवाजी नगर,
बियाणी लेआऊट, सिंभोरा रोड,
मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती
मो.९७३०७५२७०६

# महाएल्गार आंदोलनाकरता दिव्यांग मैदानात

## -शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीच्या महा एल्गार आंदोलनाला दिव्यांगांचा पाठिंबा; बच्चू कडू यांची भेट

**अमरावती/प्रतिनिधीः-** संपूर्ण महाराष्ट्रातील दिव्यांग संघटनेच्या प्रतिनिधींनी आज पूर्ण येथे महाएल्गार आंदोलनाचे रूपरेषा ठरवण्याकरता नियोजन बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीमध्ये संपूर्ण पदाधिकाऱ्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील दिव्यांग एकत्र येऊन एक मोठे आरपारचे आंदोलन छेडणार आहे.



शेतकरी कर्जमुक्तीसाठी २८ ऑक्टोबर रोजी नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या महाए ल्गार सभेला राज्यभरातून दिव्यांगांनी मोठा पाठिंबा, आपला सक्रिय सहभाग जाहीर केला आहे. या पार्श्वभूमीवर दिव्यांग प्रतिनिधींच्या शिष्टमंडळाने आज बच्चू कडू यांची भेट घेतली.शेतकरी आणि दिव्यांग यांच्या समस्यांकडे सरकारने गांभीर्याने लक्ष द्यावे, या मागणीसाठी ही सभा घेण्यात येत असल्याचे शिष्टमंडळाने स्पष्ट केले. दिव्यांग बांधव राज्याच्या कानाकोपऱ्यातून नागपूरकडे प्रस्थान करत असून, हजारोंच्या संख्येने ते या सभेत सहभागी होणार आहेत.

या सभेद्वारे शेतकरी कर्जमुक्ती, रोजगारनिर्मिती, तसेच दिव्यांगांच्या अधिकारांसंदर्भातील ठोस उपाययोजना करण्याची मागणी करण्यात येणार आहे. बच्चू कडू यांनी या उपक्रमाला नैतिक पाठिंबा दर्शवत, 'शेतकरी आणि दिव्यांगांचा आवाज शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी हे आंदोलन ऐतिहासिक ठरेल,' असे सांगीतले. राज्यातील विविध संघटना आणि सामाजिक कार्यकर्तेही या आंदोलनात सक्रिय सहभागी होत असून, नागपूर शहरात २८ ऑक्टोबर रोजी महाएल्गार सभेमुळे जनतेचे लक्ष या महत्त्वाच्या मुद्द्यांकडे वेधले जाणार आहे.

# पथ्रोट येथे ढालपूजनाची ४०० वर्षांची परंपरा गोंड-गोवारी समाजाचा उत्सव

**पथ्रोट :** बलिप्रतिपदेला गायगोंदण आणि ढालपूजा केली जाते. ऐतिहासिक परंपरेचा वारसा लाभलेली ही गायगोंदण पूजा विदर्भातील आदिवासी गोंड गोवारी जमातीतर्फे आजही श्रद्धेने, पारंपरिक पद्धतीने साजरी केली जाते. यंदाही हा उत्साह कायम दिसून आला.

गोंड-गोवारी समाजबांधवानी गोधन व त्या संबंधीची परंपरा जपण्याचा वसा घेतला आहे. तो आजतागायत ढालपूजा या नावाने कायम आहे. त्यास काठीपूजन असेही म्हणतात. वसुबारसेला गोवंशाचे पूजन करून दीपोत्सवास सुरुवात होत असताना बली प्रतिपदेला गाय गोंदण आणि ढालपूजा केली जाते. अंदाजे



४०० वर्षपिक्षाही जुनी असलेली ही परंपरा अजूनही सुरू आहे. गायी, गुरे राखणे हा गोंड गोवारी जमातीच्या लोकांचा पारंपरिक व्यवसाय. त्यामुळे हे लोक गाईंची तितक्याच भक्तिभावाने पूजा करतात. तिच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतात. दीपावलीच्या चौथ्या दिवशी बलिप्रतिपदेला गायगोंदण व ढालपूजेचा उत्सव साजरा केला जातो.

गोंड गोवारी समाज आपल्या कुवतीनुसार गोडधोड पुरणाचा नैवेद्य करून सामूहिकरीत्या आपल्या वस्तीतून ४० ते ५० फुट लांबीच्या बांबुस मोरपिसे व समाजबांधवानी बांधलेली खणा नारळाची ओटी बांधून ही ढाल निघते. अगोदर मरीमाता मंदिराचे दर्शन घेऊन वाजत गाजत नाचत डफळीच्या तालावर गोठाणावर पोहचते.

तेथे गोठाणबुवाचे पूजन, दर्शन करून गोपालकांच्या घरोघरी पूजनकरिता फिरवल्या जाते. जी मंडळी गोठाणबुवास नवस बोलतात, त्याची निष्पत्ती झाल्याने ढालीस खणा नारळाची ओटी वाहून ढालकर्त्याची पूजा करून दुपट्टा देतात. निवडक गोपालकांच्या घरी घरधनीन पूजन करून ऐपतीनुसार धान्य, रोख धनराशी देते. गोळा झालेली राशी व स्वतःच्या गुद्यातील रक्कम टाकून ढाल विसर्जनानंतर सामूहिक भोजन देतात. पूर्वी काही समाजबांधव कोंबडे, बकऱ्यांचा बळी देऊन सामूहिक भोजनाने ढालीचा समारोप करत. अचलपूर तालुक्यातील पथ्रोट, वडगाव फत्तेपूर, हरम, भिलोना तर अंजनगाव तालुक्यातील काही गावात ढालपूजन नियमितपणे सुरू आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ५०
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


## महाराष्ट्र शासन
## विशेष प्रकल्प विभाग, अमरावती
## ई-निविदा सूचना क्र.१६ सन २०२५-२०२६ (जा.क्र.४३६४/निलि/दि.१६.१०.२०२५)

### ई-निविदा सूचना (ई-निविदा प्रणालीद्वारे)

कार्यकारी अभियंता, वि.प्र.विभाग, अमरावती (दूरध्वनी क्र.०७२१-२६६८००३) द्वारे खालील कामांचे **ब-१** नमुन्यातील ऑनलाईन निविदा नोंदणीकृत **सुशिक्षित बेरोजगार अभियंता (फक्त अमरावती जिल्ह्यातील)** कडून महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या वतीने ई-निविदा प्रणालीद्वारे पात्र निविदाकारांकडून मागविण्यात येत आहे. तसेच निविदा स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नांव<br>सुशिक्षित बेरोजगार अभियंता करीता (फक्त अमरावती जिल्ह्यातील) | अंदाजित किंमत (रु.लक्ष) |
|---|---|---|
| १. | अमरावती-पोहरा-चांदूर रेल्वे-तळेगांव रस्ता रामा-२९७ सा.क्र.२९/०० ते ३२/००, ३८/९०० ते ४१/०० मध्ये नियतकालिक वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे व LC ७० ROB वरील खड्डयांची दुरुस्ती करणे ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती. | रु.२०.५२ |
| २. | अमरावती जिल्ह्यातील रिध्दपूर-तिवसा-अंजनसिंगी-धामणगांव रस्ता रामा ३०० सा.क्र.४०/६०० ते ४४/३०० मध्ये नियतकालिन देखभाल व दुरुस्ती करणे ता.तिवसा, जि.अमरावती | रु.२५.४२ |
| ३. | अमरावती जिल्ह्यातील अकोला म्हैसांग लाखपुरी अमरावती कुऱ्हा पुलगांव रस्ता रामा-२८० वरील सा.क्र.१२६/०० ते १२७/६००, १२९/०० ते १३९/००, १४७/३०० ते १५६/३०० मध्ये नियतकालिक नियतकालिक देखभाल व दुरुस्ती करणे, ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती | रु.३१.११ |
| ४. | अमरावती जिल्ह्यातील अंजनगांव काकडा रासेगांव येवता ते प्रामा-१४ रामा साहुर शिराळा डवरगांव मोझरी वऱ्हा कुऱ्हा रस्ता. रामा-३०८ वरील सा.क्र.७२/८०० ते ७५/३०० मध्ये नियतकालिक देखभाल व दुरुस्ती करणे, ता.तिवसा, जि.अमरावती. | रु.१६.९३ |
| ५. | अंजनगांव बारी लालखेड सावंगा विठोबा मांजरखेड रामा-२९६ सा.क्र.१५/४०० ते २५/०० मध्ये नियतकालिक वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती | रु.३७.०८ |
| ६. | माडी कार्ला चांदुर रेल्वे रस्ता रामा-३०३ सा.क्र.८४/०० ते ९१/५०० मध्ये नियतकालिक वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती | रु.३३.४१ |
| ७. | लोणी वाटपूर साखरा धनज जिल्हा सिमेपर्यंत रस्ता प्रजिमा-०१, कि.मी.०/०० ते १४/६०० मध्ये नियतकालिक देखभाल व दुरुस्ती करणे, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती | रु.२७.०९ |
| ८. | शिरजगांव कसबा थूगांव पिंप्री कुरळ जवळा तळवेल साऊर टाकरखेड आष्टी खारतळेगांव भातकुली, गणोजा फुलआमला दहिगांव ते रा.म.मा.क्र.६ प्रजिमा-२३, कि.मी.६२/०० ते ६८/०० मध्ये नियतकालिक देखभाल व दुरुस्ती करणे, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती | रु.१७.४९ |
| ९. | शेलगुंड चौकी धानोरा फसी धानोरा गुरव नांदसावंगी पळसमंडळ सालोड, प्रजिमा-५१, कि.मी.०/०० ते ०/७०० व ४/५०० ते २३/२०० मध्ये नियतकालिक देखभाल व दुरुस्ती करणे, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती | रु.३५.६१ |
| १०. | निंभा फाटा गौरखेडा परलाम उत्तमसरा टाकळी बु., लोणी, धानोरा फसी पापळ पळसमंडळ मंगरुळ चव्हाळा ते प्रामा-१२ रस्ता प्रजिमा-२५ सा.क्र..२५/०० ते ४०/०० मध्ये नियतकालिक देखभाल व दुरुस्ती करणे, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती | रु.२५.५७ |
| ११. | नांदगांव (खंडे.) मोखड सावनेर म्हसला दादापूर मालखेड ते तालुका सिमेपर्यंत रस्ता, प्रजिमा-७५, कि.मी.०/०० ते १६/५०० मध्ये नियतकालिक देखभाल व दुरुस्ती करणे.ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती | रु.१३.५८ |
| १२. | राष्ट्रीय महामार्ग ६ ते अडगांव धानोरा जोग कोठोडा पिंपळगांव ब. हिवरा मुरांदे पिंप्री गावंडा खेड पिंप्री पिंपळगांव निपाणी रस्ता प्रजिमा-७६, कि.मी.०/०० ते २/०० व १५/०० ते २९/०० मध्ये नियतकालिक देखभाल व दुरुस्ती करणे, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती | रु.२०.१२ |
| १३. | लोणी मोरगांव जनुना टिमटाळा निरसाना सावनेर रस्ता. प्रजिमा-७८, कि.मी.०/०० ते ३/०० व ५/०० ते १०/०० व १४/०० ते १८/०० मध्ये नियतकालिक देखभाल व दुरुस्ती करणे. ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती | रु.१९.९२ |
| १४. | प्रजिमा-४० ते मंगरुळ गोराळा भिलापुर ते नांदुरा-पिंगळाई धानोरा कोकाटे सार्सी ते रामा ३०० ला जोडणारा रस्ता प्रजिमा-१११ सा.क्र.१६/७०० ते २३/७०० मध्ये नियतकालिक देखभाल व दुरुस्ती करणे. ता.तिवसा, जि.अमरावती | रु.८.७० |
| १५. | जळका शेंदोळा सालोरा शिरजगांव मोझरी रस्ता प्रजिमा-७२ सा.क्र.११/०० ते २६/८०० मध्ये नियतकालिक देखभाल व दुरुस्ती करणे, ता.तिवसा, जि.अमरावती | रु.४३.६३ |
| १६. | कुऱ्हा ते विरुळ कावली वसाड रस्ता प्रजिमा-१७ सा.क्र.६/०० ते १४/०० मध्ये नियतकालिक वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती | रु.२४.०८ |
| १७. | घुईखेड येरड बेलोरा रस्ता प्रजिमा-३२ सा.क्र.४/०० ते ७/०० मध्ये नियतकालिक वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती | रु.११.६७ |
| १८. | अमरावती भानखेड कवठा पळसखेड सातेफळ रस्ता प्रजिमा-३३ सा.क्र.१३/५०० ते १३/८००, १५/८०० ते १८/८०० व ३४/५०० ते ३८/५०० मध्ये नियतकालिक वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती | रु.३१.१४ |
| १९. | अमरावती जिल्ह्यातील झाडा निंबोली धामणगांव तिवरा धनोडी सातेफळ घुईखेड पजिमा-३४ वरील सा.क्र.२५/६०० ते २८/००, ३०/०० ते ३६/०० व ३६/०० ते ३९/६०० मध्ये नियतकालिक देखभाल व दुरुस्ती करणे, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती | रु.३२.६० |
| २०. | अमरावती जिल्ह्यातील धामणगांव रेल्वे मंगरुळ दस्तगीर रोहणाकडे ते जिल्हा सिमेपर्यंत प्रजिमा-३७ वरील सा.क्र.५/०० ते ७/००, १२/०० ते १७/०० मध्ये नियतकालिक देखभाल व दुरुस्ती करणे, ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती | रु.१६.७६ |
| २१. | अमरावती जिल्ह्यातील मंगरुळ दस्तगीर निंबोली तळणी प्र.रा.मा.क्र.१२ ला मिळणारा रस्ता प्रजिमा-३६ वरील सा.क्र.३/०० ते ३/५००, ६/२०० ते ९/५००, १५/५०० ते १६/२०० मध्ये नियतकालिक देखभाल व दुरुस्ती करणे, ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती | रु.९.७५ |
| २२. | धानोरा गुरव नांदसावंगी हिवरा पापळ तिघारा ते जिल्हा सिमा प्रजिमा-२६ कि.मी.०/०० ते ४/०० मध्ये नियतकालिक देखभाल व दुरुस्ती करणे, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती | रु.११.०२ |
| २३. | चांदूर रेल्वे सोनगांव कळमगांव बग्गी राजुरा प्रजिमा-५० वरील साखळी क्र.०/०० ते ११/०० मध्ये नियतकालिक देखभाल व दुरुस्ती करणे, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती | रु.२५.८८ |
| २४. | अमरावती जिल्ह्यातील अंजनसिंगी ते कौडण्यपूर रस्ता प्रजिमा-३८ वरील सा.क्र.०/०० ते ७/०० मध्ये नियतकालिक देखभाल व दुरुस्ती करणे, ता.तिवसा, जि.अमरावती | रु.३३.७९ |

| | | |
|---|---|---|
| निविदा डाऊनलोड व भरण्याचा कालावधी | -- | ऑनलाईन वेळापत्रकाप्रमाणे |
| तांत्रिक निविदा उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ | -- | कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग, अमरावती यांचे कार्यालयात ऑनलाईन वेळापत्रकाप्रमाणे |

**Note :- Physical Submission** : 1) The Bidder shall submit the Hard Copy in "Sealed Envelope" of Technical & Financial Bids as specified in NIT after the online submission of Bid ("Bid Lock") within 48 hrs. as per online schedule during office hours. (2) Please note the further changes regarding this work will not be published through corrigendum by press notice. The changes will be available only on electronic tendering system of Government of Maharashtra which is available on the Portal https://mahatenders.gov.in & www.mahapwd.com. (3) All the relevant details, specification of work, Tender & Consitions etc. are available on portal https://mahatenders.gov.in & www.mahapwd.com (4) वरील काम सुशिक्षित बेरोजगार अभियंता (फक्त अमरावती जिल्ह्यातील) करीता https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येत आहे.

आरोसी / सी३४६४

(कृणाल पिंजरकर)
कार्यकारी अभियंता,
विशेष प्रकल्प विभाग, अमरावती

# अक्षय नागलकर हत्या प्रकरणात आणखी चार आरोपी अटकेत

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

***अकोल्यातील बहुचर्चित अक्षय नागलकर हत्येच्या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आणखी चार आरोपींना अटक केली असून आतापर्यंत आरोपींची संख्या आठवर पोहोचली आहे. यापूर्वी अटकेत असलेल्या चार आरोपींना न्यायालयाने सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.***

## आतापर्यंत एकूण ८ आरोपी अटकेत; ४ आरोपींना ७ दिवसांची पोलीस कोठडी



सविस्तर वृत्त असे की, दिनांक २३ ऑक्टोबर रोजी डाबकी रोड पोलीस ठाण्यात फिर्यादी सौ. शिला विनायक नागलकर यांनी तक्रार दाखल केली होती की, त्यांचा मुलगा अक्षय विनायक नागलकर (वय २६, रा. मारोती नगर, बाळापुर रोड, जुने शहर, अकोला) हा २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.१५ वाजता घराबाहेर जाऊन परत आला नाही. या तक्रारीवरून मिसिंग क्र. ४४/२०२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी या प्रकरणाचा तपास शहर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्याकडे सोपविला. तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख पो.नि. शंकर शेळके यांना इतर आरोपींच्या अटकेबाबत विशेष आदेश देण्यात आले.

स्थानीक गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय माहितीद्वारे पहिल्याच दिवशी चार आरोपींना ताब्यात घेतले होते.

चंद्रकांत महादेव बोरकर (रा. शिवसेना वसाहत, अकोला), आशिष उर्फ आशु शिवकुमार वानखडे (रा. जुने शहर, अकोला), किष्णा वासुदेव भाकरे (रा. मोठी उमरी, जि. अकोला), अशोक उर्फ ब्रम्हा पांडुरंग भाकरे (रा. मोरगाव भाकरे, जि. अकोला) असे ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे असून त्यांनी चौकशीत अक्षय नागलकरची हत्या करून जाळल्याचे कबुली जबाबात सांगितले. या सर्व आरोपींना रविवारी न्यायालयात हजर केल्यानंतर त्यांना ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. दरम्यान, स्थानीक गुन्हे शाखेच्या पथकाने तपासादरम्यान गुन्ह्यात सहभागी असलेले आणखी चार आरोपी ओळखून त्यांना अटक केली. रोहित गजानन पराते (रा. पार्वती नगर, बाळापुर नाका, अकोला), अमोल अजाबराव उन्हाळे (रा. हरीहरपेठ, जुने शहर, अकोला), नारायण गणेश मेसरे (रा. बाळापुर, जि. अकोला), आकाश बाबुराव शिंदे (रा. भौरद, जि. अकोला) अशी रविवारी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहे.

यापैकी दोन आरोपींना अहिल्यानगर येथून तर एका आरोपीला बाळापुर येथून, तर उर्वरित एका आरोपीला अकोला रेल्वे स्थानकावरून अटक करण्यात आली. तर सद्यस्थितीत एक आरोपी नामे शिवा रामा माळी हा फरार असून त्याच्या अटकेसाठी पोलीसांचे प्रयत्न सुरू आहेत.

**यांनी केली कारवाई :** ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील, स्था. गु. शा. प्रमुख पो.नि. शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि गोपाल ढोले, पो.उपनि. गोपाल जाधव तसेच पोलीस अमंलदार शेख हसन, रविंद्र खंडारे, अब्दुल माजीद, महेंद्र मलीये, वसीमोददीन, मोहम्मद एजाज, किशोर सोनोने, भारकर धोत्रे, खुशाल नेमाडे, गोकुळ चव्हाण, सुल्तान पठाण, उमेश पराये, आकाश मानकर, अभिषेक पाठक, मो. आमीर, राज चंदेल, श्रीकांत पातोंड, सतिष पवार, स्वप्नील खेडकर, अशोक सोनवणे, अन्सार अहमद, चालक प्रशांत कमलाकर, मनीष ठाकरे, विनोद ठाकरे यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

**तपासाला गती मिळणार :** या हत्याकांडात वापरलेले हत्यारे, मृतक अक्षयची जाळल्यानंतर त्याच्या पार्थिवाची झालेली राख, त्याची कोणकोणत्या ठिकाणी विल्हेवाट लावण्यात आली याची माहिती आता तपासात समोर येणार असून अनेक धक्कादायक बाबींचा उलगडा होणार असून अतिशय क्रूर घडलेल्या या हत्याकांडात अनेक खुलासे होणार आहे.

# ७ डिसेंबर रोजी पाटील समाजाचा 'योगायोग' वधू-वर परिचय मेळावा

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

पाटील समाज, अकोला यांच्या वतीने येत्या ७ डिसेंबर २०२५ रोजी उपवर मुला-मुलींसाठी 'योगायोग' वधू-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा भव्य मेळावा जानोरकर मंगल कार्यालय, रिंग रोड, कौलखेड, अकोला येथे पार पडणार असून सकाळी ११ वाजता मेळाव्याचा शुभारंभ होईल. तर सकाळी ९.३० ते ११ वाजेपर्यंत उपवर मुला-मुलींची नोंदणी करण्यात येईल.

- घटस्फोट प्रकरणांसाठी 'विश्वास कक्ष' स्थापन
- सकल मराठा समाज एकत्रीकरणाची मोहीम सुरू



या निर्णयासंदर्भात रविवारी हॉटेल हर्षवर्धन, अकोला येथे पाटील समाजाची सभा घेण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी समाजाचे अध्यक्ष अशोकराव अमानकर होते. प्रारंभी समाजाचे सचिव प्रदीप खाडे यांनी प्रास्ताविक करून मेळावा आयोजनाचा हेतू स्पष्ट केला.

सभेत समाजात वाढत चाललेल्या घटस्फोट प्रकरणांबाबत चिंता व्यक्त करण्यात आली. या पार्श्वभूमीवर पती-पत्नींमध्ये समेट घडवून आणण्यासाठी 'विश्वास कक्ष' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या कक्षामार्फत तणावग्रस्त दांपत्यांमध्ये समुपदेशनाद्वारे पुन्हा संसार फुलविण्याचे प्रयत्न केले जातील.

याशिवाय, सकल मराठा समाजातील मराठा, पाटील, कुणबी, देशमुख, घाटोळे पाटील आदी घटकांमध्ये एकत्रीकरण घडवून आणण्याची मोहीम राबविण्याचे ठरले. यासाठी अशोकराव अमानकर, प्रदीप खाडे आणि राम मुळे या त्रिसदस्यीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. तसेच जिल्ह्यात होणाऱ्या विविध वधू-वर परिचय मेळाव्यांची एकत्रित परिचय पुस्तिका प्रकाशित करण्याबाबतही चर्चा झाली.

या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी तालुकास्तरावर बैठका घेऊन मार्गदर्शन करण्याचे ठरविण्यात आले. मेळाव्यासाठी उपवर मुला-मुलींची नोंदणी न्यू अनंत मेडिकल स्टोअर्स, रतनलाल प्लॉट, अकोला आणि जानोरकर मंगल कार्यालय, अकोला येथे सुरू करण्यात आली आहे.

सभेत अध्यक्ष अशोकराव अमानकर, सचिव प्रदीप खाडे, कोषाध्यक्ष राजेंद्र मोहोकार, सहसचिव विजय बोरकर, रवी पाटील अरबट, पंकज साबळे, अविनाश पाटील, राम मुळे, संदीप पाटील महल्ले, शरद वानखडे, गजानन इंगळे, विठ्ठल गाढे पाटील, गजानन हरणे, डॉ. दिलीप मानकर, देवेंद्र ताले, योगेश थोरात, दिनकरराव सरप, साहेबराव काळंके, प्रा. वसंतराव गावंडे, निवृत्ती पारसकर, अतुल भुयार, श्याम कुलट, शैलेंद्र काळे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# अवकाळी पावसाने घातला धुमाकूळ; खरीप पिकांचे मोठे नुकसान



- शासनाच्या तुटपुंज्या मदतीवर शेतकऱ्यांचा संताप
- सोयाबीन दर घसरल्याने शेतकरी हतबल

**■ प्रतिनिधी | बाळापूर ■**

महाराष्ट्रात परतीच्या पावसाऐवजी अवकाळी पावसाने धुमाकूळ घातल्याने शेतकरी वर्ग पुन्हा एकदा संकटात सापडला आहे. सप्टेंबर महिना उलटल्यानंतरही राज्यातील अनेक भागात पावसाचे थैमान सुरूच असून, सततच्या पावसामुळे खरीप पिकांना मोठा फटका बसला आहे.

आधीच वाढत्या महागाईमुळे आणि शेतमालाला मिळणाऱ्या कमी भावामुळे शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली होती. त्यातच शनिवारी (दि. २५ ऑक्टोबर) झालेल्या अवकाळी पावसाने काढणीला आलेल्या खरीप पिकांचे मोठे नुकसान केले आहे.

बाळापूर तालुक्यात एकूण ६०,६७४ हेक्टर क्षेत्र पेरणीयोग्य असून, त्यापैकी ६०,६२९ हेक्टरवर खरीप पेरणी पूर्ण झाली आहे. यामध्ये ३९,२५१ हेक्टरवर सोयाबीन पिकाची लागवड झाली आहे. या हंगामात सततच्या पावसामुळे आधीच नुकसान झालेल्या पिकांवर अवकाळी पावसाने आणखी घाव घातला आहे.

शनिवारी पडलेल्या या पावसामुळे अनेक ठिकाणी काढणीला आलेले सोयाबीन भिजल्याने शेतकरी चिंतेत आहेत. काही ठिकाणी सोयाबीन आधीच काढण्यात आले असले, तरी मोठ्या प्रमाणात अजूनही पिक शेतातच असल्याने नुकसान वाढण्याची शक्यता आहे.

दरम्यान, बाजारात सोयाबीनचे दर हमी भावापेक्षा कमी असल्याने शेतकऱ्यांची आर्थिक ओढाताण आणखी वाढली आहे. यंदा अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची शासनाने दिवाळीपूर्वी तुटपुंजी मदत दिली असली, तरी शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसल्याचे आरोप सर्वत्र होत आहेत. तालुका कृषी अधिकारी सागर डोंगरे यांनी सांगितले की, 'यंदा झालेल्या अतिवृष्टीची मदत शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे. सध्या जवळपास ८० टक्के शेतकऱ्यांनी सोयाबीन काढले असून, उर्वरित शेतकऱ्यांनी हवामानाचा अंदाज पाहून पिक काढावे. तसेच काढणी केलेले सोयाबीन ताडपत्रीने झाकून ठेवावे.' तर निलेश हडोळे (कान्हेरी गवळी) यांनी सांगितले की, 'यावर्षी प्रमाणापेक्षा जास्त पाऊस पडल्याने खरीप हंगामात मोठे नुकसान झाले. त्यात शेतमालाला योग्य भाव मिळत नाही, त्यामुळे शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात गेली. शासनाने तुटपुंजी मदत करून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली आहे. शेतमालाला योग्य भाव किंवा भरीव मदत देणे ही सरकारची जबाबदारी आहे.' अवकाळी पावसामुळे सध्या बाळापूर तालुक्यातील शेतकऱ्यांची स्थिती बिकट झाली असून, शासनाने तातडीने सर्वेक्षण करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत जाहीर करावी.

# जिल्ह्यात जोरदार पाऊस; पुढील तीन दिवस 'यलो अलर्ट'

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

जिल्ह्यात शनिवारी सायंकाळी झालेल्या जोरदार पावसाने हवामानात गारवा निर्माण झाला. हवामान विभागाच्या माहितीनुसार, सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत १८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. दरम्यान, २६ आणि २८ व २९ ऑक्टोबरला जिल्ह्यात यलो अलर्टही जारी करण्यात आला आहे. अचानक झालेल्या या पावसामुळे दिवसभराचा उन्हाचा त्रास कमी झाला असला, तरी कापूस आणि सोयाबीन पिकांवर परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांना वाटू लागली आहे. अनेक ठिकाणी शेतात उभे सोयाबीन पीक ओलाव्यामुळे झुकले असून, काढणीपूर्वीच्या टप्प्यावर आलेल्या पिकांच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, पावसामुळे कमाल तापमानात घट झाली असून, शनिवारी कमाल तापमान २८.९ व किमान तापमान २३.८ अंश नोंदविण्यात आले.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३२७**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# चारचाकीतून गोमांस वाहतूक करण–या इसमावर एमआयडीसी पोलिसांची कारवाई

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

***एमआयडीसी पोलिसांनी गोवंश जातीचे मांस वाहतूक करणाऱ्या एका इसमावर कारवाई करून त्याच्याकडून तब्बल २.२७ लाख किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई शनिवारी दिनांक २५ ऑक्टोबर रोजी रात्री करण्यात आली.***



मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी पोलिस हेडकॉन्स्टेबल सतिश प्रधान (ब.क्र. १८५६) हे एमआयडीसी पोलिस ठाण्यात कार्यरत असून, रात्री ८ वाजता आपल्या पथकासह सरकारी वाहनाने परिसरात गस्त घालत असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, एक इसम चारचाकी वाहनात गोवंश जातीचे मांस घेऊन बाभुळगाव येथे जात आहे.

या माहितीनुसार पोलिसांनी तत्काळ वरिष्ठांना कळवून बाभुळगाव रोडवरील उडानपुलाखाली सापळा रचला. दरम्यान, संशयास्पदरीत्या येणारी एक पांढऱ्या रंगाची चारचाकी (मॅक्झीमो) गाडी क्रमांक MH 30 AF 6884 थांबवून तपासणी केली असता, गाडीच्या मागील बाजूस ठेवलेल्या प्लास्टिकच्या पोत्यात अंदाजे ५० किलो गोवंश जातीचे मांस आढळून आले.

चालकास विचारले असता त्याने आपले नाव अकबर खान रहेमान खान (वय ३८, रा. हाजी नगर, बोरगाव मंजू) असे सांगितले. त्याने हे मांस बोरगाव मंजू येथील आसिफ कुरेशी याच्याकडून आणल्याचेही सांगितले.

पोलिसांनी घटनास्थळी पंचांच्या उपस्थितीत मांसाचा नमुना सी.ए. तपासणीसाठी राखून ठेवला. तसेच वाहन, मोबाईल व मांस असा एकूण २,२७,००० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा क्र. ३०२/२०२५, कलम ५(क), ९(अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल सतिश प्रधान यांच्या मार्फत सुरू आहे.

## २.२७ लाखांचा मुद्देमाल जप्त

सदर कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बि. चंद्रकांत रेड्डी, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल जंजाळ, पो.उपनि. फुलउंबकर, पो.हे.कॉ. अनिल दांदळे, व पो.कॉ. भगवान आकमार यांच्या पथकाने केली. एमआयडीसी पोलिसांच्या या कारवाईने अवैध गोमांस वाहतूक करणाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

# एन.आर. देशपांडे शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचा ३० वर्षांनंतर मैत्रीमेळावा उत्साहात संपन्न

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

बालपणीच्या गोड आठवणींना उजाळा देण्यासाठी अकोल्यातील एन.आर. देशपांडे शाळेचे माजी विद्यार्थी तब्बल ३० वर्षांनंतर पुन्हा एकत्र आले. नर्सरीपासून ते दहावीपर्यंत एकत्र शिक्षण घेतलेल्या या मित्र-मैत्रिणींनी एक खास मैत्रीमेळावा आयोजित करून शाळेतील दिवस पुन्हा अनुभवले.या भेटीत जुन्या आठवणींना उजाळा देत सर्वांनी बालपणीच्या गप्पा, खोड्या आणि शाळेतील प्रसंगांची रंगतदार चर्चा केली. अनेकांनी आपापले अनुभव, त्या काळातील फोटो आणि आठवणी शेअर करत वातावरण भावनिक केले.

या कार्यक्रमाचे आयोजन माजी विद्यार्थ्यांनी स्वतःहून केले होते. कार्यक्रमात शाळेच्या जुन्या शिक्षकांचा विशेष उल्लेख करण्यात आला असून, उपस्थित शिक्षकांचा सत्कारही करण्यात आला. विशेष म्हणजे, कार्यक्रमानंतर सर्वजण शाळेत जाऊन आपल्या जुन्या वर्गात पुन्हा धमाल मस्ती करत बालपणीचे क्षण पुन्हा जगले. शिक्षक राजपूत सर आणि मॅडम यांनी वर्ग घेतल्याने त्या क्षणांना अधिकच संस्मरणीय स्वरूप प्राप्त झाले. अवघ्या काही तासांची ही भेट असली तरी ती सर्वांच्या मनावर अमिट ठसा उमटवून गेली. बालपणीची मैत्री आणि आठवणी पुन्हा एकदा ताज्या झाल्या.उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी भविष्यात अशा भेटी नियमितपणे आयोजित करण्याचा संकल्प व्यक्त केला असून, या मैत्रीमेळाव्याने सर्वांना पुन्हा एकदा बालपणात नेऊन ठेवले.



# कपाशी पिकावर लाल्याचा प्रादुर्भाव : शेतकरी हतबल

## सावरगाव परिसरातील चित्र : कृषी मार्गदर्शनाची गरज



'सोयाबीन पिकाचे लागत खर्चही वसूल होत नसल्याने यंदा मोठ्या प्रमाणात कपाशी पिकाची लागवड केली होती. परंतु पिकावर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने संपूर्ण मेहनत वाया गेली आहे. उपाययोजना करूनही फरक जाणवत नाही. नफा मिळण्याऐवजी आता आर्थिक फटका बसत आहे.'

\- **गजानन ताणकर,** कपाशी उत्पादक शेतकरी, सावरगाव.

**खेट्री :** परतीच्या पावसानंतर पातूर तालुक्यातील सावरगाव परिसरात कपाशी पिकावर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकरी चिंतेत सापडले आहेत. या रोगामुळे कपाशीच्या झाडांची पाने गळून झाडे कोरडी पडत आहेत. अनेक शेतांमध्ये बोंडअळीचेही आक्रमण दिसून येत असून, त्यामुळे पिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

शेतकऱ्यांकडून विविध कीटकनाशकांची फवारणी करूनही लाल्या रोगावर नियंत्रण मिळविण्यात अपयश येत आहे. काही ठिकाणी कपाशीची झाडे पूर्णपणे वाळल्याचे दृश्य दिसत असून, शेतकऱ्यांपुढे फक्त लागलेला कापूस वेचून वखरणी करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. परिणामी शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक फटक्याची भीती निर्माण झाली आहे.

आधीच अतिवृष्टीमुळे खरीप पिकांचे नुकसान सोसलेल्या शेतकऱ्यांवर आता लाल्या रोगाच्या प्रादुर्भावाचे आणखी एक संकट कोसळले आहे. त्यामुळे कृषी विभागाने तातडीने पुढाकार घेऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन द्यावे, तसेच कपाशी उत्पादक शेतकऱ्यांना विशेष आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे.

**बळीराजा अडकला नैसर्गिक संकटाच्या विळख्यात !**

खत, बियाणे, मजुरी आणि सिंचन यांचा वाढता खर्च लक्षात घेता शेतकऱ्यांचा आर्थिक ताळमेळ पूर्णपणे बिघडला आहे. लाल्या रोगामुळे पिकाचे नुकसान झाल्याने बळीराजा आज दुहेरी संकटात सापडला आहे. शासनाकडून मिळणारी मदत तुटपुंजी असल्याने शेतकरी नाराज असून, या नैसर्गिक संकटातून शेतकऱ्यांना कोण बाहेर काढणार, हा प्रश्न उभा ठाकला आहे.

# आरक्षण घुसखोरी संदर्भात आज सकल आदिवासी समाजाचा महानगरात मोर्चा



**■ प्रतिनिधी | अकोला ■**

आपल्या आरक्षण वर्गात अन्य समाजाने केलेल्या घुसखोरीच्या निषेधार्थ सकल आदिवासी एकता महासंघ व सर्व आदिवासी संघटनांच्या वतीने महानगरात बोगस घुसखोरी हटाव जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. आज सोमवार दिनांक २७ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता क्रिकेट क्लब मैदानातून हा मोर्चा प्रारंभ होणार असून धिंग्रा चौक, गांधी रोड मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर येऊन येथे सकल आदिवासी समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना समाजाच्या विविध आरक्षण संदर्भातील मागण्यांचे निवेदन देण्यात येणार आहे. या निवेदनात आदिवासी जमातीत इतर समाजाची घुसखोरी करण्यात येऊ नये, मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेत आदिवासी सल्लागार समितीची बैठक त्वरित घेण्यात यावी, आदिवासी जमाती कायद्यात त्वरित सुधारणा करण्यात यावी आदी मागण्या यात करण्यात आल्या आहेत.या मोर्चात आपल्या न्याय हक्कासाठी आदिवासी समाजातील सर्व महिला, पुरुष, युवक युवतीनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सकल आदिवासी एकता महासंघ व सर्व आदिवासी संघटनांनी केले आहे.अशी माहिती चंदू सीडाम यांनी दिली.

# दिवाळीत फटाक्यांची झगमग, विक्रीतून कोट्यवधींची उलाढाल

## उत्सवी खरेदीतून बाजारपेठेत उत्साह; अर्थचक्रालाही मिळाली चालना

**वर्धा/जनमाध्यम**

दिव्यांचा आणि उत्साहाचा सण म्हणजे दिवाळी. या सणात फटाक्यांचा धमाका नसेल तर सणाची रंगतच नसल्याची भावना प्रत्येकाच्या मनात असते. यंदाच्या दिवाळीतही फटाक्यांच्या विक्रीतून शहरात कोट्यवधी रुपयांची उलाढाल झाली असून स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळाली आहे.वसुबारसपासूनच सणाचा माहोल चढू लागला. धनोत्रयदशीच्या खरेदीसाठी बाजारपेठेत ग्राहकांची गर्दी झाली, तर लक्ष्मीपूजनाच्या आधल्या रात्री फटका बाजारात प्रचंड उलाढाल झाली. घराघरांतून फटाक्यांचा आवाज गुंजत राहिला आणि प्रकाशाच्या सोबतीने हवेतील आनंद आणखीनच खुलला.

**फटका दुकानांमध्ये रंगतदार विविधता**

शहरातील दुकानांत अनार, स्कायशॉट, सुतळीबॉम्ब, नागडब्बी, आकाशदिवा, चक्कर, चिटपुट असे अनेक प्रकारचे फटाके विक्रीसाठी उपलब्ध होते. दर १०० रुपयांपासून १० हजार रुपयांपर्यंत होते. दर वाढले असले तरी नागरिकांनी मनसोक्त खरेदी केली.

**रोजगाराला मिळाला हातभार**

दिवाळीच्या काही दिवसांत थाटल्या जाणाऱ्या दुकानांमुळे अनेक तरुणांना तात्पुरता रोजगार मिळाला. फटका व्यवसाय हा हंगामी असला तरी



या कालावधीत अनेक कुटुंबांना आर्थिक हातभार लागतो, अशी माहिती विक्रेत्यांनी दिली.

**उत्साह अबाधितच**

अकोला, शिवकाशी आणि पात्री येथून आणलेले फटाके यंदा अधिक लोकप्रिय ठरले. दरवाढ असूनही ग्राहकांची पावले मागे फिरली नाहीत. प्रत्येक घरातून हजारो रुपयांची खरेदी झाल्याने शहरात फटाका व्यवसायाचे चांगलेच दिवस आले आहेत.

**फटका दुकानांमध्ये रंगतदार विविधता**

शहरातील दुकानांत अनार, स्कायशॉट, सुतळीबॉम्ब, नागडब्बी, आकाशदिवा, चक्कर, चिटपुट असे अनेक प्रकारचे फटाके विक्रीसाठी उपलब्ध होते. दर १०० रुपयांपासून १० हजार रुपयांपर्यंत होते. दर वाढले असले तरी नागरिकांनी मनसोक्त खरेदी केली.

**रोजगाराला मिळाला हातभार**

दिवाळीच्या काही दिवसांत थाटल्या जाणाऱ्या दुकानांमुळे अनेक तरुणांना तात्पुरता रोजगार मिळाला. फटका व्यवसाय हा हंगामी असला तरी या कालावधीत अनेक कुटुंबांना आर्थिक हातभार लागतो, अशी माहिती विक्रेत्यांनी दिली.

**उत्साह अबाधितच**

अकोला, शिवकाशी आणि पात्री येथून आणलेले फटाके यंदा अधिक लोकप्रिय ठरले. दरवाढ असूनही ग्राहकांची पावले मागे फिरली नाहीत. प्रत्येक घरातून हजारो रुपयांची खरेदी झाल्याने शहरात फटाका व्यवसायाचे चांगलेच दिवस आले आहेत.

---

### हिंगणघाटचे उपासे दांपत्य ठरले समाजाचे प्रेरणास्थान

# मुलगी हीच घरची लक्ष्मी

**हिंगणघाट/जनमाध्यम**



'मुलगी हीच घरची लक्ष्मी असे म्हणतात, पण हिंगणघाटमधील एका दांपत्याने हे प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध करून दाखवले आहे. रवी आणि मोनिका उपासे (तांबेकर) या दाम्पत्यासाठी त्यांची कन्या नित्याश्री हीच खऱ्या अर्थाने घरची देवी आहे.पाच वर्षांपूर्वी झालेल्या नित्याश्रीच्या जन्मानंतर उपासे दांपत्याचे आयुष्यच उजळले. त्या दिवसापासून त्यांनी आपल्या घरी एक अनोखी परंपरा सुरू केली आहे. प्रत्येक सणासुदीला गौरीपंचमी असो, नवरात्री असो वा दिवाळीचे लक्ष्मीपूजन देवाची पूजा करण्यापूर्वी ते प्रथम आपल्या मुलीची पूजा करतात. मुलीच्या जन्मानंतर आमच्या आयुष्यात सुख, समाधान आणि समृद्धी वाढतच गेली आहे. तिच्या मुखदर्शनाने दिवस सुरू झाला की सर्व अडचणी दूर होतात, असे भावनिक शब्द उपासे दांपत्याने व्यक्त केले.त्यांच्या या उपक्रमाने परिसरात चर्चा रंगली असून समाजात मुलगी हीच घरची लक्ष्मी हा संदेश पुन्हा उजळून निघाला आहे.

---

# बंदी असूनही प्लास्टिकचा वापर सुरूच

## दिवाळीत बाजारपेठा 'कॅरीबॅग'ने फुलल्या; प्रशासनाकडून कारवाईचा अभाव

**वर्धा/जनमाध्यम**

राज्य शासन आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने १०० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या सिंगल यूज प्लास्टिकवर बंदी घातली असतानाही, वर्धा शहरात या प्लास्टिकचा वापर पुन्हा वाढल्याचे दिसून येत आहे. दिवाळीच्या खरेदीमुळे बाजारपेठ गजबजलेल्या असतानाच, व्यापारी व किरकोळ विक्रेते बिनधास्तपणे प्रतिबंधित कॅरीबॅगचा वापर करत असल्याचे चित्र दिसते.नगरपालिकेने काही महिन्यांपूर्वी या संदर्भात मोहिम राबवून कारवाई केली होती. काही ठिकाणी प्लास्टिक जप्ती व दंडात्मक कारवाई करण्यात



आली होती; मात्र ही मोहीम केव्हाच थंडावल्याने आता बंदीचा फज्जा उडालेला आहे. दुकानदारांकडून ग्राहकांना सहजपणे प्लास्टिक पिशव्यांमधून वस्तू देण्यात येत असून प्रशासन मात्र निष्क्रीय असल्याची टीका नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

**शहरात प्रदूषणाचा धोका वाढतोय**

सिंगल यूज प्लास्टिकचे विघटन वर्षानुवर्षे होत नसल्याने कचऱ्याचा मोठा साठा तयार होत आहे. काही ठिकाणी हे प्लास्टिक जाळले जात असल्याने विषारी धूर हवेत पसरतो आणि वायुप्रदूषणात भर पडते. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून श्वसनासंबंधी आजार वाढत आहेत.

**या वस्तूंवर बंदी कायम**

प्लास्टिक पिशव्या, प्लेट, कप, ग्लास, इयरबड स्टिक, फुगे स्टिक, थर्माकोल, सिगारेट पॅकिंग, प्लास्टिक आमंत्रणपत्र, तसेच १०० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीचे पीव्हीसी बॅनर यावर वापर आणि विक्रीस बंदी आहे.

**नागरिक आणि पर्यावरणवाद्यांची मागणी**

नगरपालिकेने पुन्हा भरारी पथक सक्रिय करून दुकानदारांवर कारवाई करावी, आणि प्लास्टिकमुक्त शहर मोहिमेला गती द्यावी, अशी मागणी पर्यावरणप्रेमी नागरिकांकडून होत आहे.,

---

### तीस वर्षांनंतर भावनिक मिलाफ

# मॉडेल हायस्कूल नांदपूर येथे माजी शिक्षक-विद्यार्थी स्नेह मेळावा

**आर्वी/जनमाध्यम**

वयाच्या चौऱ्यांशी (८४) पार झालेले आणि प्रकृती बरोबर नसतानाही, तीस वर्षानंतर आपल्या विद्यार्थ्यांना भेटण्याची उत्कंठा मनात घेऊन माजी शिक्षकांनी माजी विद्यार्थ्यांनी आयोजित माजी शिक्षक-विद्यार्थी स्नेहमेळाव्यात हजेरी लावली. शाळेच्या आवारात कृतार्थतेचा हा क्षण सर्वांच्या हृदयात कायमचा कोरला गेला.

शाळेचे माजी मुख्याध्यापक गुणवंत कराळे, ८४ व्या वर्षीही शाळेत पोहोचल्यानंतर विद्यार्थ्यांना भेटण्यासाठी आले, तर माजी मुख्याध्यापिका निर्मला हीवसे यांनी देखील आपल्या उपस्थितीने या कार्यक्रमाला भावनिक रुप दिले. या वेळी लोनकर, सुरेंद्र वैद्य, रमेश बोके, ताथडे, सपना जाचक इत्यादी



माजी शिक्षकांनीही मेळाव्यात सहभाग घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.महत्वपूर्ण क्षण म्हणजे माजी विद्यार्थ्यांनी आपल्या गणवेशातील पांढरा टोपी परिधान करून तीस वर्षांनंतर शाळेच्या आवारात प्रवेश केला. या स्नेहमेळाव्यात विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिक्षणसंस्थेप्रती असलेल्या सदैव असलेल्या नात्याची प्रतिष्ठा स्पष्ट केली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक सतिश लोखंडे यांनी भूषवले होते. भारत शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा ॲडव्होकेट शोभा काळे आणि माजी मुख्याध्यापक राजेंद्र चौधरी हे मुख्य अतिथी होते. कार्यक्रमाचे आयोजन माजी विद्यार्थी मनोज पखाले, विशाल देशमुख, प्रकाश तिरळे, सुधीर सोनटक्के, दिनचंद गहेकर, शालिनी पखाले, वंदना कोल्हे, प्रवीण टुले, वंदना मनवर व गणेश सहारे यांनी केले.या वेळी माजी शिक्षकांचा सत्कार करून त्यांच्या प्रामाणिक कार्याची पावती दिली गेली. विविध क्षेत्रांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना पाहून शिक्षकांनी समाधान व्यक्त केले.

---

# नेत्रहीन तरणदीपसिंग बावरी आमरण उपोषणावर

## व्यवसायासाठी भूखंड वाटपाची मागणी

**आर्वी/जनमाध्यम**



राज्य शासनाने दिव्यांग व नेत्रहीन नागरिकांसाठी विविध कल्याणकारी योजना अमलात आणल्या असल्या, तरी प्रत्यक्ष लाभ घेण्यास अजूनही अनेकांना प्रशासनिक अडथळ्यांना सामोरे जावे लागत आहे. अशाच अडचणीमुळे दोन्ही डोळ्यांनी अंध असलेले तरणदीपसिंग प्रकाश बावरी यांनी व्यवसायासाठी भूखंड वाटपाच्या मागणीसाठी आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे.

बावरी यांनी आपल्या मागणीसाठी अनेक वेळा शासनाकडे विनंतीपत्रे दिली, पाठपुरावा केला; मात्र समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्याने त्यांना उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागला. ऑल इंडिया शास्त्री सोशल फोरमचे राष्ट्रीय उपाध्यक्ष इमरान राही यांनी उपोषणस्थळी भेट देऊन शासनाला या प्रकरणाची तातडीने दखल घेण्याचे आवाहन केले.राही म्हणाले, दिव्यांग आणि नेत्रहीन नागरिक समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर ठेवले जाणे अन्यायकारक आहे. शासनाने त्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडवून त्यांना न्याय दिला पाहिजे. या प्रसंगी डॉ. हेलनकेअर अंध व अपंग बहुउद्देशीय संस्थेचे सल्लागार श्यामसुंदर राठी, जेष्ठ समाजसेवी प्रेमराज पालीवाल, अब्दुल गनी, इंजि. विजय नाखले, प्रकाश बावरी, सय्यद फारुख, कादिर खान, रामेश्वर बलपांडे, गजानन केतकर, प्रीतकौर बावरी आदी मान्यवर उपस्थित होते.

---

### सोयाबीनचा अर्धा पोत उतारा

# शेतकरी निराशसततच्या पावसाने पिकांचे नुकसान, खर्चही निघेना

साहूर/जनमाध्यम

सलग दोन ते अडीच महिने सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे यंदाच्या खरीप हंगामातील सोयाबीन पिकाला मोठा फटका बसला आहे. अनेक शेतकऱ्यांच्या शेतात तीन ते चार एकरावर फक्त अर्ध ते एक पोत इतकाच सोयाबीनचा उतारा लागला आहे.

उत्पादनात झालेली ही मोठी घट पाहता मजुरी आणि मळणीचा खर्चही निघत नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत.सुरुवातीच्या पावसानंतर थोडी उघडीप मिळाल्यावर ऑगस्ट महिन्यात पुन्हा सलग पाऊस पडत राहिल्याने शेतात प्रचंड ओलावा निर्माण झाला. त्यामुळे सोयाबीन पिकावर व्हायरस आणि बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव झाला. परिणामी झाडांची वाढ खुंटली, शेंगा भरल्या नाहीत आणि अनेक ठिकाणी पिके सडून गेली.आता बाजारात सोयाबीनला केवळ सातशे रुपये क्विंटल दर मिळत असल्याने शेतकऱ्यांचा तोटा वाढला आहे. सततची नापिकी, मजुरीवरील वाढता खर्च आणि उत्पादनातील घट यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. त्यामुळे सरकारने सोयाबीन, तूर व चना पिकांना किमान दहा हजार रुपये क्विंटल असा हमीभाव द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून जोर धरत आहे.



**किल्ला जिंजीची प्रतिकृति...** खुशी झाड, पुनीत झाडे, प्रेषित पोकळे, चैतन्य पोकळे अणि ध्रुव राठी या पाच जणांनी मिळून मराठा साम्राज्य ची तीसरी राजधानी तमिलनाडु येथील किल्ला जिंजीची प्रतिकृति पहिल्यांदा कृष्णानगर ,वर्धा येथे साकारली आहे.

**फोटो राहुल तेलरांधे वर्धा**

---

## संक्षिप्त

### रमणा फाट्यावरील ढाब्यावर दोन गटांत हाणामारा

**वर्धा -** जेवणासाठी आलेले तरुण व ढाबा चालकांमध्ये झालेल्या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. चाकू, विटा व लाकडी दांड्याने एकमेकांवर हल्ला करण्यात आला. ही घटना वर्धा-नागपूर महामार्गावरील रमणा फाटा परिसरातील भारतीय ढाबा येथे घडली असून परिसरात खळबळ निर्माण झाली आहे. दोन्ही गटांकडून दिलेल्या तक्रारीवरून सेलू पोलिसांनी नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

सेलू शहरातील वॉर्ड क्र. १ मधील गफार शेख कासम शेख (६२) यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, वर्धा येथील राकेश पेंदोर, स्वप्नील ढोले व मंगेश बुरसे हे तिघे कार क्र. एमएच ३२ एझेड ०३६३ ने ढाब्यावर जेवणासाठी आले होते. त्यांनी वेटरकडे जेवणाची ऑर्डर दिली. त्यानंतर त्यांनी टेबलवर दारूची बाटली ठेवली. वेटरने ही बाब गफार शेख यांना सांगितल्यावर त्यांनी दारू पिण्यास मनाई असल्याचे सांगितले. त्यावरून तिघा तरुणांनी वाद घातला आणि गफार शेख यांना शिवीगाळ करीत चाकू, विटांनी हल्ला केला. यात ते जखमी झाले. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी राकेश, स्वप्नील आणि मंगेश या तिघांविरुद्ध गुन्हा नोंदविला. दरम्यान, वर्धेच्या बोरगाव (मेघे) येथील मंगेश बुरसे यांनी दिलेल्या प्रत्युत्तर तक्रारीत म्हटले आहे की, त्यांनी वेटरकडे जेवणाची ऑर्डर दिली होती, परंतु एक तास उलटूनही जेवण मिळाले नाही. विचारणा केली असता, गफार शेख, शाहरुख शेख, मन्नन शेख व इतरांनी मिळून त्यांना मारहाण केली. या तक्रारीवरून पोलिसांनी सहा जणांविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

### श्रीरामसिटी येथे घरफोडी

**हिंगणघाट-** येथे कुलूपबंद घरातून अज्ञात चोरट्यांनी १ लाख २३ हजारांचा ऐवज चोरून नेला. ही घटना स्थानिक श्रीराम सिटी येथे घडली असून, तक्रारीनंतर उघडकीस आली. रवींद्र लाकडे (३८) रा. श्रीराम सिटी, हिंगणघाट हे कुटुंबासह येरणगाव येथे गेले होते. त्यांचे घर कुलूपबंद होते. याच कुलूपबंद घराला संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी लक्ष्य केले. चोरट्याने घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करून कपाटातील रोख, सोन्याची चेन असा १ लाख २३ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली आहे.

### दारू पिण्यास पैसे न दिल्याने मारहाण

**वर्धा -** दारू पिण्यास २० रुपये दिले न दिल्याने आरोपीने हातबुक्क्या व विटांनी मारून जखमी केले. ही घटना रामनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शांतीनगर येथे घडली. प्रफुल्ल विनोद शेळके (३६) रा. उमरी (मेघे) हा घंटागाडीवर काम करतो. त्रिमूर्तीनगर येथे गेला असता विलास केशव बुधबावरे रा. उमरी हा भेटला. त्याने दारू पिण्याकरिता २० रुपये मागितले असता पैसे देण्यास नकार दिला. त्यावयन आरोपीने हातबुक्क्याने व विटाने डोक्याच्या मागे मारून जखमी केले.

### शेतात ठेवलेला शेतमाल लाबविला

**पुलगाव -** शेतातील गोठ्यात पेरणीसाठी ठेवलेला चणा अज्ञात चोरट्याने चोरून नेला. ही घटना मलकापूर शेतशिवारात घडली. प्रशांत साहू (४२) रा. पुलगाव यांचे मलकापूर शिवारात शेत आहे. त्यांनी नुकतेच सोयाबीनचे पीक काढून रबी हंगामासाठी जमीन तयार केली होती. शेतातील गोठ्यात पेरणीसाठी साडेतीन विंटल चणा ठेवला होता. दरम्यान, अज्ञात चोरट्याने १९ हजार चोरून रुपये किमतीचा चणा तक्रारीवरून पुलगाव नेला. पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

### दारूच्या अतिव्यसनाने इसमाचा मृत्यू

**हिंगणघाट -** तालुक्यातील बिरकड वाढ येथील निलेश शालिग्राम चौधरी (वय ३९) या इसमाचा दारूच्या अतिव्यसनामुळे मृत्यू झाला.मिळालेल्या माहितीनुसार, निलेश चौधरी याला दारूचे प्रचंड व्यसन होते. सततच्या मद्यसेवनामुळे त्याची यकृत (लिव्हर) खराब झाली होती. डॉक्टरांनी त्याला दारू पिण्यास सक्त मनाई केली होती. मात्र, गेल्या पंधरा दिवसांपासून त्याने पुन्हा मद्यपान सुरू केले होते.दारू पिऊन घरी परतल्यावर त्याला अचानक उलटी झाली व तो झोपला. आज पहाटे प्रकृती बिघडल्याने त्याला हिंगणघाट उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले, परंतु तेथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी मृताच्या पत्नी योगिता निलेश चौधरी (वय ३५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी मर्ग नोंद केली असून पुढील तपास पोलीस हवालदार विलास गोठे करीत आहेत.

### तलवारीच्या हल्ल्यात बाप-लेकी जखमी

**आर्वी -** राणी लक्ष्मीबाई वॉर्ड परिसरात घरखरेदीच्या वादावरून शेजाऱ्याने तलवारीने हल्ला करून बाप–लेकीला जखमी केल्याची गंभीर घटना शनिवारी (दि. २५ ऑक्टोबर) सकाळी घडली. या प्रकरणी पोलिसांनी अश्विन सुपौर पदरे (वय २९) याला अटक केली आहे.फिर्यादी राजेश बाळकृष्ण सोनोने (वय ५८) यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीसोबत घर विक्रीचा व्यवहार झाला होता. उर्वरित रकमेच्या कारणावरून त्यांच्यात वाद सुरू होता. शनिवारी सकाळी सुमारास आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करीत धक्का देऊन लोखंडी तलवारीने हल्ला केला. यात राजेश सोनोने आणि त्यांची मुलगी अर्पिता (वय २४) जखमी झाले.आरोपीचा हातही झटापटीत किरकोळ जखमी झाला असून, नागरिकांनी वेळीच हस्तक्षेप करून स्थिती नियंत्रणात आणली. फिर्यादीची तक्रार मिळताच पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीस ताब्यात घेतले. तपास पोउपनि. दिपेश ठाकरे करीत आहेत.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक ३२७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल–atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विक्री व्यवहारावर संशयाचे सावट

## ई-निविदा प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव

**अमरावती/का.प्र.**

नांदगाव खंडेश्वर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जमीन विक्री व्यवहारावर गंभीर संशय व्यक्त केला जात असून, संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असल्याच्या चर्चा सुरू आहेत. बाजार समितीच्या लोणी येथील शेतीच्या विक्रीसाठी काढण्यात आलेल्या निविदेमध्ये अनेक गैरप्रकार झाल्याचा आरोप होत आहे.

विशेष म्हणजे, या जमिनीची विक्री प्रक्रिया सुरू असतानाच समितीचे सचिव अचानक रजेवर गेल्याने व्यवहाराबाबत प्रश्नचिन्हांची मालिका निर्माण झाली आहे. सुमारे एक कोटी पन्नास लाख रुपयांच्या किमतीची मानली जाणारी जमीन केवळ साठ लाख रुपयांच्या निविदा दराने विक्रीसाठी काढण्यात आल्याने स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. इतक्या मोठ्या फरकात जमीन विक्रीसाठी काढण्यामागचा हेतू काय, याचे




समाधानकारक स्पष्टीकरण बाजार समितीकडून मिळालेले नाही. दरम्यान, निविदा दाखल झालेल्या त्याच दिवशी सचिवांनी अचानक रजेवर जात चार दिवस गैरहजेरी लावल्याने ई-निविदा प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाली होती. त्यातच निविदेशी संबंधित जिओ-टॅगिंग कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने प्रक्रियेत अधिक गोंधळ निर्माण झाला आहे. सचिवांच्या या वागणुकीमुळे त्यांच्या भूमिकेवर संशय उपस्थित होत असून, निविदेच्या निर्णायक टप्प्यावरच सुट्टी घेण्यामागे काही आर्थिक हेतू लपले आहेत का, असा प्रश्न विचारला जात आहे. याचदरम्यान मिळालेल्या माहितीनुसार, ही जमीन तत्कालीन सभापती विठ्ठलराव हिरोडे यांनी खरेदी केल्याचे समोर आले असून, या व्यवहाराला राजकीय रंग मिळाल्याची चर्चा सुरू आहे. शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अमोल विठ्ठलराव हिरोडे पाटील यांनी या संदर्भात आपला तीव्र निषेध नोंदवत संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे. सार्वजनिक हिताच्या दृष्टिकोनातून या विक्री व्यवहाराची पारदर्शक चौकशी व्हावी आणि जबाबदारांवर कारवाई व्हावी, अशी नागरिकांकडूनही जोरदार मागणी होत आहे. सचिवांच्या गैरहजेरीमुळे समितीचे कामकाज गोंधळलेल्या अवस्थेत असल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले असून, प्रशासन मौन बाळगत असल्याने संशयाचे सावट अधिकच गडद झाले आहे. या पार्श्वभूमीवर संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करून नव्याने खुली आणि पारदर्शक प्रक्रिया राबवावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

### - कारवाई करा अन्यथा आंदोलन

'कृषी उत्पन्न बाजार समितीसारख्या संस्थेकडून अशा प्रकारे संशयास्पद पद्धतीने जमीन विक्री केली जाणे अत्यंत धक्कादायक आहे. सार्वजनिक मालमत्तेच्या व्यवहारात पारदर्शकतेचा अभाव हा भ्रष्टाचाराला आमंत्रण देणारा प्रकार आहे. या प्रकरणात जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अन्यथा आम्ही रस्त्यावर उतरून आंदोलन करू,'असे शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अमोल पाटील हिरोळे यांनी सांगितले.

# बडनेरा मध्ये २७ वर्षीय उच्चशिक्षित युवतीची संशयास्पद आत्महत्या

**बडनेरा/वार्ताहर**



अमरावतीतील बडनेरा परिसरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. २७ वर्षीय उच्चशिक्षित युवतीचा मृतदेह तिच्या राहत्या घरी संशयास्पद परिस्थितीत आढळलो. मृत युवतीचे नाव रणदीप कौर रियाड असे असून ती एम.एस्सी. पदवीधर होती आणि एका खाजगी कोचिंग क्लासमध्ये अध्यापन करत होती.आज सकाळी घरातील सदस्यांनी ती प्रतिसाद देत नसल्याचे लक्षात येताच तात्काळ पोलिसांना माहिती देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच बडनेरा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला आणि अमरावती जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. या संपूर्ण प्रकरणाचा पुढील तपास बडनेरा पोलीस घेत आहेत.

# मुख्यमंत्रीच्या गृहनगरात 'महाएल्गार मोर्चा'

## बच्चू कडू २८ ऑक्टोबरला नागपुरात सरकारला घेरणार

**अमरावती/का.प्र.**

प्रहार जनशक्ति पक्षाचे अध्यक्ष तथा आमदार बच्चू कडू यांनी राज्यातील शेतकरी, दिव्यांग, मच्छीमार व मेंढपाळ यांच्या विविध मागण्यांसाठी पुन्हा एकदा आंदोलनाची हाक दिली आहे. २८ ऑक्टोबर रोजी नागपुरातील वर्धा रोडवरील जामठा येथील कपाशी संशोधन केंद्राजवळील मैदानावर 'महाएल्गार मोर्चा' काढण्यात येणार आहे. या आंदोलनाद्वारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गृहनगरात सरकारला 'घेराव' घालण्याचा निर्धार कडू यांनी व्यक्त केला आहे.



या आंदोलनात अनेक शेतकरी संघटनांचे नेते सहभागी होणार असून यात विजय जंधिया, राजू शेट्टी (स्वाभिमानी शेतकरी संघटना), संभाजीराजे छत्रपती (स्वराज्य पक्ष), महादेव जानकर (राष्ट्रीय समाज पक्ष), डॉ. अजित नवले (अखिल भारतीय किसान सभा), वामनराव चटप (स्वतंत्र भारत पक्ष), प्रकाश पोहरे, रविकांत तुपकर (क्रांतिकारी शेतकरी संघटना) आणि विठ्ठलराजे पवार (शरद जोशी विचारमंच) यांचा समावेश आहे. बच्चू कडू यांनी सांगितले की, 'पंजाबप्रमाणे महाराष्ट्रातही शेतकऱ्यांनी एकजूट दाखवून आंदोलन करणे आवश्यक आहे. सरकारकडून शेतमालाचे योग्य दर मिळत नाहीत, सोयाबीन व कपाशी उत्पादकांचे प्रचंड नुकसान होत आहे. ३ हजार रुपयांत सोयाबीन आणि ६ हजार रुपयांत कपाशी विकणे ही शेतकऱ्यांची शोकांतिका आहे. पंजाबमध्ये ९५ टक्के कृषी उत्पादनांना हमीभाव मिळतो, पण महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर पोहोचले आहेत,' अशी टीका त्यांनी केली. गेल्या महिन्याभरात बच्चू कडू यांनी राज्यभरात अनेक सभा घेतल्या असून, त्या सभांमध्ये सरकारविरोधी नाराजी स्पष्टपणे दिसून आली आहे. काही सभांमध्ये केलेल्या विधानांवरून त्यांच्यावर टीकाही झाली. मात्र त्यावर प्रतिक्रिया देताना कडू म्हणाले, 'शेतकरी रोज मरतो, त्यावर कुणाला राग येत नाही. पण जर एखाद्या शेतकऱ्याने विधायकांविषयी काही बोलले तर गोंधळ माजतो. मग हा न्याय का?' जून महिन्यात बच्चू कडू यांनी गुरुकुंज मोझरी येथे शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी उपोषण केले होते. त्यानंतर सरकारने काही प्रमाणात उपाययोजना करण्याचे आश्वासन दिल्याने त्यांनी उपोषण मागे घेतले होते. मात्र आता पुन्हा एकदा ते मुख्यमंत्री यांच्या गृहनगरात सरकारला दुविधेत आणण्यासाठी सज्ज झाले आहेत. या 'महाएल्गार मोर्चा'त राज्यातील सर्व शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन बच्चू कडू यांनी केले आहे.

# वंचित बहुजन आघाडीची मोर्शी तालुका आढावा बैठक

## समविचारी पक्षासोबत निवडणूक लढविण्याबाबत मंथन

**मोर्शी/वार्ताहर**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे वतीने मोर्शी तालुक्याची आढावा बैठक शासकिय विश्रामगृह मोर्शी येथे पार पडली असून आगामी निवडणूका समविचारी पक्षासोबत लढविन्याबाबत बैठकीत मंथन करन्यात आले.

मोर्शी तालुक्यातील आढावा बैठकीला अमरावती जिल्हा भारतीय बौद्ध महासभाचे उपाध्यक्ष प्रकाश इंगळे, वंचित बहुजन युवा आघाडी जिल्हा महासचिव सागर भवते, मोर्शी तालुका समन्वयक प्रमोद मुंद्रे, संघटक तथा उपसरपंच विलासभाऊ वानखडे, आंबेडकरी चळवळीचे जेष्ठ कार्यकर्ते भागवतराव इंगळे, वंचित चे मोर्शी तालुका अध्यक्ष अमोल सरवटकर, मयुरेश इंगळे प्रामुख्याने उपस्थित होते.आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका ताकदीने लढण्याचा निर्धार यावेळी कार्यकर्त्यांनी केला असून सर्कल निहाय मोर्चे बांधणीला तालुक्यातील कार्यकर्त्यांनी सुरुवात केली आहे. मान्यवरांनी नवतरुण युवा कार्यकर्त्यांच्या कामाचे कौतुक केले असून लवकरच मोर्शी तालुका मेळाव्याचे नियोजन करण्याचे बैठकी मध्ये ठरविण्यात आले.आगामी



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका समविचारी पक्षासोबत लढवण्यास वंचितची तयारी असून समविचारी पक्षांनी तसा प्रस्ताव दिल्यास वरिष्ठांकडे पाठवून पक्षाच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घेण्यावर बैठकीत मंथन करण्यात आले आहे. वरिष्ठांच्या दिशा निर्देशानुसार आगामी निवडणूका लढवून कुठल्याही परिस्थितीत मोर्शी तालुक्यात वंचितचा झेंडा फडकविण्याचा निर्धार यावेळी कार्यकर्त्यांनी केला. आढावा बैठकीला मोर्शी तालुक्यातील सर्कल निहाय जेष्ठ कार्यकर्ते- युवक व पदाधिकाऱ्यामधे प्रामुख्याने उमेश इंगळे, नरेश खराते, दिनेश इंगळे, पुण्यवर्धन राऊत,प्रदीप खराते, सुनील खडसे, जीवन वानखडे, योगेश वरघट, प्रीतम इंगळे, गोपाल वानखडे, सुनील मानकर, इत्यादी कार्यकर्ते बहुसंखेने उपस्थित होते.

# नांदगावातील राजकीय समीकरण बदलले

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

स्थानिक नगरपंचायत ची निवडणूक आता काही दिवसावरच येऊन ठेपली असून यावेळी नांदगाव नगरपंचायत चे नगराध्यक्ष पद खुला प्रवर्ग महिला करिता आरक्षित असल्याने नांदगाव शहरातील राजकीय समीकरण पूर्णपणे बदलले, अनेक महिन्यापासून नगराध्यक्ष पदासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून तयारीत असलेल्या इच्छुकांचा महिला आरक्षणामुळे मोठ्या प्रमाणात हिरमोड झाला. यावेळी प्रथमच नगराध्यक्षपदी महिला विराजमान होणार व सत्तेची चाबी महिलाकडे जाणार आहे.



त्यामुळे नगराध्यक्ष पदासाठी चर्चित चेहऱ्याची प्रत्येक राजकीय पक्षाला गरज आहे. यामध्ये भाजपाचे कार्यकर्ते राजेश पाठक यांच्या पत्नी स्वार्ता राजेश पाठक त्यानंतर रश्मी रणजीत खंडाळक, कल्पना अमोल मारोटकर, सुरेखा दिपक शिंदे,रुपाली सुरज जोशी व माजी नगराध्यक्ष च्या पत्नी प्रीती संजय पोपळे यांच्या नावाची चर्चा मोठ्या प्रमाणात आहे, त्याचप्रमाणे काँग्रेसकडून सुद्धा नगराध्यक्ष पदासाठी माजी नगरसेविका सीमा राजेश जाधव, आशा प्रकाश पारस्कर, विना निशांत जाधव यांची नावे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारीसाठी काँग्रेसकडून चर्चेमध्ये आहे. यावेळी नगरपंचायत वर पुन्हा सत्ता मिळविण्याकरिता काँग्रेस व भाजपा मध्ये राजकीय लढत आहे. नगरपंचायतच्या निवडणुकीत यावेळी राजकीय नेते जीवाचे रान करून आपले राजकीय अस्तित्व प्रस्थापित करण्यासाठी कोणतीही कसर ठेवणार नाही.

# प्रदिप ढोके यांचे निधन



**कुऱ्हा -** मारडा येथील शेतकरी संदिप बडकस (पाटील) यांचे जावाई प्रदिप बापुराव ढोके मुर्तिजापूर (तरोडा) ह.मु.अभुदय नगर मुंबई यांचे वयाच्या ५९ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा बराच मोठा आप्त परिवार आहे. स्व.प्रदिप ढोके यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरांवरील नातेवाईक उपस्थित होते. यावेळी सामुहिक श्रध्दांजली वाहण्यात आली.

## संक्षिप्त

### विवेक पवार यांची नियुक्ती



**अंजनगाव बारी -** महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्यनेते माजी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या आदेशाने, शिवसेनेचे सचिव म संजय मोरे यांच्या उपस्थितीत तसेच शिवसेना नेते कॅप्टन अभिजित अडसूळ, शिवसेना उपनेत्या प्रीती बंड, ज्ञानेश्वर धाने पाटील तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष बद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वांच्या उपस्थितीत नियुक्तीपत्र देऊन विवेक अण्णा पवार यांची बडनेरा शिवसेना शहरप्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली. एक युवा व अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणून ते सर्वत्र सुपरिचित असुन ते आपली जबाबदारी उत्कृष्टपणे पार पडतील असे बडनेरा वासियांकडून त्याच्या नियुक्ती अभिनंदन करण्यात आले.

### संत गाडगेबाबा वृद्धाश्रमात सबाने पिता-पुत्राचा सत्कार



**अमरावती -** शहरातील नूतन मूकबधिर विद्यालयातील सेवानिवृत्त शिक्षक दामोदर सबाने गुरुजी म्हणून प्रसिद्ध आहेत.होली क्रॉस शाळेतील मराठी शिक्षिका रोहिणी सबाने या दांपत्याचा मुलगा सन्मान-स्नुषा रश्मी यांचा सत्कार करण्यात आला. या कार्याबद्दल मित्रमंडळीच्या संत गाडगेबाबा वृद्धाश्रमातील दीपावली मिलन कार्यक्रम प्रसंगी उपस्थित सबाने गुरुजी व त्यांचे पुत्र यांचा मातोश्री कमलताई गवई व जायंटस सचिव शशांक देशपांडे यांच्या हस्ते शाल व पुस्तक प्रदान करून सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. गोविंद कासट, अनिल वानखडे,संजय खोंडे, काशिनाथ फुटाणे, विनोद इंगोले, श्रीकांत शेगोकार प्राचार्य विवेक मोहोळ, सतीश वडनेरकर, प्रफुल्ल निमकर,मधुकर भोपळे इत्यादी मंडळी हजर होती.

### नेहा तापडियाचा सत्कार



**अमरावती -** इंदोर येथील रहिवाशी पाचव्या वर्गातील नेहा कमल तापडिया या चित्रकलाकार रांगोळी कलाकार व कातरकाम कलाकाराचा आनंद परिवारातील दोन हजारहुन अधिक मंडळींच्या दीपावली मिलन स्नेहभोजन कार्यक्रमात सुदर्शन गांग प्रभा आवारे नागपूर येथील साहित्यिक प्रा. विजया मारोतकर यांच्या हस्ते शाल व पुस्तक भेटवस्तू प्रदान करून सत्कार करण्यात आला. नेहा न थांबता न थकता इतक्या बालवयात पाच ते सहा तास सतत सहज रांगोळी चित्र व कातर काम मध्ये कागदी फुले तोरण आकाशदिवे तयार कले. आनंद परिवारातर्फे नेहा व तिची आई सुशीला कमल तापडियासह तिच्या सत्कार प्रसंगी जवाहर गांग प्रदीप व दीप्ती कासट डॉ. गोविंद कासट मातोश्री कमलताई गवई प्राचार्य डॉ. सुभाष गवई, प्रदीप जैन ,अरुण कडू इत्यादी मंडळी हजर होती.

### युवकांनी केला अंजनगाव बारी ते उज्जैन प्रवास आठ तासात



**अंजनगाव बारी -** उज्जैनमधील महाकालेश्वर मंदिर भारतातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या भगवान शिवाच्या महाकालेश्वर रूपाची पूजा करते. हे मंदिर उज्जैनला 'मंदिरांचे शहर' किंवा 'महाकालचे शहर' म्हणून प्रसिद्ध आहे. येथील युवकांना अंजनगाव बारी ते उज्जैन प्रवास दुचाकीने फक्त आठ तास मध्ये पूर्ण केला असुन अनोख्या विक्रमाची नोंद केली आहे. यामध्ये अंजनगाव बारी मधील राजेश्वर गवई ,विशाल गहूकर, कार्तिक अंबडकर, आदर्श तेटू ,आकाश भोंगळे, लोकेश जाड, शुभम कुंभीतोड, सुरज धर्मे यांचा समावेश होतो. हे सर्व दुचाकीने कमीत कमी वेळात अंजनगाव ते उज्जैन प्रवास गाठला असल्याने सर्वत्र कौतुकांचा वर्षाव होत आहे.

# केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्थेला शेतकऱ्यांच्या बांधावर आणा!

## विविध रोगांमुळे संत्रा झाडे वाळण्याच्या मार्गावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा आंदोलनाचा इशारा

**मोर्शी/वार्ताहर**

अमरावती जिल्ह्यामध्ये ५० हजार हेक्टर क्षेत्रावर विक्रमी संत्रा उत्पादन घेणाऱ्या मोर्शी वरूड तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या मागील संकटांची मालिका संपण्याचे नाव घेत नसून विविध रोगांमुळे मोर्शी वरूड तालुक्यातील संत्रा झाडे नामशेष होण्याच्या मार्गवर असताना सुद्धा केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्थेला शेतकऱ्यांच्या बांधावर येऊन संशोधन करायला तयार नसल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्थेला शेतकऱ्यांच्या बांधावर आणून संशोधन न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

मोर्शी वरूड तालुक्यातील संत्रा पिकवणारा शेतकरी



शासनाच्या उदासीन धोरणामुळे सलग आठव्या वर्षी मेटाकुटीला आला आहे. त्याच मुख्य कारण म्हणजे संत्रा भावगावरील विविध रोगांचे आक्रमण, संत्राबागांना लागलेली गळती. मागील दोन महिन्यांपासून अति पावसामुळे संत्रा उत्पादक शेतकरी हलाखीच्या परिस्थितीमध्ये सापडला असतांना हजारो संत्रा फळांनी बहरलेल्या संत्रा झाडावर मात्र आता निम्म्यापेक्षाही कमी संत्रा शिल्लक असल्याचे पहायला मिळत आहे. मोर्शी वरूड तालुक्यातील शेतकरी विविध रोगांमुळे संत्रा झाडे वाळणे, संत्रा गळती यामुळे संकटात आला असून कोट्यावधी रुपयांचे नुकसान संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे झाले असतांना संत्रा उत्पादक शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. याला केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्थेचे व कृषी विभागाचे उदासीन धोरण जबाबदार ठरत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी केला आहे.

केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्था - सीसीआरआयने तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोचवण्यासाठी एक उत्प्रेरक (कॅटलिस्ट) म्हणून काम करायला पाहिजे. या संस्थेमधील उत्तम तंत्रज्ञान कृषी क्षेत्राच्या गुणात्मक वृद्धीसाठी कामी आलं पाहिजे. संस्थेन जगातील सर्वोत्कृष्ट पद्धतींचा अवलंब करण्यासाठी संस्थासोबत संयुक्त भागीदारी केली पाहिजे, केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्थेने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन संशोधन केले पाहिजे, संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर बुरशीनाशके, कीटकनाशके, उपलब्ध करून देण्यात आले पाहिजे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी उप विभागीय कृषी अधिकारी उज्वल आगरकर, यांच्याकडे रेटून धरली असून पांढरा हत्ती ठरत असलेल्या केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्थेला ८ दिवसात शेतकऱ्यांच्या बांधावर न आणल्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष तथा ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके यांच्या तर्फे आंदोलनाचा इशारा यावेळी देण्यात आला.

शासनाने संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना सोडले वाऱ्यावर - अमरावती जिल्ह्यातील शेतकरी संत्रा गळतीमुळे हवालदिल झाला आहे. शेतकरी महागडी औषधे वापरत असला तरी याचा काहीएक फायदा होत नाही. परिणामी आर्थिक खर्चात वाढ आणि उत्पन्न कमी अशा अवस्थेत शेतकरी अडकला असतांना केंद्रिय फळ संशोधन संस्थेचे संशोधक व कृषी विभागाच्या तज्ञांकडून, शासनाकडून अजूनही ठोस उपाय योजना होतांना दिसत नसल्यामुळे सातत्याने होणारी संत्रा गळती ही संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या मुळावर उठली आहे

# तिरंग्या झेंड्यांच्या गजरात बेलोराहून निघणार 'महाएल्गार' आंदोलन

## शेतकऱ्यांच्या हक्कासाठी एकजुटीचा एल्गार!

**बेलोरा/प्रतिनिधी:-** शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी, शेतमालाच्या हमीभावासाठी, दिव्यांगांना सहा हजार रुपयांच्या मानधनासाठी, तसेच मेंढपाळ आणि मच्छीमारांच्या न्याय्य हक्कांसाठी महाएल्गार आंदोलनाची सुरुवात २७ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी बेलोरा येथून होत आहे.

स्वतः राज्यमंत्री बच्चू कडू ट्रॅक्टरवर चालवून नेतृत्व करणार आहेत. बेलोरा-आडगाव-यावली शहीद-मार्डीमार्गे वर्धा येथे मुक्काम घेत आंदोलन २८ ऑक्टोबर रोजी नागपूर बुटीबोरी येथे धडकणार आहे.रॅलीचा प्रत्येक ट्रॅक्टर 'जय जवान, जय किसान' आणि 'तिरंगा झेंडा' फडकवत स्वाभिमानाच्या घोषणांनी गजबजणार आहे.

या रॅलीत हजारो ट्रॅक्टर, बैलबंड्या आणि मेंढपाळ बांधवांचा सहभाग आहे. मेंढ्या, शेळ्या, बैलबंडी घेऊन ते बच्चू कडूंच्या सोबत नागपूरच्या दिशेने निघणार आहेत.

दरम्यान, सोलापूरहून २०,००० भाकऱ्या, मिरची आणि शेंगदाण्याचा खरडा, नाशिकहून कांदा व भाजीपाला, लातूरहून तूरडाळ, इतर भागातून हुरडा व अन्नधान्य पोहोचवण्याची व्यवस्था झाली आहे. गावोगावात चिवडा बनवण्याचं काम सुरू आहे. संपूर्ण ग्रामीण महाराष्ट्र एकसंध तयारीत उतरला आहे!

सरकारच्या घोषणांवर रोष 'कोरा सातबारा' अजून कोरा!- 'शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू' अशी ☞**(पान २ वर)**



### ■ १८२ किमीचा एल्गारमार्ग, जनशक्तीचा प्रवास

या आंदोलनाचा बेलोरा ते नागपूर असा १८२ किलोमीटरचा प्रवास ठरवण्यात आला आहे. अडगाव, यावली शहीद, डवरगाव फाटा, वर्धा, पवनार, सेलू, केळझर, खडक आणि शेवटी बुटीबोरी येथे हा प्रवास थांबेल.हजारो ट्रॅक्टर, ढोल-ताशांचा गजर, झेंडे फडकवणारे शेतकरी — हा दृश्यसमूह महाराष्ट्राच्या भूमीवर लोकशक्तीचा झंझावात निर्माण करेल.

### ■ पूर्वीच्या आंदोलनांची झंझावाती परंपरा

बच्चू कडूंच्या नेतृत्वाखाली याआधीही राज्य हलवणारी आंदोलनं झाली आहेत. रायगडाच्या पायथ्याशी तीन दिवस अन्नत्याग, लोकप्रतिनिधींच्या घरावर टेंबा आंदोलन, मोझरी येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या सान्निध्यात सात दिवस अन्नत्याग, डॉ. भाऊसाहेब देशमुखांच्या पवित्र भूमीतून पापड ते चिलगव्हाण पायदळ वारी, आणि महाराष्ट्रभर ४,९०० किमीची शेतकरी हक्क यात्रा. तरीही शासनाने शेतकऱ्यांच्या बाजूने ठोस पाऊल उचलले नाही. म्हणूनच यावेळी हा एल्गार आरपारचा होणार आहे.

### ■ महाराष्ट्रातील सर्व शेतकरी नेते एकत्र!

या महाएल्गार आंदोलनाला राज्यातील सर्व प्रमुख शेतकरी नेत्यांनी एकत्रित पाठींबा दिला आहे.या मंचावर दिसणार आहेत. विजय जावंधिया (जेष्ठ शेतकरी नेते), वामनराव चटप (स्वतंत्र भारत पक्ष), राजू शेट्टी (राष्ट्रीय अध्यक्ष, स्वामिनाथन शेतकरी संघटना), महादेव जानकर (राष्ट्रीय अध्यक्ष, राष्ट्रीय समाज पक्ष), डॉ. अजित नवले (अखिल भारतीय किसान सभा), बच्चू कडू (मा.राज्यमंत्री, प्रहार जनशक्ती पक्ष), कॉं. राजन क्षीरसागर (अखिल भारतीय किसान सभा - प्रगत मंच), प्रकाश पोहरे (अध्यक्ष, किसान ब्रिगेड), दीपकभाई केदार ( ऑल इंडिया पँथर सेना), प्रशांत डिक्कर (स्वराज्य पक्ष), विठ्ठलराजे पवार ( शरद जोशी विचार मंच, शेतकरी संघटना) हे सहभागी होतील. या नेत्यांची एकजूट म्हणजे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्मसन्मानाचा एल्गार आहे!

# राष्ट्रवादी संघटक महासचिव आ.संजय खोडके यांचा कार्यकर्त्यांशी संवाद

### सर्वसमावेशक निवडून येणारा उमेदवार निश्चित करावा लागेल



## जिल्हा परिषद , नगर पालिका व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आढावा

**अमरावती/प्रतिनिधी:-** महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक आपण महायुती म्हणून लढलो असो तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भातील परिस्थिती हि वेगळी आहे. अमरावती जिल्ह्यात आगामी निडवणुका होण्याबाबतचे चित्र स्पष्ट झाले असून कमी कालावधी उरला आहे. या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी पक्षाला नवी ताकद व बळ द्यायचे आहे. यासाठी आतापासूनच जोमाने तयारीला लागून निवडणूका जिंकायच्या आहेत. कुठल्या जागांवर स्वबळाबर लढायचे, कुठे युती करायची अथवा मैत्रीपूर्ण लढत करायची, यासंदर्भात स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊनच निर्णय घ्यावा लागणार आहे, ही जबाबदारी स्थानिक नेतृत्वाने घेऊन एक प्रबळ,सक्षम व सर्वसमावेशक असा निवडून येणारा उमेदवार निश्चित करावा. यासाठी सर्वांनी मोठ्या ताकदीने व जोमाने ☞**(पान २ वर)**

### प्रत्येक आव्हानांना सामोरे जाऊन निवडणुका जिंकायच्या आहेत - आ.सुलभा खोडके

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हा ग्रामीणच्या बैठकीला उपस्थित अमरावती विधानसभा मतदार संघाच्या आ. सुलभा खोडके यांनी मागर्दशन करतांना सांगितले कि, निवडणुका या निवडणुकासारख्याच झाल्या पाहिजे, आपल्याला राष्ट्रवादीची ताकद वाढवायची आहे. निवडणुकांसाठी साधारणतः एक-दिड महिना हाती असल्याने आपण युती किंवा आपल्या समोर कोणत्या बलाढ्य पक्षाचे आव्हान आहे, किंवा त्याच्या समोर आपण तग धरू कि नाही, महाराष्ट्राच्या निवडणुकीत युती म्हणून सोबत काम केले आता मात्र एकमेकांसमोर उभे ठाकलो आहे. असा कुठलाही विचार अथवा संभ्रम कार्यकर्त्यांनी बाळगू नये. निवडणुकीत विरोधकांचे आव्हान असेल, कुणी साम-दाम-दंड-भेद देखील वापरेल, परंतु कार्यकर्त्यांनी न डगमगता, मोठ्या हिमतीने या निवडुकांना सामोरे जाण्याचे आवाहन जेष्ठ नेत्या आ. सुलभा खोडके यांनी केले.

### १४ एकर शेतीत फक्त दीड पोते सोयाबीन

# कर्जाच्या ओझ्याने शेतकऱ्याची आत्महत्या

**वर्धा जनमाध्यम :** अतिवृष्टी, नापिकी आणि वाढत्या आर्थिक ताणामुळे विदर्भातील शेतकऱ्यांचे जीवन संकटात आले आहे. अशाच एका परिस्थितीत सिंदी रेल्वे जवळील हरदुलालपुरा गावातील ६३ वर्षीय शेतकरी ज्ञानेश्वर वामन वाघमारे यांनी कर्जबाजारी पणाला कंटाळून आत्महत्या केली. १४ एकर शेतीत पेरलेले सोयाबीन अखेर फक्त दीड पोते मिळालं, आणि यामुळे हताश झालेल्या वाघमारे यांनी शनिवारी सायंकाळी विष प्राशन केलं.पावसाच्या अनियमिततेमुळे आणि कीडग्रस्त पिकांमुळे वाघमारे यांचं संपुर्ण उत्पादन हातातून गेलं.



कर्जफेडीचा तगादा, वाढते दर, आणि घरगुती जबाबदाऱ्या या सर्व गोष्टींनी त्रस्त होऊन त्यांनी टोकाचा निर्णय घेतला. ग्रामस्थांनी त्यांना तातडीने सेवाग्राम रुग्णालयात दाखल केलं, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.मृत वाघमारे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत असून, शेतकरी संघटनांनी प्रशासनाकडे तत्काळ मदतीची मागणी केली आहे. स्थानिकांनी सरकारच्या मदतीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करत सांगितले की, जाहीर झालेल्या योजना कागदापुरत्याच ☞**(पान २ वर)**

# शिवसंकल्प पदाधिकारी प्रशिक्षण शिबीरात उपमुख्यमंत्री शिंदे यांचे मार्गदर्शन

## स्थानिक स्वराज्य निवडणुका शिवसेना महायुतीसोबत लढणार'

यवतमाळ/प्रतिनिधी:- आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या 'मिनी विधानसभा' असल्याचे प्रतिपादन शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. यवतमाळ येथे रविवारी आयोजित 'शिवसंकल्प जिल्हा पदाधिकारी प्रशिक्षण शिबिरात ते झूमद्वारे पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करीत होते.

या शिबिराचे आयोजन जिल्ह्याचे पालकमंत्री तथा शिवसेना नेते संजय राठोड यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. हवामान प्रतिकूल असल्याने उपमुख्यमंत्री प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नाहीत, मात्र ऑनलाईन माध्यमातून त्यांनी पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला.






शिबिराच्या मंचावर केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, आमदार नरेंद्र भोंडेकर, माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील, जगदीश गुप्ता, सहस्त्राराम कोरटे, संजय रायमुलकर, विश्वास नांदेकर, सचिव भाऊसाहेब चौधरी, प्रीती बंड आदी मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, 'आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका म्हणजे मिनी विधानसभा आहेत. या निवडणुका आपण महायुतीतच लढणार आहोत. मित्र पक्षांमध्ये कधी मतभेद होतात, पण आपले उद्दिष्ट विरोधकांचा पराभव करणे हेच असले ☞**(पान २ वर)**

# घरात शिरून वृद्धास लुटले

पिंपळखुटा **/प्रतिनिधी:-**: येथून जवळच असलेल्या तरोडा येथे भरदुपारी दोन व्यक्तींनी घरात शिरून वृद्धाच्या खिशातून पाचशे रुपये हिसकावून घेत पोबारा केला. या घटनेने गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले. रामकृष्णाजी वाघ हे घरी एकटेच असताना दोन व्यक्ती दुचाकीने त्यांच्या घरी आले. 'तुमची सोयाबीन पिकाची मदत मंजूर झाली असून, त्याकरिता आधार कार्ड व बँक पासबुक द्या. उद्या तुमच्या खात्यात रक्कम जमा होईल', अशी बतावणी केली. त्यामुळे रामकृष्णाजी यांनी आधार कार्ड दिल्याने त्यांनी आधार क्रमांक नोंद करून घेतला. त्यानंतर पिण्यासाठी पाणी मागितल्याने रामकृष्णजी पाणी आणायला घरात गेले असता, दोघेही त्यांच्या मागे घरात गेले आणि पैशाची मागणी करू लागले. त्यांना पैसे देण्यास नकार



दिला असता, रामकृष्णजीच्या खिशातून जबरदस्तीने ५०० रुपये हिसकावून दोघांनी दुचाकीने पळ काढला. ही घटना त्यांनी पोलिस पाटील गौरव वंजारी यांना सांगितले. त्या दोघांचाही शोध घेतला असता, ते निघून गेले होते. त्यामुळे गावात येणाऱ्या अनोखळी व्यक्तीपासून सावध राहण्याचे आवाहन पोलिस पाटील यांनी केले. सध्या गावखेड्यामध्ये मोठ्या प्रमाणात फेरीवाले व विक्रेते यायला सुरुवात झाली आहे. नागरिकही त्यांना घरापर्यंत बोलावून त्यांच्याशी संवाद साधतात पण, अशा घटनांनी आता प्रत्येकानेच सजग राहण्याची गरज निर्माण झाली आहे,

# अतिवृष्टीतून बचावलेला कापूस, सोयाबीन अवकाळीने हिरावले

**नांदगाव खंडेश्वर/ प्रतिनिधी:-** आधीच अतिवृष्टीत होरपडलेला शेतकरी निसर्गाच्या दृष्टचक्राने हदबल झाला. वारंवार होणाऱ्या या नैसर्गिक आघातामुळे शेतकऱ्यांचे दुर्दैवच पाठलाग करीत आहे असे दिसून येते. शासनाकडून पुरेशी मदत मिळत नसल्यामुळे आसमानी व सुलतानी संकटात अडकलेला बळीराजा चिंताग्रस्त आहे. तालुक्यात दिवाळीच्या दिवशी अवकाळी ने हजेरी लावली



त्यानंतर पुन्हा शनिवारी दुपारी तालुक्याला अवकाळी पावसाने झोडपून काढले. त्यामुळे शेतकऱ्यांचे काढलेले व कापणी केलेले सोयाबीन पावसात भिजले व झाडावर ☞**(पान २ वर)**

# तलवारीच्या हल्ल्यात बाप-लेकी जखमी

### राणी लक्ष्मीबाई वॉर्डातील घटनेने परिसरात खळबळ

**आर्वी :** राणी लक्ष्मीबाई वॉर्ड परिसरात घरखरेदीच्या वादावरून शेजाऱ्याने तलवारीने हल्ला करून बाप–लेकीला जखमी केल्याची गंभीर घटना शनिवारी (दि. २५ ऑक्टोबर) सकाळी घडली. या प्रकरणी पोलिसांनी अश्विन सुपौर पदरे (वय २९) याला अटक केली आहे.फिर्यादी राजेश बाळकृष्ण सोनोने (वय ५८) यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीसोबत घर विक्रीचा व्यवहार झाला होता. उर्वरित रकमेच्या कारणावरून त्यांच्यात वाद सुरू होता. शनिवारी सकाळी सुमारास आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करीत धक्का देऊन लोखंडी तलवारीने हल्ला केला. यात राजेश सोनोने आणि त्यांची मुलगी अर्पिता (वय २४) जखमी झाले.आरोपीचा हातही झटापटीत किरकोळ जखमी झाला असून, ☞**(पान २ वर)**

# केकदाखेडा, कवडाझिरी भागात वाघाचा धुमाकूळ, वासरू व बैलाची शिकार

**धारणी:** तालुक्यातील केकदाखेडा व कावडाझिरी गाव शिवारात दोन जनावरांची शिकार वाघाने केल्याने जवळच्या गावात प्रचंड दहशत पसरलेली आहे. धुळघाट रेल्वे व सुसर्दा परिक्षेत्राच्या जंगलातील या दोन प्रकरणातील मृत जनावरांच्या मालकांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याची मागणी होत आहे. प्रादेशिक वनविभाग परतवाडा आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्पाने वर्षभरात वाघांच्या किंवा इतर हिंस्त्र पशुच्या बंदोबस्तासाठी उपाय योजना केलेल्या नाहीत.

धारणीपासून २० कि. मी. अंतरावरील कवडाझिरी येथील एका बैलाची शिकार केल्यानंतर तीन दिवसापूर्वी वाघाने केकदाखेडा येथील दिलीप चौहान यांच्या गायीच्या वासराची शिकार केली. धुळघाट वन्यजीव परिक्षेत्रातील कम्पार्टमेंट क्रमांक ११६४ च्या जंगलात जनावरे असताना पट्टेदार वाघाने शिकार केली. पंचनामा करून वनरक्षकाने कारवाईसाठी ☞**(पान २ वर)**




### केळझरजवळ थरारक अपघात

# कार दुभाजकावर उलटली; चार तरुण जखमी

वर्धा वर्धा-नागपूर महामार्गावर केळझर जवळ एका किशोरवयीन चालकाने नियंत्रण गमावल्याने कार उलटण्याचा थरारक अपघात घडला. या अपघातात कारमधील चार तरुण जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, वर्ध्यातील दीपक साळुंखे (वय ४१) यांची कार (क्रमांक एम एच ०४ एफ झेड ४५८८) त्यांचा १७ वर्षीय मुलगा चालवत होता. तो आपल्या मित्रांना घेऊन नागपूरला सहलीसाठी गेला होता. परतीच्या




प्रवासात बौद्ध विहाराजवळ कारवरील नियंत्रण सुटले, ती दुभाजकावर आदळली आणि थेट रस्त्याच्या खालील शेतात जाऊन उलटली.या प्रसंगात आलोक सफारिया, सुफिया शेख, अंतरा देशमुख आणि☞**(पान २ वर)**

# वर्धा बसस्थानकावर महिलांची धुमश्चक्री; दिवाळीनंतरच्या गर्दीत जागेसाठी हातापाई

### पोलिस हस्तक्षेपाने थांबला वाद

**वर्धा जनमाध्यम ;** दिवाळीनंतर वर्धा बसस्थानकावर नागपूर आणि यवतमाळ मार्गावर जाणाऱ्या बसांमध्ये अभूतपूर्व गर्दी उसळली आहे. रविवार दुपारी प्रवाशांनी जागा मिळवण्यासाठी सीटवर कपडे टाकून जागा राखण्याचा प्रयत्न केला, मात्र बसमध्ये चढल्यावर विविध प्रवाशांमध्ये जागेसाठी वाद विकोपाला गेला. या गोंधळात दोन महिलांमध्ये जागेसाठी तीव्र तू-तू, मैं-मैं झाली आणि प्रकरण हातपायीपर्यंत पोहोचले. बसस्थानकातील चढाओढी, सीटची मारामारी आणि महिलांची झुंज याचा डोंगर पोलिस व सुरक्षा रक्षकांना पाठीमागे लागला. अखेर पोलिसांनी तत्परता दाखवत दोन्ही महिलांना वेगळे केले आणि गर्दीवर नियंत्रण मिळवले. दिवाळीच्या सुटीमुळे प्रवासासाठी खचाखच गर्दी होत असून सीट मिळवण्यासाठी प्रवाशांमध्ये तणावाची स्थिती आहे. बस स्थानक



प्रशासनाने अतिरिक्त बसेसची सोय केली असली तरी लोकांच्या प्रवासाच्या वेगाला बस आणि व्यवस्था पुरेशा पडत नाही.परिवहन प्रशासनाने प्रवाशांना शिस्त आणि ☞**(पान २ वर)**